रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ३ डिसेंबर २०२३



# सत्तेसाठी राज्याचे आर्थिक वाटोळे का ?



आधुनिक केसरी

**देशातील मध्यप्रदेश, राजस्थान, तेलंगना छत्तीसगड आणि मिझोराम या पाच राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल दि.३ डिसेंबर रोजी लागणार आहे. राजस्थान व तेलगंणा राज्यातील मतदार यावेळी भाकरी फिरवणार आहेत. त्यामुळे राजस्थान आणि मध्यप्रदेश या दोन राज्यात भाजपा तर काँग्रेस तेलंगणा व छत्तीसगड राज्यात बहुमत मिळण्याचा अंदाज आहे. पण या राज्यात सत्ताधारी पक्षांनी कर्जाचा बोझा वाढवून ठेवला आहे. तो आणखी वाढणार आहे. नवीन सरकारला या आर्थिक संकटला तोंड द्यावे लागणार आहे, राजकीय पक्षांनी संघर्षातून सत्ता मिळवेल, पण राज्यावरच्या आर्थिक संकटाचे काय?**

देशात राजकीय क्रांती करण्याच्या उद्देशाने अरविंद केजरीवाल यांनी झाडू चिन्ह घेवून आम आदमी पक्ष काढला खरा! दिल्लीत पक्षाने सत्ता मिळविण्यासाठी २०२० मोफत वीजेची घोषणा केली. दिल्लीचा मतदार या अमिषाला भूलला यातून आम आदमी सरकार आणले. पण हा कट्टर इमानदार पक्ष आज भ्रष्टाचारात बुडालेला आहे. या पक्षाने पंजाबमध्येही मोफत योजनांचे गाजर दाखविले. यात पक्षाला यश मिळाले. या मोफत योजनेला पंतप्रधान मोदींनी "रेवडी" म्हणून टीका केली. पंजाबमधील काँग्रेसची सत्ता केजरीवालमुळे गेली. काँग्रेसने त्यांच्या रेवडी संस्कृतीचा स्वीकार केला. पण उत्तर प्रदेश, गुजरात गोवा, या राज्यातील निवडणुकीत "रेवडी पॅटर्न" फेल झाला आहे. काँग्रेस पक्षाने मात्र कर्नाटक निवडणुकीत 'रेवडी फार्मूला 'चा वापर केला. यामुळे हिंदू मतदाराचे विभाजन झाले. दुसरीकडे तुष्टीकरणामुळे मुस्लिमांची एक गठ्ठा मते काँग्रेसला मिळाली. यामुळे कर्नाटकमध्ये काँग्रेसला विजयाची लॉटरी लागली व भाजपाचा पराभव झाला. हे खरे कारण आहे. पण काँग्रेस नेते मात्र राहूल गांधी व प्रियंका वाड्रा यांचा चेहरा व नेतृत्वामुळे पक्षाला यश मिळाल्याचा दिंडोरा पेटवत आहेत. तसेच चाटूगार पत्रकार, मोदी विरोधकांनी असेच विश्लेषण केले. कुमकुवत झालेल्या काँग्रेसला कर्नाटकपासून मोदी व भाजपाला पराभूत करु शकतो,असे वाटू लागले आहे. काँग्रेस पक्षाने राजस्थान व कर्नाटक निवडणुकीत मोफत आणि अनुदान देण्याचे जे आश्वासन दिले. ते आजही पूर्ण करू करू शकलेले नाही. कारण राज्य सरकारकडे पैसा नाही.आता योजनेची नियमावली करुन पळवाट काढली जात आहे, हा राज्यातील मतदारांशी धोका आहे.भाजपाला दक्षिणेत केवळ कर्नाटक या राज्यात सत्ता होती,ती टिकवता आलेली नाही. दक्षिणेत भाजपाला अजून पाय रोवता आलेला नाही. पण दक्षिणेत भाजपाने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत १३० जागापैकी ३० जागा जिंकल्या. तेव्हा २०२४ मध्ये भाजपा विजयाचा रथ दक्षिणेत अडविला तर तो सत्तेत येऊ शकणार नाही, असे विरोधी पक्षांना वाटते. त्यासाठी इंडिया'नावाची आघाडी करण्यात स्थापन केली. पण २०२४ लोकसभा निवडणुकीपूर्वी मध्यप्रदेश व राजस्थानमध्ये निवडणुकीत तीव्र मतभेद निर्माण झाले आहेत. राजकीय पक्षांनी राजस्थान, मध्यप्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड या चार राज्यावर विशेष लक्ष्य केंद्रीत केले आहे. कारण पाच राज्यात लोकसभेच्या ८३ जागा आहेत. यासाठी या राज्यात निवडणूकीत सत्ता मिळविणे महत्वाचे आहे. राजस्थानमध्ये २०१३ मध्ये येथे भाजपाचे सरकार होते. यावेळी काँग्रेस व भाजपा यांचेत खरी लढत होत आहे. राज्यात सत्ता परिवर्तन होईल, असे जानकारांचे मत आहे. कारण राज्यात हिंदूंची संख्या ८९ टक्के आहे. ही मते भाजपाला पसंती देतील असे वाटते. जर कर्नाटकप्रमाणे हिंदू मतांचे विभाजन झाले तर भाजपाचा पराभव होवू शकतो व काँग्रेस विजयी होईल, असे राजकीय गणित आहे. तसेच काँग्रेसची मुस्लिम, आदीवासी, दलित या मतदारावर अधिक मदार आहे. राज्यात जाठ मतदारांची संख्या १२ टक्के आहे तर राजपूत व गुर्जर समाजाची प्रत्येकी नऊ टक्के आहे. या समुहाची मते मिळावीत, यासाठी काँग्रेस आणि भाजपाने आटोकोट प्रयत्न केले.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

मागील निवडणुकीत राज्यात बसापा'चे ६ उमेदवार निवडून आले, नंतर काँग्रेसने त्यांना खरेदी करुन पक्षात घेतलेले आहे.बसपाने स्वतंत्र उमेदवार उभे केल्याने काँग्रेसला फटका बसू शकतो. यात काँग्रेस मध्ये मुख्यमंत्री गहिलोत व सचिन पायलट यांचे दोन गट आहेत. यात पेपर फुटीचे आणि लाल डायरी प्रकरणाचा भाजपाने मुद्दा केला होता. गहिलोत सरकारच्या काळात भ्रष्टाचार व महिला अत्याचारात राज्य आघाडीवर राहिले आहे. हे काँग्रेससाठी पराभवासाठी कारण असू शकते तसेच राज्यात इस्लामिक कट्टरत्तेतून कन्हैयाकुमार टेलरची गळा कापून हत्या केली गेली. या घटनेवरुन त्यामुळे हिंदू मतदार संतापलेला आहे. तो काँग्रेसच्या विरोधात जाऊ शकतो.राजस्थानमध्ये काँग्रेसला विजयासाठी अनुकूल असे वातावरण दिसत नाही. मध्यप्रदेश २०१८ मध्ये काँग्रेसची सत्ता होती. पण २०२० मध्ये काँग्रेसचे दिग्गज नेते ज्योतिरादित्य सिंधिया यांचे नेतृत्वाखाली काँग्रेसच्या २२ आमदारांनी राजीनामा दिला. त्यामुळे काँग्रेसच्या कमलनाथ यांना सत्ता सोडावी लागली. राज्यात भाजपा सत्ता आहे.राज्यात आदीवासी, ३९.०८ अनुसूचित जमाती २३ टक्के, यादव १४ टक्के व मुस्लिम १० तर ब्राह्मण मतदार १४ टक्के आहे. राज्यात शिवराजसिंह यांना 'मामा' म्हटले जाते. त्यांनी महिलांसाठी प्रभावीपणे योजना राबविल्या. यात महिला मतदारांची भाजपाला साथ मिळाली तर भाजपाला फायदा होऊ शकतो. काँग्रेस पक्षाने या निवडणुकीत समाजवादी पक्षाला दूर ठेवले, त्यामुळे अखिलेश यादव नाराज झाले व त्यांनी काँग्रेसवर 'चालू पार्टी' म्हणून टीका केली. त्यांनी काँग्रेसला मते देवू नका, असा नारा दिला. समाजवादी पक्षामुळे काँग्रेस अडचणीत येवू शकतो. समाजवादी पक्षाच्या नाराजीमुळे इंडिया या आघाडीत फूट पडली आहे.काँग्रेसला जर तीन राज्यात यश मिळाले तर हा पक्ष इंडिया आघाडीची साथ सोडून २०२४ लोकसभा निवडणूक स्वतंत्र लढवेल, असेही जाणकारांचे मत आहे.

तेलंगणा राज्यात एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के मागासवर्गीय संख्या आहे. या मतदारांची भूमिका महत्वाची ठरते. राज्यात के. चंद्रशेखर राव व भारत राष्ट्र समितीने दोन वेळेस यश मिळाले. यावेळी मात्र केसीआर च्या विरोधात भाजपा व काँग्रेसशी मुकाबला करावा लागत आहे.या राज्यात हिंदु -मुस्लिम मतांचे ध्रुव्रीकरण करण्याचा प्रयत्न झाला. केसीआर यांना ए.आय.एम.आय. एम.ची साथ मिळत आहे. तर काँग्रेसने मुस्लिम मते वळविण्याची प्रयत्न केले. राहूल गांधींनी तर एम.आय. एम.चे औवेसी यांना उमेदवार उभे करण्यासाठी भाजपाकडून पैसे घेत असल्याचा गंभीर आरोप केला. औवेसी यांनी गांधी यांना अज्ञानी नेता' म्हंटले व त्यांची खिल्ली उडविली. भाजपा नेत्यांनी काँग्रेस पक्षाला 'बिकावू पार्टी' म्हटले. ते 'केसीआर' सोबत जाऊ शकतात, असे भाकीत केले. काँग्रेसने 'केसीआर' परिवादाचा व कोट्यवधी संपत्ती मिळविल्याचा आरोप केला. पण काँग्रेस पक्षही परिवार व भ्रष्टाचारात बुडालेला आहे,याचा मात्र विसर पडलाय. कर्नाटक काँग्रेस सरकारने पैसा तेलंगणा निवडणुकीत जाहिरातीवर खर्च करण्याचा अगावूपणा केला, तो अंगलट येवू शकतो. 'केसीआर'च्या' रायतू बंधू' व दलित बंधू या योजना लोकप्रिय आहेत. त्यांचेवर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. केसीआर परिवारारावर मतदार नाराज दिसून येत आहे. केसीआरने विकास कामे केल्याचे सामान्य मतदारांचे मत आहे. त्यामुळे' केसी आर' यावेळी 'हॅटट्रीक करू शकतील. दलित व मुस्लिम मते काँग्रेसकडे वळविली तर कर्नाटकात जे घडले तेच तेलंगणामध्ये घडले असेच, म्हणावे लागेल! उत्तराखंड राज्यात काँग्रेस व भाजपा अशी लढत आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र बघेलांचा वाढत्या प्रभावामुळे पक्षाला यश मिळेल, असे काँग्रेस नेत्यांना वाटते. भाजपाने ऑनलाईन सट्याबाबत 'महादेव ॲप' प्रकरण उचलून धरले. यात बघेल यांना ५०८ कोटी रुपये दिल्याचे आरोपी शुभम सोनी सांगतोय ! त्यामुळे बघेल हे अडचणीत सापडले आहेत. त्यांनी ४० हजार कोटी कर्जमाफी दिली. यामुळे राज्य अधिक आर्थिक संकटात सापडले आहे. मिझोराम या राज्यात प्रादेशिक पक्षाचा प्रभाव आहे. भाजपा व काँग्रेस हे प्रादेशिक पक्षाच्या सहकार्याने सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. मिझोराममध्ये लोकसभेची केवळ एक जागा आहे. त्यामुळे काँग्रेस छोटे राज्य म्हणून त्याकडे दुर्लक्ष करत असते. एकंदरीत भाजपाला मध्यप्रदेश व राजस्थान या दोन राज्यात तर काँग्रेस पक्षाला छत्तीसगड व तेलंगणात यश मिळण्याची शक्यता आहे. या पाच राज्याच्या निवडणुकीत सुमारे १७५० कोटीची रक्कम जप्त केली गेली आहे. पण तपास यंत्रणेने ही रक्कम कोणत्या पक्षाची आहे, हे उघड केले नाही. काँग्रेसने तुष्टीकरण राजकारण करून निवडणूका जिंकल्या आहेत. याचे उदाहरण म्हणजे, काँग्रेस सरकार हज यात्रेसाठी अनुदान देत होते. १९९४ मध्ये प्रत्येकी पाच हजार अनुदान देत असे. यात २०११ वाढ करन ते ३८ हजार ८०० रुपये केले गेले. त्यावर ६०५ कोटी खर्च केला गेला. हज अनुदान प्रकरण न्यायालयात गेले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने नापंसती व्यक्त करत, हज अनुदान बंद करण्याचे निर्देश दिले. काँग्रेसने याही निवडणुकीत तुष्टीकरणाच्या राजकारणाला रेवडी संस्कृतीची जोड दिली.केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना अनुदानाची उधळपट्टी होत असे गॅसचे अनुदान सर्वांना दिले. याचा धनदांडग्याना फायदा झाला. त्यावर सरकारने ४० लाख कोटी खिरापत खर्च केले. काँग्रेस नेते गॅसच्या किंमतीवर मध्यमवर्गीय मतदारांना आकर्षित करत आहेत. यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर भार पडेल, याची चिंता करत नाहीत. मग सरकार कोणाचेही असो! गरीब व गरजू कुंटुंबाना मदत, अनुदान, कर्ज व्याजात सवत देणे येथपर्यंत ठीक आहे. राज्य सरकारने अनुदानाची उधळपट्टी करणे राज्याच्या आर्थिक हिताचे मुळीच नाही. रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार राज्याच्या महसुल उत्पन्नापेक्षा अनुदानावर अधिक खर्च अधिक आहे.यावर चिंता व्यक्त केली आहे. २०२०- २१ मध्ये राज्याचा अनुदान खर्च हा ११.२ टक्के होता. तो २०२१- २२ मध्ये १२.९ टक्के गेला आहे. राज्यात महसुली उत्पन्नाच्या- पेक्षा झारखंड. केरळ, ओरिसा, तेलंगणा, उत्तरप्रदेश राज्यात अनुदानावर सर्वाधिक खर्च होत आहे. तर गुजरात, पंजाब छत्तीसगड अनुदान खर्च १० टक्के आहे. यात वीज, पाणी, यात्रा, कर्जमाफी हा खर्च राज्य सरकारे करीत आहे. या सत्ताभोग्यांनी राज्यांना कर्जबाबाजारी केले आहे.जगात काहीच मोफत मिळत नाही, त्यासाठी द्यावाच लागतो! केंद्रातील व मोदी सरकार देशातील गरीब कुटुंबाना सरकार गॅस अनुदान, मोफत धान्य, तसेच शेतकर्यांना आर्थिक मदत, अनुदान देत आहे. नुकतेच मोदी सरकारने गरीब कुटुंबाना पुढील पाच वर्षे धान्य मोफत देण्याचा निर्णय घेतला. यावर ११ कोटी ८० लाख रुपये खर्च केला जाणार आहे. मोदी सरकारने गॅस अनुदानाच्या उधळपट्टीला लगाम घातला आहे. यामुळे ११ हजार ६५४ कोटी रूपयांची बचत झाली आहे. गांधी परिवार आधी सवंग घोषणा करतो, नंतर या परिवारांने केलेल्या घोषणा शिरसावंद्य मानून पक्ष स्विकारतो आहे. आज मध्यप्रदेश सरकारवर ३ लाख ७८ हजार ६१७ कोटी रुपये, तर राजस्थान ५ लाख३७ हजार १३ कोटी, तेलंगणा- ३ लाख ६६ हजार ६०६ छत्तीसगड सरकार वर ८२ हजार ७२५ कोटीचे कर्ज आहे. पाचही राज्य विकास कामावर कमी खर्च करतात, त्यात राजस्थान केवळ ४४ टक्के, मध्यप्रदेश -४६ तेलंगणा-३४ व छत्तीसगड -४२ व मिझोराम ४६ टक्के खर्च करतो. यामुळे राज्याच्या विकासाला गती नाही, असे एका अहवालात केले आहे. या पाच राज्यात कोणाचेही सरकार येवो, त्या सरकारला कर्ज फेडताना कठीण जाणार आहे. या सरकारकडे विकास कामांसाठी व गरीब कल्याणासाठी पैसा राहणार नाही. काँग्रेस शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेसाठी फूस लावत आहे. राज्यातील सत्ताधारी पक्ष करोडाचे कर्ज घेत असताना राज्याच्या अर्थ विभाग गप्प का ? काँग्रेसची निवडणुकीत पैसा वाटण्याची संस्कृती राहिली आहे. पूर्वी निवडणुकीत मतदारांना पैसा, दारू, जनता धोतर, साड्या वाटप केले जात असत. आता त्यास थोडा आळा बसला आहे. कारण ईडी व सी.बी.आय.ने विरोधी पक्षांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. त्यामुळे काँग्रेस राज्य सरकारच्या तिजोरीवर डाका टाकत आहे. तो निवडणुकीत मोफत योजनेव्दारे मतदारांना पैश्यांचे आमिष देत आहे. हे निवडणुक आचारसंहितेचा भंग करणारे व गंभीर प्रकार आहे. अश्या योजनातून सत्ताधारी भ्रष्टाचाराला वाव मिळतो. रेवडी योजनेचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. पण न्यायालयाने अजून यावर निर्बंध घातलेले नाहीत.या गांधी परिवाराला देशाच्या, राज्याच्या प्रगतीचे देणे- घेणे नाही. तो सुडाने पेटलेला असून देश व राज्याची अर्थव्यवस्था उध्वस्त करण्याचे षडयंत्र रचत आहे.

मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# ' मूर्ती ' घडवणारा शिल्पकार

तेव्हा त्यांनी लालांना उपचारासाठी अमेरिकेत पाठवण्याची व्यवस्था केली. जे आर डीं नंतर पुढे टाटा अँड सन्सचे चेअरमन झालेल्या रतन टाटांची ही गोष्ट. अगदी सुरुवातीला ट्रान्झिस्टर आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे बनवणाऱ्या नेल्को कंपनीचे ते प्रमुख होते. पुढे काही कारणाने ही कंपनी तोट्यात गेली. त्या कंपनीच्या संचालक मंडळांनी श्री रतन टाटांवर याचा ठपका ठेवून त्यांना जबाबदार ठरवले. पण जे आर डींच्या अनुभवी नजरेने हे हेरले होते की या कंपनीच्या नुकसानीसाठी आधीच्या काही वर्षांचा गलथानपणा आणि चुका कारणीभूत होत्या. म्हणून त्यांनी सर्व संचालकांना ही गोष्ट समजावून सांगून श्री रतन टाटांना अधिक वेळ द्यायला हवा हे पटवून दिले. त्याचप्रमाणे येणारे युग हे इलेक्ट्रॉनिक्सचे आहे. त्यासाठी येणाऱ्या काळाची पावले ओळखून आपण तयार राहायला हवे असा सल्ला रतन टाटांना दिला. जे आर डींच्या या सल्ल्यामुळे रतन टाटांना प्रोत्साहन मिळाले. पुढे त्यांनी ही नेल्को कंपनी नफ्यात आणून दाखवली. अशा रीतीने माणसांना समजून देणे, त्यांना प्रसंगी योग्य मार्गदर्शन करणे, त्यांच्यातील गुणांना वाव मिळेल अशा रीतीने त्यांना तयार करणे आणि त्यांच्याकडून पुढे उत्कृष्ट काम करून घेणे यामध्ये जे आर डींचा हातखंडा होता. टाटामध्ये जी माणसे त्यांनी आणली, त्या त्या माणसांमध्ये आपण केवळ नोकरी करत नाही किंवा टाटांसाठी काम करत नाही, तर हे काम करताना आपण देशाचीही सेवा करतो, अशी उदात्त भावना निर्माण करण्यात जे आर डी यशस्वी झाले. त्यांच्या परिसस्पर्शाने माणसे बदलून गेली. हिऱ्याला पैलू पडले. ओबडधोबड दगडातून आपल्याला हवी तशी ' मूर्ती ' घडवणारा हा शिल्पकार होता. एव्हाना वारा चांगलाच सुटला होता आणि आकाशात दिसणारा तो चुकार श्यामवर्ण मेघ कुठेतरी निघून गेला होता. आकाश निरभ्र झालं होतं. अथांग निळाई पसरली होती. संध्याछाया पसरू लागल्या होत्या आणि सगळी धरती त्या श्यामल वर्णात रंगू लागली होती.



# आनंदी पहाट

## आर्थिक व्यवस्थापनाची गरज

आधुनिक केसरी

जेव्हा बहुतेक लोक आर्थिक व्यवस्थापनाचा विचार करतात, तेव्हा ते सहसा त्यांची स्वतःची बँक खाती व्यवस्थापित करण्याचा विचार करतात. भाडे किंवा कर्जाचा हप्ता भरणे, युटिलिटी बिले भरणे, किराणा सामान खरेदी करणे, कदाचित मासिक बजेटचे नियोजन देखील करणे हे देखील आर्थिक व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्वाचे असते. परंतु व्यवसायासाठी आर्थिक व्यवस्थापन हा विषय अधिक गुंतागुंतीचा प्रयत्न असतो. यामध्ये व्यवसायात आणि बाहेर सर्वत्र पैशांचे नियंत्रण आणि मागोवा घेणे तसेच कंपनीला शक्य तितके फायदेशीर आणि आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करण्यासाठी पावले उचलणे समाविष्ट असावे लागते. आर्थिक व्यवस्थापन म्हणजे संस्थेच्या आत येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या पैशाच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे होय. प्रत्येक व्यवसायाला उत्पादने विकणे किंवा सेवा पुरवणे, खर्च भरणे, शिल्लक रक्कम आणि कर भरणे आवश्यक असते. कर्मचाऱ्यांना पैसे देणे, कच्चा माल खरेदी करणे, लागू असलेले कायदे आणि नियमांचे पालन करत आहेत, हे दर्शविण्यासाठी संबंधित सरकारी विभागांना अहवाल सादर करणे; यासारख्या अधिक जटिल प्रक्रियांसह आर्थिक व्यवस्थापन ह्या सर्व बाबींचा समावेश करते. जेव्हा आपण एखाद्या कंपनीच्या आर्थिक व्यवस्थापनाबद्दल बोलतो, तेव्हा व्यवसायासाठी ह्या सर्व व्यवहारांवर देखरेख करण्याची क्रिया म्हणजे आपल्याला काय म्हणायचे आहे आर्थिकदृष्ट्या स्पष्ट करणे होय. सर्वसाधारणपणे, कंपनी जितकी मोठी असेल तितके आर्थिक व्यवस्थापन अधिक क्लिष्ट होते. वित्तीय व्यवस्थापन म्हणजे कंपनीच्या आर्थिक संसाधनांवर देखरेख, नियंत्रण, संरक्षण आणि अहवाल देणे होय. नफा सुधारणे हा आर्थिक व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. कंपनीच्या उत्पादनांसाठी किंवा सेवांसाठी किमती निर्धारित करण्यासाठी वित्त व्यवस्थापन अनेकदा विक्री आणि विपणन संघांसोबत काम करतात. योग्य किमती ठरवण्यासाठी त्यांनी समतोल साधला पाहिजे, हे पाहणे आवश्यक असते.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# पैसा..

आधुनिक केसरी

जगण्यासाठी पैसा खरच आवश्यक असतो. पण तो किती असावा याला काही मर्यादा असतात. रोजच पंचपक्वांन किंवा हॉटेलला जेवलात तर त्यासाठी जास्तीचे पैसे जेवणासाठी लागतात. पण साधे जेवण, पौष्टिक जेवलात तर त्यासाठी फार पैसा नाही लागत. खाण्यासाठी जगू नका तर जगण्यासाठी खा. इतर भौतिक सुविधा पण गरज असेल तरच उपलब्ध करा. नसता जास्तीचा पैसा त्यात खर्च करू नका. जेवढी कमाई असेल त्याच्या 70 टक्केच रक्कम खर्च करा. बाकी बचत करा म्हणजे ऋण काढून सण साजरे करण्याची गरज पडणार नाही. आयुष्याची खूप महत्त्वाचे वर्ष पैसे कमावण्यात घालवायचे आणि शरीर थकले की तेच पैसे शरीर दुरुस्त करायला गमवायचे. सुखाच्या शोधात सतत बाहेर फिरायचे आणि ते तर परिवारातच असते. भरपूर काम करायचे, कष्ट करायचे, सगळ्यांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करायचा हेच स्वप्न माणूस उराशी बाळगतो. आणि ते स्वप्न साध्य करताना माणूस वेड्यासारखा पळत सुटतो, धाप लागेपर्यंत. तो इतका दमतो की आपण हे कोणासाठी, कशासाठी करतोय असा प्रश्न धावणाऱ्याला पडतो. पण या प्रश्नावर थांबाव, विचार करावा, पर्याय शोधावा एवढा विचार करण्याची सुद्धा परवानगी त्याला त्याचं आयुष्य देत नाही. कमावणारी माणसं, शिकणारी मुलं सगळेच सतत धावत असतात .आणि हे करावंच लागतं असा सगळ्यांचा समज झालेला आहे .पण हा समज चुकीचा आहे. याच्या पलीकडेही आयुष्य असतं ते शोधा आणि शांततेत, संयमान जगायला शिका. पैसा हवा पण तो किती असावा? परिवार हातातून निसटून जाईल इतका नसावा....




# चुकीची सवय

आधुनिक केसरी

एकदा अकबर खोल विचारात पडला होता, तो त्रासलेला दिसत होता, तेव्हा एका दरबारी त्याला त्याच्या त्रासाचे कारण विचारले. त्यानंतर अकबरने सांगितले की, त्यांचा मुलगा सलीमला अंगठा चोखण्याची गंभीर सवय लागली आहे. जसजसे त्यांचे वय वाढत आहे, तसतसे या सवयीमुळे आम्ही सर्व नाराज आहोत पण राजपुत्र हट्टी आहेत आणि कोणाचेही ऐकत नाहीत. मग त्या दरबारी अकबराला एका संताबद्दल सांगितले, तो म्हणाला की एक संत आहे, असे म्हणतात की तो एकदा त्याच्याशी बोलला की तो सर्व ऐकतो आणि त्याच्या सर्व वाईट गोष्टींचा त्याग करतो. त्याचे म्हणणे ऐकून अकबराला आपल्या समस्येचे समाधान त्या संतात दिसले आणि अकबराने त्या संताला दरबारात आणण्याचा आदेश दिला. काही वेळाने साधूला दरबारात बोलावून त्यांचा सन्मान करण्यात आला. तेव्हा साधूने ते आणण्याचे कारण विचारले. अकबरने त्याला सलीमच्या अंगठा चोखण्याच्या सवयीबद्दल सांगितले आणि त्याला काही उपाय करण्यास सांगितले. अकबर आणि सर्व दरबारी संताकडे टक लावून बघू लागले, तो काय उपाय करतो, पण संताने काही वेळ विचार केल्यावर सांगितले की आपल्याला आठवडाभराचा वेळ हवा आहे आणि असे सांगून तो सलीमला न भेटता निघून गेला. त्यावेळी महान बिरबल देखील दरबारात उपस्थित होता. आठवडाभरानंतर साधू आले आणि त्यांनी प्रथम सलीमला बोलावून घेतले आणि बराच वेळ त्याच्याशी बोलून अंगठा चोखणे आरोग्यास अपायकारक आहे हे त्याला खेळात शिकवले, त्यामुळे त्याने असे करू नये आणि सलीमला ही बाब समजली आणि त्याने कधीही न करण्याची शपथ घेतली. प्रत्येकामध्ये त्याचा अंगठा चोखणे. संताने सलीमला ज्या गोष्टी समजावून सांगितल्या त्या सर्व सामान्य गोष्टी होत्या, त्याला हवे असेल तर तो त्याच दिवशी कोर्टात हे सांगू शकतो, पण त्याने एक आठवड्याचा अवधी घेतला. ही गोष्ट अकबराच्या आणि दरबारींच्या पचनी पडली नाही आणि त्यांनी हा दरबाराचा अपमान मानला आणि अकबराकडे संताला शिक्षा करण्याची मागणी केली. अकबरानेही दरबारींचे म्हणणे मान्य केले आणि त्यानेही शिक्षा करण्याचे ठरवले, परंतु प्रत्येक निर्णयापूर्वी तो बिरबलाचा सल्ला घेत असे, यावेळीही त्याने बिरबलाकडे पाहून विचारले की तू आज इतका गप्प का आहेस? या संताला शिक्षा झाली पाहिजे असे वाटत नाही का?

# निरुपण

आधुनिक केसरी

स्वयें धर्म न करी ।धर्मकर्त्यासहि वारी ।
सर्वकाळ निंदा करी ।साधुजनाची ॥४॥
नेणे तीर्थ नेणे व्रत ।नेणे अतित अभ्यागत ।
मुंगीमुखींचें जें सीत ।तेंही वेंचून सांची ॥५॥
स्वयें पुण्य करवेना ।केलें तरी देखवेना ।
उपहास्य करी मना- ।नये म्हणौनी ॥६॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

कल्प तरु सत्संग है, यह चारो फल देय ।
सुबुधि सुचरित सुभाग से, मन वांछित फल लेय ।।६३।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/६३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सत्संग हा कल्पतरु आहे, जो चारही फळे देतो. सुबुद्धि आणि सच्चरित्राने राहून शुद्ध आचरणाच्या पुरुषार्थाने ज्या कामना केल्या जातात त्या सर्व सत्संगाद्वारे पूर्ण होतात. महापुरुषांच्या संगाने सत्संग प्राप्त होतो. साधना आणि अनुभवहीन वाचकज्ञानाने कुतर्क आणि अशांती प्राप्त होते. म्हणून अनुभवी संत तथा ब्रह्मनिष्ठ सद्गुरुंचा संगच सत्संग आहे ज्यामुळे सत्यस्वरूप परब्रह्माची प्राप्ती होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# भगवंतास स्मरुन प्रपंच केल्यास तो नीटनेटका होईल

आधुनिक केसरी

नारदांनी एकदा श्रीकृष्णांना विचारले, “तुम्ही कुठे सापडाल ?” त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, “नारदा, मी वैकुंठात नाही, रखुमाईपाशी सापडेन असेही नाही, तर मी माझ्या भक्तांपाशी सापडेन.” भक्त नाही तरी देवाशिवाय कसे राहणार ? देवाला देवपण तरी कुणी आणले ? भक्त जर नाहीत तर देव तरी कुठचे आले ? देव आहे असे जे मानतात त्यांनाच देवाचे अस्तित्व समजते. नास्तिकाला देव कुठला ? त्याला विचारले, “तुझे कोण आहे या जगात ?” तर तो सांगेल, “हे जे सर्व काही आहे आपले भाऊ, बहीण, बायको, मुले वगैरे नातेवाईक, तसेच प्रपंचात ज्या काही गोष्टी लागतात, त्या सर्व माझ्या आहेत.” परंतु मग देवाघरची वाट काय ? ज्याने जग निर्माण केले त्याला विसरायचे, आणि जे उत्पन्न केले ते माझे म्हणायचे, हा परमार्थ होईल काय ? तेव्हा ‘देव आहे’ अशी भावना धरा आणि देवाला दार उघडा म्हणजे तो सदासर्वकाळ तुमच्या जवळच आहे. भावनेने देव आपलासा केला पाहिजे. आपण कुठेही गेलो तरी आपल्या रामाला बरोबर घेऊन जात जा, म्हणजे तुम्हाला काही भीती नाही. ‘रामाला बरोबर नेणे’ हे बोलणे लोकांना चमत्कारिक वाटेल, पण ज्यांना देवच नाही असे वाटते त्यांच्याशी आपल्याला काही कर्तव्य नाही.



जो देवाच्या नादी लागला त्याचा प्रपंच बिघडला असे काहीजण म्हणतात. परंतु ज्याने प्रपंच निर्माण केला, त्याला विसरून तो प्रपंच नीट होईल का ? कधीही होणे शक्य नाही; तर त्याला स्मरूनच प्रपंच केल्याने तो नीटनेटका होईल. प्रपंच सोडून परमार्थ होणार नाही. प्रपंच करा, पण त्यातली आसक्ती सोडा म्हणजे झाले. तुम्हां सर्वांना जडभरताची गोष्ट माहीत आहेच. भरत जरी सर्व घरदार सोडून वनात गेला तरी तिथे हरिणाची आसक्ती धरलीच ! तर हरीण काय आणि माणसे काय, आसक्तीच्या दृष्टीने दोन्ही सारखीच. जोपर्यंत आसक्ती सुटली नाही तोपर्यंत परमार्थ करणे व्यर्थ होय. तरी आसक्ती सोडण्याचा प्रयत्न करा आणि माझा राम सदासर्वकाळ माझ्या मागेपुढे आहे ही भावना धरा. एकाने विचारले, “तुम्ही सर्वांना मानसपूजा करायला सांगता, पण एकटा राम सर्वांच्या जवळ कसा जाणार ?” मी त्याला सांगितले, “तू मानसपूजा कर म्हणजे तुझ्याजवळ तो राहील.” तो जर सर्व ठिकाणी भरलेला आहे, तर त्याला जाणे-येणे नाहीच ! आपण मात्र त्याला पाहणे जरूर आहे. भगवंताचे नामस्मरण हा उंबरठ्यावरचा दिवा आहे. त्याने भगवंत आणि प्रपंच दोन्हीकडे उजेड पडेल.

८२. देवावर सर्व सोपवून निश्चिंत होणे हेच अनुसंधान समजावे.

# गुणरूप

आधुनिक केसरी

जे जे अदृष्य सूक्ष्म वेगळेपणाने अनुभवता येते त्यालाच शून्य म्हणतात.पण परमात्म्याशी एकरूप झाल्याशिवाय स्वतः ला शून्य समजण्याचा मोठेपणा किंवा "अहंभाव" कमी झाल्याशिवाय परमात्मा भेटत नाही.आणि तो कमी करण्यासाठी तरी लहानपणापासून धार्मिकता,सर्वसमावेशकता जोपासली गेली पाहिजे,कृत्रिम दांभिकता नको आहे. जे जे कर्म करू ते ते कर्म ईश्वराची सेवा म्हणून करा. आपण वस्तूरूप होऊन जाणें ही परमात्मवस्तू पहाण्याची रीत आहे. तिच्याकडे वेगळेपणाने पाहिल्यास खात्रीने शुन्यत्वदर्शन घडते. समर्थांच्या सारख्या संतवचनावर एकनिष्ठा ठेऊन श्रध्दा ठेवणे हाच शुध्द स्वस्वरूपानुभव येण्याचा मार्ग होय. संतवचनावर विश्वास ठेवला की,मनाचा पहिला स्वभाव पालटतो, आणि आपण *परमात्मवस्तूच*आहोत असे वाटते. आपले मन देखील ब्रम्हस्वरूप होऊन जाते. मी तर असे कितीतरी **धनलोभी **पाहिले आहेत की ते संपूर्ण आयुष्य धनसंचयात घालवतात जगण्यासाठी कोणत्याही गोष्टीचा आनंद उपभोगत नाहीत. मग त्या अशा धनसंचयाचा काय उपयोग त्याच्या मागून कोणीतरी भाग्यवान त्या धनाचा यथेच्छ उपभोग घेतो. खरं तर स्वानंद मिळावा म्हणून साधक परब्रम्हाची नादी लागतो. परब्रम्हाचा हा स्वानंद मिळवण्यासाठी मनाची आध्यात्मिक श्रीमंती हवी,की त्या अध्यात्मिक श्रीमंतीचा उपयोग स्वतः ला व समाजालाही व्हायला हवा. आज हा आठवा ज्ञानदशक पूर्ण होताना माझ्या हातून काही चूका झाल्या तर समर्थ क्षमा करतील अशी आशा करते व सर्व वाचक मंडळी मोठ्या मनाने क्षमा करतील अशी आशा ठेऊन ह्या दशकांचा वर्णन करण्यासाठी माझ्या लेखणीला अल्पविराम देते,कारण आता आपण * नवव्या दशकांत पदार्पण* करणार आहोत. समर्थांनी हे इंद्रधनुष्य पेलण्याची ताकद द्यावी ही अपेक्षा करून थांबते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

रविवार, ३ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ११४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 3 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-114 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# भाजपसोबत जायचे नाही ही आमची भूमिका होती ! ज्यांना जायचे होते ते गेले !!

## शरद पवार : मी त्यांना कधीच बोलावले नाही

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे : मी राजीनामा देण्याचे कारण काय होते? मी पक्षाचा अध्यक्ष होतो. माझ्या राजीनाम्याचा निर्णय सामूहिक झाला होता. भाजपसोबत जायचे नाही, ही आमची भूमिका होती. ज्यांना जायचे होते ते त्यांच्यासोबत गेले. मी त्यांना कधीच बोलावले नाही, असे म्हणत शरद पवार यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन अजित पवारांच्या टिकेला उत्तर दिले.**

ते पुढे म्हणाले की, अजित पवार यांनी काही गौप्यस्फोट केलेत त्यातील बऱ्याच गोष्टी मला पहिल्यांदाच कळल्या.अजित पवारांनी लोकसभेच्या चार जागा लढवण्याची घोषणा केली. त्यावरही शरद पवारांनी भाष्य केले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे, अनिल देशमुख, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सुद्धा उपस्थित होते. अजित पवार यांच्या गौप्यस्फोटावर शरद पवार म्हणाले, त्यातील बऱ्याच गोष्टी मला पहिल्यांदाच समजल्या. ज्या मागण्या केल्या होत्या त्या संबंधीची चर्चा झाली होती. मात्र तो रस्ता आम्हाला मान्य नव्हता. आम्ही भाजपमध्ये जाण्यासाठी लोकांची मते मागितली नव्हती. जी आमची भूमिका होती त्याला लोकांचा पाठिंबा होता. त्यांनी निवडलेला रस्ता म्हणजे लोकांची फसवणूक आहे.
पक्षाचा अध्यक्ष मी होतो. सामूहिक निर्णय झाला होता. भाजपबरोबर जायला नको ही स्पष्ट भूमिका होती. मला आनंद परांजपे किंवा जितेंद्र आव्हाडांची मदत घेण्याची गरज नाही. माझी स्वतःची निर्णय घेण्याची कुवत आहे. लोकांच्या समोर जायचे असेल तर लोक जी भूमिका घेतील ती मान्य करावी लागेल. काहीही स्टेटमेंट केले त्याचा स्वीकार मी का करायचा? त्यांनी राजकीय निर्णय घेतला तो त्यांचा अधिकार आहे, फक्त त्यांनी राष्ट्रवादीच्या नावावर मत मागितले. त्याच्याशी विसंगत भूमिका त्यांनी घेतली आहे.

**ईडीच्या कारवाईवर पुस्तक लिहावे** : राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे खासदार प्रफुल पटेल यांनी आपण लवकरच पुस्तक लिहून गौप्यस्फोट करणार असल्याचे म्हटले होते. त्यावर शरद पवार म्हणाले, पटेलांच्या पुस्तकाची मी वाट बघतोय. प्रफुल पटेलांकडे पुस्तक लिहिण्यासाठी अनेक मुद्दे आहेत. पटेलांनी लोक पक्ष सोडून का जातात, यावर त्यांनी पुस्तक लिहावे.

### चर्चेतली बातमी

## राजेश टोपे यांच्या कारवर हल्ला, दगड आणि ऑइल फेकले

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या कारवर अज्ञातांनी दगडफेक केली आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आवारात कार उभी असताना अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुका सुरू आहेत. त्यापार्श्वभूमीवर राजेश टोपे जिल्हा मध्यवर्ती बँकेत दाखल झाले होते. राजेश टोपे यांची कार जिल्हा बँकेच्या आवारात उभी होती. तेव्हा अज्ञातांनी कारच्या समोरील काचेवर दगडफेक केली. तसेच, कारवर ऑइलही फेकले आहे. याबाबत 'टीव्ही ९ मराठी'शी संवाद साधताना राजेश टोपे यांनी माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप केला आहे.राजेश टोपे म्हणाले, लोणीकरांच्या समर्थकांनी जिल्हा बँकेच्या आवारात आणि माझ्या कारवर दगडफेक केली आहे. यात कारची समोरील काच फुटली आहे. ही गोष्ट अत्यंत निषेधार्य आहे.




मुंबईत निती आयोग व अप्रतिम मीडिया यांनी 'महाराष्ट्राचा शाश्वत विकास ध्येयांसाठी पत्रकारितेचे महत्त्व' या विषयावरील पहिली राज्यस्तरीय परिषद घेतली. गुरुवार, दि. 30 नोव्हेंबर 2023 रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात दिवसभर चाललेल्या परिषदेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. परिषद समारोपाला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे संयोजक डॉ. अनिल फळे यांच्यासह माध्यम क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि राज्यभरातील विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




# सामूहिक शेततळ्यातून कृषी अधिकाऱ्यांची वीस हजारांची लाच

आधुनिक केसरी न्यूज



**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील कळंब येथील कृषी कार्यालयातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आलेला आहे. एकीकडे राज्य शासन शेतकऱ्यांसाठी शेतीसाठी अशा विविध योजना राबवत आहे. ठिबक सिंचनासाठी 80 टक्के सबसिडी, स्पिंकलर साठी अनुदान, मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अशा विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शासन आपल्या दारीही उपक्रम राबवण्यात आला. पण या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचताना जर कृषी विभागाचं कुंपणच शेत खात असेल तर या योजना कुचकामीच ठरणार आहेत. कळंब येथे सामुहिक शेततळ्यासाठी 20 हजार रुपयांची लाच घेताना कृषी अधिकारी संतोष बाबुराव हूरगट यांना लाचलुचपत विभागाने रंगेहात अटक केली आहे. यावरून जर कुंपणच असं शेत खात असेल, तर शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे कशा राबविल्या जातील. कारण शेतकरी तक्रारदार यांना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत मंजूर असलेल्या सामुहिक शेततळ्याचे अंदाजपत्रक / प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव अपलोड करून अनुदान मंजुरीस पाठवून देण्यासाठी कळंब तालुका कृषी कार्यालयातील कृषी अधिकारी संतोष बाबुराव हुरगट यांनी पंचांसमक्ष तक्रारदार यांच्याकडे 20 हजार रुपये लाचेची मागणी करून 20 हजार रुपये लाच घेतली. हूरगट यांना ताब्यात घेतले असुन पोलीस स्टेशन कळंब येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

# आम्हाला गांजा लागवडीची परवानगी द्या

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** बारमाही कृषी संकटात असलेल्या यवतामळमधील एका शेतकऱ्याने एका सरकारी अधिकाऱ्याकडे गांजा लागवडीची मागणी केली आहे. मनीष जाधव या कापूस उत्पादक शेतकऱ्याने त्यांच्या संघटनेतील काही शेतकऱ्यांच्या वतीने अमरावती विभागीय आयुक्त निधी पांडे यांना निवेदन दिले. लहरी हवामानामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. या पारंपरिक पिकापासून त्यांना योग्य परतावा मिळत नसल्याने उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकराने आता गांजा लागवडीला अधिकृत मान्यता द्यावी, अशी त्यांनी मागणी केली आहे.


# बहुसांस्कृतिकता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, जात, धर्म, प्रांत आणि राष्ट्र यांचे संस्कार आणि संस्कृती काही प्रमाणात इतरांपेक्षा भिन्न असतात. ही भिन्नता हीच त्यांची ओळख असते. अशा भिन्न भिन्न चेहऱ्यांना घेऊन एक संघ निर्माण करणे हे राष्ट्रवादाचे प्रमुख कार्य असायला हवे, किंबहुना याशिवाय समतोल संघ निर्माण होणार नाही, याची पक्की जाणीव असणे महत्त्वाचे आहे. संस्कृतींचे सपाटीकरण करून आपण आपली वेगळी ओळख निर्माण करू शकणार नाही. नुसत्याच झेंडूच्या फुलांची बाग आणि विविध जातींच्या फुलांची बाग पाहताना निश्चितच आपण बहुरंगी फुले पाहताना हरखून जाऊ. समजून घेतल्यास हे एवढे सोपे आहे.**



## क्षितिजापल्याड

आधुनिक भारत घडवत असताना आपली जीवनविषयक दृष्टी देखील आधुनिक असावयास हवी. कारण आपली दृष्टी आणि दृष्टिकोन प्रतिगामी ठेऊन राष्ट्र पुरोगामी बनू शकणार नाही. जिथे जायचे आहे त्याच्या नेमक्या उलट दिशेला आपण कितीही चालत राहिलो तर आपण आपले लक्ष्य गाठू शकणार नाही. सर्वव्यापी, सर्वंकष विचार हा बुद्धीचा भागच नाही. हा आपल्या आत्मतत्त्वाचा भाग आहे. आज ज्ञानाचा प्रस्फोट झाला असे म्हणत असताना परस्पर द्वेषाच्या विस्फोटात कितीजण भाजून निघत आहेत, हे मात्र आपण पाहत नाहीत. आपले पूर्वज आपल्यापेक्षा कमी बुद्धिवान असतीलही पण त्यांच्याकडे एक सर्वसमावेशक दृष्टी होती, सामावून घेण्याची प्रवृत्ती होती. हे सामावून घेण्याचे आत्मतत्त्व विकसित करण्याचे शिक्षण आणि संस्कार दिल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकणार नाही. बुद्धी स्वहित जाणते हे तिचे प्रमुख वैशिष्ट्य. पण विकसित झालेले मन स्वार्थापेक्षा परार्थाला प्राधान्य देते. त्याच्या जगण्याने जर मी मरत असेन तर तोच मेला पाहिजे आणि मी जगलो पाहिजे ही मानसिकता आणि परार्था प्राणही द्यावे ही शिकवण यात फार मोठी तफावत आहे, किंबहुना परस्पर विरोधी आहेत. आज बहुसंख्य समाज पहिली विचारधारा जोपासण्याचा प्रयत्न करते. मग इथे साने गुरुजी बाद होतात का? त्यांची शिकवण महत्त्वाची नाही का? मनुष्यमात्रांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक असणारी आणि स्वार्थापेक्षा इतरांच्या हिताला प्राधान्य देणारी शिकवणच या देशाचे भले करणारी असेल. जर आपण आपले मत सोडायला तयार असणार नाही आणि इतरांनी त्यांची संस्कृती सोडून आपल्यासारखे वागले पाहिजे असा अट्टहास धरत असू तर हे हास्यास्पद होईल. ही आपली संस्कृती असू शकते, पण हा धर्म होऊ शकत नाही. आज आपण संस्कृतीच्या पुढील टप्प्यावर आहोत. धर्म ही आपली संस्कृती झाली आहे. आपल्या बुद्धिबळाच्या साह्याने स्वहितासाठी दक्ष असणे आणि त्यात इतरांचा सहभाग त्याज्य ठरवणे ही संस्कृतीची ओळख समजली तर त्याच बुद्धिबळाच्या साह्याने सर्वहितासाठी झगडणे हा आपला धर्म ठरतो. आपण आपल्या बुद्धीचा वापर कसा करतो यावर सर्व भिस्त आहे. बुद्धी तर्काधिष्ठित असते, तिचे काम पदार्थ तोडून विश्लेषण करणे हे असते. पण बुद्धीच्या पलीकडे असलेले अगम्य मन मात्र संश्लेषणाला प्राधान्य देणारे असते. हे असे उन्नत मनच भावी भारताची पायाभरणी करून जगात स्वतःची ओळख निर्माण करू शकते. जगात तीक्ष्ण बुद्धी असणारे अनेक माणसे असतील, देश असतील मग त्यांच्यात आणि आपल्यात काय फरक? आमच्याकडे संपूर्ण मानवजातीला कवेत घेऊ शकेल असे मानव्यपूरक विस्तीर्ण मन असावयास हवे. ही साधी उपलब्धी असणार नाही. या मानवकेंद्री मानसिकतेतूनच आपली बहुसांस्कृतिकतेची जगाला ओळख होणार आहे. संस्कृतींचे एकरेषीकरण किंवा सपाटीकरण हा उन्नत मनाचा भाग नसून तो अत्यंत क्षुद्र मानसिकतेचा आविष्कार असतो. आजपर्यंतच्या इतिहासात अनेक हुकूमशहांनी हा प्रयोग करून पाहिला. जगाने त्याला नावबोटे ठेवली, त्याचा निषेध आणि धिक्कार देखील केला. आचार्य जावडेकर यांनी बुद्धी आणि धर्माच्या अनुषंगाने फार मार्मिक विवेचन केले आहे. ते म्हणतात, ज्या बुद्धीने स्वहितनिष्ठा सोडून सर्वहितनिष्ठा स्वीकारली ती बुद्धीच खरी स्वतंत्र व खरी



पवित्र होय अशी ही दृष्टी आहे. अव्यभिचारी सत्यनिष्ठा, सत्याचे अखंड संशोधन आणि सत्यसंस्थापनेचा अविरत प्रयत्न याला ज्याने आपले जीवन समर्पण केले तोच खरा आदर्श मानव होय. आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व धर्मपुरुषांची शिकवण हीच आहे, धर्माचे रहस्य हेच आहे. आचार्यांचे हे बोल बहुसांस्कृतिकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजचा माणूस हा असा असला पाहिजे. हा केवळ आदर्शवाद नव्हे तर ही नव्या भारताची आपली ओळख असणार आहे. समाजात बोकाळलेला अत्यंतिक व्यक्तिवाद दूर सारून प्रभूची लेकरे सारी, तयाला सर्वही प्यारी या न्यायानेच इथे बहुसांस्कृतिकता नांदू शकते. एक राष्ट्र एक संस्कृती ही युरोपातील शिकवण आपल्या मातीत रुजू शकणार नाही, जी तिथेही कधी रुजली नाही. या मानसिकतेमुळे युरोपात किती गहजब झाला आणि आजही तिथे याच कारणामुळे काय परिस्थिती आहे हे सर्व जग अनुभवत असताना आपणही त्याच रस्त्याने जाणे श्रेयस्कर होणार नाही. एकल संस्कृती, व्यक्तिवाद, राष्ट्रवाद आणि वर्णवर्चस्व ह्या युरोपियन संकल्पना एक तर त्याज्य ठरवाव्या लागतील किंवा शक्यच नसेल तर आपल्या मूल्याबरहुकूम त्यात बदल करून घ्यावा लागेल. आपली मूल्ये म्हणत असताना अतिथी देवो भव आपण म्हणतो, तसेच वसुधैवकुटुंबकमचा नारा देतो. हीच शिकवण केवळ आपली पृथगात्मकता सिद्ध करते असे नव्हे तर मानवी पातळीवर उन्नत देखील ठरवते. आम्ही राजकीय तत्त्वज्ञानाच्या आधारे सहिष्णू आणि सर्वसमावेशी होऊ शकणार नाहीत. कारण राजकारण विभाजनाला प्रधान्य देणारे असते, नव्हे ते त्याचे मूलतत्त्व आहे. धर्म, संस्कृती ह्याचा वापर राजकारण आयुधासारखा करते, जो की सामान्य माणसाच्या जगण्याचा तो भाग असतो. हीच जगण्याची रीत विशाल बनवून आपल्यापेक्षा भिन्न संस्कृती मानणाऱ्याला देखील आपल्याएवढेच मूल्य आहे हे समजून घेणे म्हणजेच बहुसांस्कृतिकता जोपासणे होय.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# भारताच्या मुत्सद्देगिरीचा पराजय



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वैर संयुक्त राष्ट्रांच्या विविध मंचांवर अनेकदा उघडपणे समोर येत असते. भारत आपल्या हुशार मुत्सद्देगिरीच्या बळावर पाकिस्तानला अनेकदा पराभूत करत आला आहे.भारत एकीकडे जगातील काही देशांचा पाठींबा मिळवण्यासाठी पाकिस्तान काश्मिरच्या मुद्द्यावर खोटे बोलत असतो.तर दुसरीकडे भारत दहशत वादाच्या मुद्द्यावर पाकिस्तानला उघडे पडण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, शुक्रवारी पाकिस्तानचा दिवस होता. युनेस्कोच्या कार्यकारी मंडळाच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत पाकिस्तानने भारताचा दणदणीत पराभव केला. हा पराभव आपल्या मुत्सद्देगिरीचे अपयश मानले जात असून उच्च पातळीवर याची दखल घेतली जाण्याची शक्यताआहे.**

युनेस्को ही संयुक्त राष्ट्रांशी संबंधित शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संस्था आहे. हे शिक्षण, कला, विज्ञान आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील सहकार्याद्वारे जागतिक शांतता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देत असते. एकीकडे पाकिस्तान या जागतिक संस्थेचा उपाध्यक्ष बनत आहे, तर दुसरीकडे युनेस्कोच्या यादीत समाविष्ट शारदा पीठ मंदिर पाकिस्तानमध्ये पाडण्यात आले आहे. युनेस्कोच्या कारभारात उपाध्यक्षांची मोठी भूमिका असते. पाकिस्तान २०२३ते २०२५ या वर्षासाठी आशिया पॅसिफिक गटाचे उपाध्यक्ष बनले आहे. कार्यकारी मंडळाच्या ५८ सदस्यांपैकी ३८ जणांनी पाकिस्तानला मतदान केले आहे. तर भारताला केवळ १८ मते मिळाली. फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये युनेस्कोच्या कार्यकारी मंडळाची बैठक झाली. या काळात झालेल्या निवडणुकीत पाकिस्तानने हा विजय संपादन केला. या विजयामुळे उत्साहित झालेल्या पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करून सर्व सदस्यांचे समर्थन केल्याबद्दल आभार मानले आहेत. **युनेस्को' म्हणजे काय?**

१९४५ साली स्थापन झालेल्या 'युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन' याचे संक्षिप्त रूप म्हणजे 'युनेस्को'. शिक्षण, कला, विज्ञान आणि संस्कृती यामध्ये विविध राष्ट्रांचा दुवा साधून जागतिक शांतता व सुरक्षेसाठी प्रयत्न करणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या संस्थेमध्ये १९४ सदस्य देश व १२ सहयोगी सदस्य आहेत. तसेच सरकारी-खासगी संस्था, कंपन्यांचेही 'युनेस्को'ला सहकार्य होत असते. या संस्थेचे मुख्यालय फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये आहे. याखेरीज ५३ प्रादेशिक कार्यालये व १९९ देशांमध्ये आयुक्तालये कार्यरत आहेत. संस्थेमध्ये महासंचालक हे सर्वोच्च पद असून स्थापनेपासून आतापर्यंत ११ जणांनी हे पद भूषविले आहे. संस्थेचे सर्व कामकाज 'कार्यकारी मंडळा'मार्फत चालविले जाते. द्वैवार्षिक निवडणुकीत प्रदेशवार सदस्य निवडले जातात.



विशेष म्हणजे या दरम्यान युनेस्कोच्या यादीत समाविष्ट असलेले हिंदू मंदिर पाडले पाकिस्तान कडून पाडण्यात आले.पाकिस्तानने दावा केला आहे की ते संपूर्ण जबाबदारी, परस्पर आदर आणि विश्वासार्हतेने आपली जबाबदारी पार पाडतील. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे उद्दिष्ट असलेल्या सर्व सदस्य राष्ट्रांना सहकार्य करणार असल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे. एकीकडे पाकिस्तान युनेस्कोच्या जबाबदाऱ्या पार पाडणार असल्याचा दावा करत आहे, तर आपल्याच देशात न्यायालयाच्या कथित आदेशावरून सिंध प्रांतातील हिंदूंचे हिंगलाज माता मंदिर पाडण्यात आले. मंदिर पाडण्याची ही कारवाई मिठी शहरात घडली.

सीएनएन न्यूज १८च्या वृत्तानुसार, यूनेस्कोच्या यादीत समाविष्ट असलेले एलओसीजवळ असलेले हिंदू मंदिर शारदा पीठ देखील पाडण्यात आले आहे. पाकिस्तानने ही मंदिरे अशावेळी पाडली आहेत, जेव्हा पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने या मंदिराचे रक्षण केले जाईल, असे आदेश दिले होते. एवढेच नाही तर मंदिराजवळ एक कॉफी हाऊस बांधण्यात आले असून त्याचे उद्घाटन नोव्हेंबरमध्ये होणार आहे. पाकिस्तानात यापूर्वीही अनेक मंदिरे पाडण्यात आली होती आणि इस्लामाबादमध्ये हिंदू मंदिरासाठी जागा देऊनही ते बांधू दिले जात नाही.

पाकिस्तानच्या या विजयाने अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.. नव्या घडामोडीत भारताची पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर बदनामी झाली आहे. फ्रान्समध्ये झालेल्या युनेस्कोच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत पाकिस्तानने भारताचा दोन मतांनी पराभव केला. ज्या देशात दररोज हिंदूंची मंदिरे पाडली जातात, त्या देशात आता महत्त्वाच्या पदावर विराजमान होणार आहे. पाकिस्तानच्या विजयाने भारतासह जागतिक समुदाय आश्चर्यचकित झाला आहे. भारताने निवडणुकीत महत्त्वाचे स्थान गमावले आहे. युनेस्कोची ही निवडणूक जिंकणारा पाकिस्तान आपल्या भूमीवरील मंदिरे सातत्याने पाडत आहे. अशा स्थितीत ते आदर्श युनेस्कोचे उपाध्यक्ष असतील का, हा मोठा प्रश्न आहे. युनेस्कोच्या उपाध्यक्षपदासाठी भारताच्या पराभवावर सोशल मीडियावर प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. आतापर्यंत केवळ 'पनौती' सारख्या वरवरच्या प्रतिक्रिया जनतेतून येत आहेत. हा एक आश्चर्यकारक विकास आहे. पाकिस्तानविरुद्ध अत्यंत सक्षम असूनही भारताचा असा पराभव होण्याचे कारण काय? फ्रान्समध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठी आपल्या सरकारने कोणतीही रणनीती तयार केली नव्हती का? या प्रकरणात भारत आपल्या मित्र राष्ट्रांना एकत्र आणू शकला नाही का? मंदिर नष्ट करणारा देश शिक्षण, कला, संस्कृती आणि वारसा जपण्याची नैतिक जबाबदारी पार पाडू शकेल का? असे अनेक प्रश्न या निवडणुकीनंतर निर्माण झाले आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवा : डॉ.भागवत कराड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विकसित भारत संकल्प यात्रा सुरू करण्यात आली असून,२६ जानेवारी २०२४ पर्यंत देशाच्या सर्व भागात जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा आणि शहरामध्ये विकसित भारत संकल्प यात्रेच्या' माध्यमातून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना घराघरात पोहोचवा, असे आवाहन केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी केले. इटावा (ता. गंगापूर) येथे विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमात अर्थराज्यमंत्री डॉ. कराड बोलत होते. या संकल्प यात्रेत अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश रामावत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड, गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, सहायक गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार, सरपंच कैलास शिनगारे, उपसरपंच बाबासाहेब घुले, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय खांबायते, एल.जी. गायकवाड जिल्हा परिषद उपाध्यक्ष ,दीपक बडे पंचायत समिती सदस्य यांच्यासह जिल्ह्यातील सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थिती होती. यावेळी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. कराड म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून



विकसित भारत संकल्प यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.शासनाच्या विविध योजनांचा लाभ गावातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचावा. तसेच यामाध्यमातून लाभार्थी कुटुंबाच्या जीवनात बदल घडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजनांची माहिती प्रत्येक गावापर्यंत पोहोचवा. विविध योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी तत्परतेने काम करा, असे डॉ कराड यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे. राज्यातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे त्यांना आवश्यक ते उपचार मिळावेत यासाठी जनतेला पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सोयही शासनाने केली आहे. शासनाच्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी डीबीटीद्वारे निधी वितरण करण्यात येत आहे. आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री आवास योजना,उज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना यासह केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवा, असे निर्देश त्यांनी सबंधित सरकारी यंत्रणेला दिले.

भारत हा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश बनविण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. यासाठी देशातील प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे.शासन आपल्या पाठीशी आहे, असे डॉ.कराड यांनी सांगितले.

अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घेता येईल व योजना गावागावात पोहचविण्यासाठी ही संकल्प यात्रा आपल्या गावात आली असल्याचे सांगून योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रामवत यांनी संकल्प यात्रेचे आयोजन व विविध योजनांची माहिती दिली. उपस्थित लाभार्थी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमात लाभार्थ्यांना विविध योजनांच्या लाभाचे डॉ.कराड यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. या विकसित संकल्प यात्रेसाठी ग्रामस्थ व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## धम्मध्वज दिनानिमित्त महाधम्मध्वज महापदयात्रेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** जानेवारी हा 'विश्व बौद्ध धम्म ध्वज दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे यासाठी सन १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागरिक देवमित्त धम्मपाल, महास्थवीर गुणानंद सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादींनी मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा व केशरी अशा पाच रंगाच्या उभ्या व आडव्या पट्ट्यामध्ये 'विश्व बौद्ध धम्म ध्वजाची' निर्मिती केली. हा ध्वज जगातील सर्व देशांतील विद्वान विचारवंत आणि महान भिख्खू संघाने स्वीकार केला. विश्व बुद्ध धम्म ध्वज दिन समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा तसेच या दिवशी बौद्धांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र यावे यासाठी शहरात आंतरराष्ट्रीय धम्मध्वज दिनानिमित्त महाधम्मध्वज महापदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने खुरगाव येथून शहरातील रेल्वे स्टेशननजिकच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत १३९ फुटांच्या महाधम्मध्वज महापदयात्रेचे आयोजन करण्यात आले असून पदयात्रेचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळच होणार असल्याची माहिती प्रशिक्षण केंद्राचे संचालक, अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली. पदयात्रेच्या नियोजनात सर्व भिख्खू संघ, आंबेडकरी चळवळीतील संघटना, धम्म संघटना, बौद्ध उपासक उपासिका, नेते, कार्यकर्ते, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल यांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## शेंदुर्णी महावितरण विभागाचा मनमाणी कारभार; नागरिक त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**शेंदुर्णी :** महावितरण विभागातील सातुंबर रोहित्रावरील लघुदाब वाहिनीचे रस्त्यामधिल व वाहिनीमधिल अंतर कमी असल्याने रस्त्यावरून जाणारे अज्ञान वाहन लघुदाब वाहिनीच्या तरांना धडकले व पोलसह तारेचे नुकसान केले मात्र संबंधित गाडी चालकाचे व नागरिकांचे नशीब बलवंत याठिकाणी मोठा अनर्थ होतानी टळला. हा प्रकार दि.02.12.2023.रोजी सकाळच्या सुमारास घडलेला असताना सप्लाय पूर्ववत करून मिळण्यासाठी स्थानिक नागरिकांनी महावितरणाचे शेषराज जावरे प्रधान तंत्रज्ञ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उडवा उडविची उत्तरे दिली असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. त्यानुसार नितीन सांघवी यांच्याशी नागरिकांनी संपर्क साधला असता त्यांचे म्हणणे अशे की जो पर्यंत सबंधितावर गुन्हा दाखल होणार नाही तो पर्यंत विज पुरवठा चालू होणार नाही, या स्वरूपाची बेजबाबदार व्यक्तव्य नितीन सांघवी हे करत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

याठिकाणी सबंधित वाहन मालकाने आपले वाहन अधिक भरले व उंच केले की लघुदाब वाहिनीचे अंतर कमी हा मात्र चौकशीचा भाग आहे. मात्र सबंधित नागरिकांना गुन्हा नोंदणी प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत अंधारात ठेवणे हे कुठ पर्यंत योग्य आहे हा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला. या बेजबाबदार अधियाकऱ्याची पाठराख करण्यात वरिष्ठ विभागाला इतकी गोडी का असाही प्रश्न नागरिकांनी या ठिकाणी उपस्थित केला.

## डॉ. शालिनी वारद इष्टलिंगधारी गणेश उत्सव पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज


**उरण :** वीरशैव लिंगायत समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणा-या व वीरशैव लिंगायत समाजाचे हक्क व अधिकार त्यांना मिळवून देणारी वीरशैव लिंगायत समाजाची प्रभावी व आक्रमक संघटना म्हणून शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना भारतात सर्वांना सुपरिचित आहे. या शिवा संघटनेच्या वतीने २६ नोव्हेंबर २०२३ रोजी २८ व्या राज्यव्यापी वार्षिक मेळाव्याचे आयोजन श्री क्षेत्र कपीलधार, जिल्हा बीड येथे करण्यात आले होते. या वार्षिक मेळाव्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या



व्यक्तीचा सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उत्कृष्ठ भस्म व इष्टलिंगधारी गणेश उत्सव पुरस्कार डॉ. शालिनी भिमाशंकर वारद, रुद्राक्षी क्लिनिक,पंचकर्म सेंटर, उलवे ता. पनवेल जिः रायगड यांना प्रदान करण्यात आला. शालेय शिक्षणमंत्री मा.दिपक केसरकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंढे, शिवा अखिल भारतीय युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, शिवा संघटनेचे सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी, शिवाचार्य, धर्मगुरु, व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. शालिनी वारद यांना शिवा संघटनेतर्फे राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र Business Katta









# ओलिसांची सुटका : तिढा कायमचा सुटेल काय ?



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**ओलीसांची चार टप्यात सुटका झाली. युद्ध विराम लांबविणे शांततेसाठी आवश्यक आहे, परंतू एका दिवसानंतर पुन्हा युद्धाला तोंड फुटत आहे. हमास- इस्रलयलचा संघर्ष तातपूर्त्या मलमपट्टीने सुटणार नाही. भावनिक पुर्नरमिलन कसे होणार, शांततेसाठी कायमस्वरूपी तोडगा कसा काढणार, हा खरा प्रश्न आहे. 48 दिवसांचा संघर्ष तात्पुरता थांबला होता. पण भूमध्य समुद्र युद्ध मुक्त झाला, असे ठामपणे म्हणता येणार नाही. इस्राइल हमास संघर्ष युद्ध विरामामुळे मागिल आठवड्यात तातपुर्ता थांबला आहे. दहशदवादी संघटना संघर्ष वाढविण्याचा प्रयत्न करत असतांना सध्याचा तोडगा किती काळ टिकेल याबद्दल शंका व्यक्त केली जात आहे.**

इस्राइल आणि हमास दरम्यान ओलिसांची चौथी अदला बदल अखेर पूर्ण झाली. युद्ध विरामाचा शेवटचा दिवस आटोपला. या दरम्यान 50 ओलीस आणि 150 पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका करण्यात आली. मध्यस्थांनी गाझामधील युद्ध विराम वाढविण्याचा प्रयत्नच केला आहे. परंतु एक दिवसानंतर युद्धविराम टिकण्याची शक्यता नाही. इस्राइल आणि हमास यांच्यातील तणाव हळूहळू कमी व्हावा, अशी अपेक्षा केली जात आहे. इस्राइल हमासच्या लष्करी क्षमता चिरडून टाकण्यासाठी प्रयत्न करेल आणि गाझा पट्टीवरील हमासची सत्ता संपविण्यासाठी पुन्हा प्रयत्न करेल अशी भिती व्यक्त होत आहे.

**चौथी देवाण-घेवाण :** ओलिसांची चौथी देवाण-घेवाण सोमवारी झाली. युद्ध बंदीचा शेवटचा दिवस होता. त्यादरम्यान एकूण 50 ओलीस आणि 150 पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका करण्यात आली. अमेरिका, इजिप्त आणि कतार या देशाच्या नेतृत्वाखाली अंतराष्ट्रीय मध्यस्थांनी गेल्या शुक्रवारपासून मध्यस्थीच्या कल्पना कृतीत आणण्यास प्रारंभ केला. इस्राइल आणि हमास यांच्या सैन्यातील सध्याचा तात्पूर्ता युद्ध विराम हा 48 दिवसांच्या संघर्षातील पहिला विश्रांतीचा टप्पा ठरला आहे. त्यामुळे दोन्ही बाजूने चेतावणी दिली आहे की, हा तात्पूर्ता विराम आहे युद्ध संपलेले नाही. यावरून आपणास हा तिढा अजूनही सुटलेला नाही याची खात्री पटते. त्यामूळे मध्यस्थानी केवळ ओलीसांची सुटका एवढ्या मुद्यावर भर न देता दीर्घकालीन तोडगा काढला पाहिजे.

**अपरिमीत जीवित व वित्तहानी :**
इस्राइल हमास शाशित गाझापट्टी दरम्यान गेल्या 48 दिवसापासून संघर्ष चालू होता, इस्राइलने गाझापट्टीवर सतत बॉम वर्षाव चालू केला. त्यामध्ये मृतांची संख्या 14 हजारांपर्यंत पोहचली. त्यामध्ये 40 टक्के मुलांचा समावेश आहे. जीवित आणि वित्त हाणीचा अंदाज लावणे कठिण आहे. साधन सामुग्रीचा नाश पाहता या प्रदेशाची पुढील दहा वर्षात पुर्नरबांधणी होणे अवघड आहे. खरे तर युद्धानंतर दहा दिवसांनी असा तोडगा निघाला असता तर ओलीसही सुटले असते आणि हजारो लोकांचे प्राणही वाचले असते. भविष्य काळात या संघर्षाचे स्वरूप पाहता, खरे तर ज्या तीन देशांनी हा तोडगा काढण्याचा प्रयत्न केला त्यांनी तात्पूर्ता विचार केला आहे. त्याऐवजी दीर्घकालीन विचार केला असता तर हा चौथा टप्पापूर्ण झाल्यानंतर मध्यस्थापूढे हे आव्हान आहे की, दीर्घकालीन संघर्ष थांबला पाहिजे. केवळ वरवरची मलम पट्टी करून प्रश्न सुटणार नाही. दीर्घकालीन उपाययोजना हाती घेण्याची गरज आहे.

**तोडगा कसा असावा :** इस्राइल व हमास मधील वाढता तणाव दूर करण्यासाठी ओलीसांची सुटका याबाबीला पहिला टप्पा म्हणून महत्त्व आहे. चार फेऱ्यामध्ये ओलीसांची सुटका करण्यात आली परंतु आता पुढील पाच बाबीवर भर देण्याची गरज आहे. जागतिक दहशदवादी गटांनी जर हमासला सक्रीय पाठिंबा कायम ठेवला तर पुन्हा दीर्घकालीन युद्धाची भिती व्यक्त केली जात आहे. इस्राइलने संपूर्ण गाझापट्टीवर आपला ताबा प्रस्थापित करण्याचा आग्रह धरू नये. 16 वर्षापूर्वीच्या संपूर्ण प्रदेश इस्राइला पुन्हा ताब्यात घ्यावयाचा आहे, तर हमास त्याला असे करू देणार नाही. हमासच्या अतिरेकी महत्वकांक्षेमूळे पॅलेस्टाईनचे नुकसान होत आहे. त्यामुळे हमासच्या अतिरेकी व अतिशयुक्त कल्पनांना आवर घातला पाहिजे. इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्या न्याहू कृतिम बुद्धिमत्तेच्या सुरक्षा पैलूवर चर्चा करणार आहेत. या बाबतीत इस्राइलकडून हमी घेतली पाहिजे. कतार इजिप्त, अमेरिका तसेच युरोपियन व्युनियन या सर्वांनी मिळून सहमतीने तोडगा काढला पाहिजे. नविनतम घडामोडीचा परामर्श घेतला असता असे दिसते की, मध्यस्थानी प्रथम युद्ध विराम वाढविण्यावर भर दिला पाहिजे. सर्व प्रश्नांवर काळ हे एक औषध असते, त्यामुळे जेवढा कालावधी पुढे जाईल तेवढा तणाव कमी होईल. केवळ एक-दोन-तीन दिवस युद्ध बंदी वाढवून प्रश्न सुटणार नाही भूमध्य सागरातील युद्धाचे जमलेले ढग निवळले पाहिजेत. प्राणघातक आणि विनाशकारी युद्ध थांबवले पाहिजेत. प्रत्येक 10 ओलीसासाठी एक दिवस युद्ध विराम वाढविण्यास तयार आहे याचा अर्थ असा की, युद्धा ऐवजी



शांततेने आपल्या लोकांची जमेल तेवढी सुटका करून घेण्याचा इस्राइलचा प्रयत्न आहे.

**दुसरी पायरी कोणीती :** युद्ध विराम ही शांततेच्या दृष्टीने पहिली महत्त्वाची पायरी आहे, परंतू शांततेच्या प्रस्थापनेसाठी आणखी बरेच काही करणे करजेचे आहे. बार्शीलोणा येथे झोलल्या फोरम फॉर द व्युनियन ऑफ द मेडिटेरियन मध्ये सहभागी होतांना युरोपिय संघाचे परराष्ट्र प्रमुख जोसेफ बोरेल यांनी म्हटल्या प्रमाणे युद्ध विरामानंतर कायम शांततेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. इस्राइलला गाझावर पुन्हा वसाहत स्थापन न करण्याचे आव्हान करून जोसेफ यांनी असे म्हटले की, पॅलेस्टिनी आणि इस्राइल या दोघांनीही एकाच भूमीवर समान व कायदेशिर हक्क आहेत, हे लक्षात घेऊन तेथे कारभार करावा. दिन, धर्म व संस्कृती असूनही एकत्र नादण्याचा आणोखा संकल्प त्यांना करावा लागेल, तो किती टिकेल याबद्दल शंका वाटते. अगदी चौथ्या टप्प्यात ओलीसांच्या याद्या निश्चित करण्यात मतभेद झाले. शेवटच्या टप्यात कसा बसा मार्ग काढला. प्रश्न तात्पूर्त्या युद्ध बंदीने सुटणार नाही हा प्रश्न कर्क रोगासारखा जटिल आहे. या प्रश्नावर मध्यस्थानी दीर्घकालीन उपायावर भर दिला पाहिजे.

**समारोप :**या सर्व चर्चेचे सार असे की, ओलीसांची सुटका झाली पण दीर्घकालीन मनोमिलन कसे होणार. अमेरिकेच्या अध्यक्षाने व्यक्त केलेली भावना वस्तूनिष्ठ आहे. युद्ध विराम तर झाला परंतू भविष्यात आम्ही पुन्हा नव्या जोमाने लढण्यास तयार आहोत खरे तर आता संघर्ष ऐवजी समन्वयाची व सुसंवादाची भाषा आवश्यक आहे. गाझापट्टीतील लोक इतके घाबरले आहेत की, त्यांना हा युद्ध विराम पुढे चालू ठेवावा असे वाटते. पण त्यात अपयश आले तर मात्र संघर्ष अटळ आहे. संयुक्त राष्ट्र संघ आणि भारतासारख्या तिसऱ्या जगातील प्रमुख देशांनी नैतिक दृष्टीकोनातून शांततेचे होकायंत्र फिरविले पाहिजे. दहशदवाद विनाशकारी व चिंताजनक आहे. त्याऐवजी शांतता आणि परस्पर सहकार्याच्या आधारे मानवतेचे मूल्य समोर ठेवून शाश्वत विकासाच्या दष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. हमासने 4 वर्षाच्या ओलीस मुलीची सुटका केली. तीने जे सहन केले ते अकल्पनीय होते. असे सांगून अध्यक्ष बिडन यांनी व्यक्त केलेली भावना प्रश्नांची गुंतागुत स्पष्ट करते. इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्या न्याहू यांनी व्यक्त केलेला निर्धार त्यांच्या राष्ट्रवादाची खात्री पटवणारा इस्राइल पॅलेस्टाईन मधील मानसिक दरी कशी कमी होईल आणि उभय देशाच्या सिमेवर राहणाऱ्या लोकांमध्ये भावनिक पुर्नरमिलन कसे होईल हा खरा होईल. असे पुर्नरमिलन झाल्याशिवाय तात्पूर्त्या युद्ध विरामाला अर्थ नाही. युद्ध विराम शक्य तितक्या लाबवर वाढविणे हा एक तात्पूर्ता उपाय आहे. भविष्यकाळात मानवी कल्याणाच्या दृष्टीने विचार करून उपयाय केला पाहिजे 13 इस्राइली व 39 पॅलेस्टिनीची सोमवारी सुटका झाली. आता तणाव ग्रस्त जगाची सुटका कधी होणार असा प्रश्न लोक विचारत आहेत. युद्धाचे क्षेत्रा गाझामधून वेस्ट बँकमध्ये सरकत आहे, तेव्हा युद्ध क्षेत्र मर्यादित कसे ठेवता येईल हा ही मोठा चिंतेचा प्रश्न आहे. हल्ले-प्रतिहल्ले थांबवून तात्पूर्ता युद्ध विराम यापेक्षाही कायस्वरूपी शांतता हा जगाच्या कल्याणासाठी एकमेव मार्ग होय यात शंका नाही.

# शेतकरी हितासाठी एक्स बँड डॉप्लर रडारची तातडीने गरज



प्रा. किरणकुमार जोहरे
आंतरराष्ट्रीय हवामान शास्त्रज्ञ

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात मान्सूनपुर्व पावसाने अतोनात नुकसान झाले आहे. मराठवाड्यावर नेहमीच अन्याय झाला आहे. लालफितीच्या कारभारात एक्स बँड डॉप्लर रडार अडकले आहे आणि अधिकारी वर्ग अवैज्ञानिक कारणे देत जनतेची व राज्यकर्त्यांची दिशाभुल करीत आहेत. सी बँड डॉप्लर रडार हे उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यासाठी उपयोगी न ठरता एक्स बँड डॉप्लर रडार बसविणे तातडीने जनहित व शेतकरी हितासाठी गरजेचे आहे असे मत प्रा.किरणकुमार जोहरे, हवामान शास्त्रज्ञ, (भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिऑरॉलॉजी (IITM), पाषाण, पुणेचे माजी शास्त्रज्ञ) नाशिक यांनी मांडले आहे.**

मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रात एक्स बँड डॉप्लर रडार आवश्यक आहे याचे कारण ढगांचा एक्स रे काढत बोटांच्या पेक्षा एवढ्या आकारमान असलेल्या ढगात किती बर्फ कण, पाण्याची वाफ (बाष्प) आणि पाण्याचे थेंब आहेत अशी संपूर्ण ढगांची इंतभूत माहिती मिळते. परीणामी कोणत्या अक्षांश रेखांशावर किती वाजता किती मिलीमीटर पाऊस पडेल. ढगफुटी होणार कि दुष्काळ पडणार, देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेवर कसा व किती परीणाम होणार याची माहिती अत्यंत अचूक मिळते. सी बँड डॉप्लर रडार मराठवाड्यात बसविणे हालचाली सुरु आहे त्याचा मराठवाड्यात उपयोग नाही. तेव्हा राष्ट्रीय जनहित लक्षात घेत संपूर्ण भारतासाठी सर्व राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क ची गरज आहे. अर्थव्यवस्था व उत्पादन जीवनरेखा असलेल्या मान्सूनचा पॅटर्न लक्षणीयरित्या बदलला आहे. जगातील एक नंबर शक्तीशाली मनुष्यबळ असलेल्या देशाची भुक भागवत व जगाच्या अन्नसुरक्षिततेचे लक्ष्य गाठण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम म्हणजे एक्स बँड डॉप्लर रडार होय. प्रोग्रॅमेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी), पर्यवेक्षी नियंत्रण आणि माहिती अधिग्रहण (स्काडा), आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), व्हर्च्युअल रियालिटी (व्हीआर) आदींच्या वापराने 'राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क' हे हवामानाची बिनचूक माहिती घराघरातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचवेल असा सशक्त भारत लवकरच सत्यात साकारलेला असेल. 'चिक्कूचे बी पेरून झाडाला सफरचंद येतील का?' अगदी तसेच, कुठलेही रडार हे आकाशातून पाऊस पाडू शकत नाही किंवा पडणारा पाऊस देखील थांबवू शकत नाही हे खरे! परंतु रडार यासाठी बनलेलेच नाही हे समजून घेत आपली दिशाभूल होणार नाही यासाठी काळजी घेतली पाहिजे. खरंतर अवकाळी पाऊसासह हवामानाची अत्यंत अचूक माहिती देण्यासाठी एक्स बँड डॉप्लर रडारची निर्मिती झाली आहे. त्यामुळे सुबत्तेचा आणि पैशाच्या पावसासाठी 'एक्स बँड डॉप्लर रडार'चा रामबाण उतारा आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. शेतीच्या विविध टप्प्यांमध्ये देशभरातील कोट्यवधी शेतकऱ्यांना जिल्हा आणि तालुका पातळ्यांवर अचूक कृषी हवामान विषयक सल्ल्यासाठी आणि एकंदर शेती-अर्थकारण-नियोजन करीत सुयोग्य पिकांच्या निवडीसाठी 'राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क' आवश्यक आहे. १८१ वर्षापूर्वी म्हणजे १८४२ साली ऑस्ट्रीयाचे भौतिकशास्त्रज्ञ ख्रिश्चन डॉप्लर यांनी 'डॉप्लर इफेक्ट' चा शोध लावला आणि त्यातून साकारलेली यंत्रणा म्हणजे डॉप्लर रडार! इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव म्हणजे विद्युत चुंबकीय लहरी ढगांकडे सोडत ढगांचा एक्स रे काढणारी इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणा म्हणजे एक्स बँड डॉप्लर रडार होय. बोटाच्या पेराएवढ्या आकारमान असलेल्या भागातील बाष्प, पाणी व बर्फ कण यांची इत्यंभूत व अचूक माहिती 'एक्स बॅंड डॉप्लर रडार' देते. परिणामी ढगात एकूण किती पाणी आहे (टोटल लिक्विड वॉटर कंटेटः टिएलडब्लूसी) याची माहिती आपल्याला सहज मिळते. मग पाऊस किती, कसा, कधी होईल व ढगातले पाणी संपून थांबेल हे सहज समजते. इतके साधे सरळ विज्ञान आहे. यामुळेच अक्षांश-रेखांशानुसार किती वाजता किती पाऊस आपल्या डोक्यावर पडेल हे खात्रीशीर सांगणारी जगभर वापरली जाणारी अद्यावत यंत्रणा म्हणून एक्स बँड डॉप्लर रडारचा नावलौकिक आहे. इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम म्हणजे पीएलसी, स्काडा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आदींच्या वापराने वारा व तापमान या माहिती बरोबर सुयोग्य विश्लेषणाने आज हे शक्य झाले आहे. सर्वसामान्यपणे ५०० किलोमीटर परीघ एवढी रेंज असलेल्या एका डॉप्लर रडारची किंमत ४० कोटी रुपये इतकी असते. यामुळेच 'एक्स बँड डॉप्लर रडार' हे अत्यंत किफायतशीर व वेगवान जीवनरक्षक यंत्र व तंत्र आहे. घटना घडण्याच्या आधी तसेच घटना घडताना देखील, तातडीने ढगफुटी, महापूर, गारपीट, पाऊस, वादळवारा, दुष्काळ, धुके, उष्णता व थंडीची लाट, मेघगर्जनांसह पाऊस, चक्रीवादळ तसेच वातावरण बदल यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या आपत्ती टाळण्यासाठी माहितीचे पृथक्करण एक्स बँड डॉप्लर रडार करते. शेतीचे नुकसान टाळणे यामुळे शक्य होते. हवामान माहिती व अचूक अलर्ट आठतास आधीपर्यंत देणे हे यामुळे जगभर शक्य बनले आहे. शेती व उद्योगाचे संभाव्य नुकसान टाळण्यास जगभर वापरात येणारी अद्यावत व स्वदेशी यंत्रणा आता भारतात उपलब्ध आहे. उपयुक्त व खात्रीशीर यंत्रणा अशी एक्स बँड डॉप्लर रडारची ख्याती आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनहितासाठी एका शास्त्रज्ञाने केलेल्या 'राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क'च्या मागणीची गांभिर्याने दखल घेतली व कार्यवाहीचे आदेश दिलेत, हे अभिमानास्पद आहे. राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण आणि आपत्ती व्यवस्थापनासह जीवितहानी व वित्तहानी टाळण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्णच आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करीत जनतेच्या मोबाईलवर थेट सतर्कता संदेश पाठविण्यासाठी देखील 'राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क'ची आवश्यकता आहे, हे विज्ञान-तंत्रज्ञान प्रशासन जाणून आहे. यामुळेच देशात सर्वसामान्य शेतकऱ्यांना हवामानाची अचूक माहिती देण्यासाठी सर्व राज्यांत 'एक्स बँड डॉप्लर रडार' बसवण्याचे प्रयत्न जोमाने सुरू आहेत.परीणाम स्वरूप २०१७ पासून आजपर्यंत देशाच्या विविध भागांमध्ये एकंदर १३ डॉप्लर रडार स्थापन करण्यात आले आहेत. भारतात उपलब्ध ३७ डॉप्लर रडारची संख्या वाढवून लवकरच ७२ होईल. २०१७ सालापासून तामिळनाडू, उत्तराखंड, दिल्ली, लद्दाख, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर असे नव्या १० एक्स बँड डॉप्लर रडार बसविले गेलेत. शेतकऱ्यांना मदत व्हावी यासाठी ५५,६७३ चौरस किलोमीटर हिमाचल प्रदेश क्षेत्रफळ असलेल्या राज्यात तीन आणि जम्मू-काश्मीर मध्ये दोन एक्स बँड डॉप्लर रडार कार्यरत आहेत. हिमाचल प्रदेशच्या साडेपाचपट म्हणजे ३,०७,७१३ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या महाराष्ट्रात मुंबई वेरावली येथे मात्र ३१ डिसेंबर २०२१ रोजी एक्स बँड (८ ते १२ गिगा हर्टझ फ्रिक्वेन्सी) ऐवजी मोबाईल व सॅटेलाईट सिग्नलला अडथळा निर्माण होऊ शकेल अशा कमी फ्रिक्वेन्सीचे म्हणजे सी बँड (४ ते ८ गिगा हर्टझ फ्रिक्वेन्सी) डॉप्लर रडार बसविले गेले आहे. रडार कव्हरेज नसल्याने उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. अत्यंत तातडीने एक्स बँड डॉप्लर रडार बसवून ते टाळणे शक्य आहे. आजमितीला कोकण किनारपट्टीसाठी गोवा व मुंबई, विदर्भासाठी नागपूर तर पश्चिम महाराष्ट्रासाठी सोलापूर व महाबळेश्वर येथे अशा चार रडार यंत्रणा महाराष्ट्रात आहेत. याशिवाय मंजूरी मिळालेले चार एक्स बॅंड रडार एकट्या मुंबईसाठी लवकरच दाखल होत आहे. यामुळे महाराष्ट्रात ही संख्या वाढून आठ होईल. सह्याद्री पर्वतरांगामुळे मुंबईतील रडारचा उर्वरित महाराष्ट्राला उपयोग नाही हे सत्य आहे. उत्तर महाराष्ट्रात एक्स बँड डॉप्लर रडार बसविल्यास महाराष्ट्र व गुजरातच्या शेतकऱ्यांना देखील फायदा होईल. उत्तर महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यातील समुद्रसपाटीपासून ७०० मीटर उंचीवरील चांदवड तालुक्यातील चंद्रेश्वर डोंगर हे मध्यवर्ती ठिकाण आहे. चंद्रेश्वर डोंगरावर उंचीवरील ठिकाणी रडारसाठी लागणार अखंड विद्युत पुरवठा येथे शक्य आहे. येथून रडारद्वारे खान्देश आणि दक्खन या दोन्ही प्रदेशावर देखरेख शक्य आहे. तसेच मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग ३ वरून मोबाइल रडार वाहतूक सुलभपणे शक्य आहे. उत्तर महाराष्ट्रासाठी नाशिक जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाणी चांदवड तालुक्यातील येथील चंद्रेश्वर डोंगरावर डॉप्लर रडार बसविणे शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरेल. जनहितासाठी मराठवाड्यासाठी औरंगाबाद येथील सिल्लोड तालुक्यातील पिंपळदरी गावाच्या अजिंठा लेणी जवळ बौद्धलेण्यांजवळील उंच भागात एक्स बँड डॉप्लर रडार बसविल्यासाठीशेतकरीश्री. अंबांदास लोखंडे यांनी आपली जागा देऊ केली आहे. ही दोन्ही ठिकाणे वैज्ञानिकदृष्टीने सुयोग्य आहेत. राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क! डॉप्लर रडारच्या परिघात पाऊस, गारपीट किंवा ढगफुटी कुठे कुठे होणार ढग वाऱ्यावर स्वार होत कोणत्या दिशेला जात आहेत याचे चित्र स्पष्ट होते. किमान एक तास आधी १०० टक्के खात्रीपूर्वक अचूक सांगता येते ज्यामुळे शेतीनुकसान टाळण्यासाठी ही यंत्रणा जगभरात देवदूत ठरली आहे. विशेष म्हणजे मोठा निधी देत जागतिक हवामान संघटनेने (डब्ल्यूएमओ) ने आशियाखंडातील देशांत होणाऱ्या 'ढगफुटीं'चा सहा तास आगाऊ 'अलर्ट' देण्याची जबाबदारी 'नोडल एजन्सी' या नात्याने भारताकडे दिली आहे. देशात 'फ्लॅशफ्लड (ढगफुटी) निर्देशन यंत्रणा (एफएफजीएस)' उभारल्या गेल्या आहेत. आशियातील इतर देशांतील नागरिकांना ढगफुटी होण्याआधी सुचना अहोरात्र देत भारत मदत करतो आहे. इतर देशांना होण्याआधी 'फ्लॅश फ्लड म्हणजे ढगफुटीचा अलर्ट' देऊन नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी दाखविली जाणारी तत्परता महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या वाटेलाही आली तर सोन्याहून पिवळे भविष्य असलेली झळाळी महाराष्ट्रातीलशेतकरीअनुभवेल. शेतकऱ्यांना हवामानाची अचूक माहिती मिळवून देत तिचा पिकनियोजनासाठी एक्स बँड डॉप्लर रडारचा वापर करणाऱ्या देशांत अमेरिका, जपान, इस्राइल, तैवान, दक्षिण कोरिया, चीन, जर्मनी, युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, कॅनडा, ब्राझील, अर्जेंटिना, इटली, स्पेन, रशिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, मेक्सिको, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती अशा जगभरातील जवळपास सर्वच देशांचा समावेश होतो. अशावेळी 'राष्ट्रीय एक्स बँड डॉप्लर रडार नेटवर्क'चा महाराष्ट्र देखील भाग होवो! 'अंदाजे नव्हे तर अचूक हवामान माहिती' मिळून महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या उद्योगधंद्यांची भरभराट होवो, घरात सुख-संपन्नता येवो हीच प्रार्थना!

# उच्चशिक्षण : अपेक्षापूर्ती की अपेक्षाभंग ?



परमेश्वर घुंगासे
संपर्क क्र. 9623115496

आधुनिक केसरी

**लग्नाच्या सोयरीकीत न चुकता विचारला जाणारा सरकारी प्रश्न म्हणजे "मुलगा कितवी शिकलाय"? बहुतांश ग्रामीण भागातली उत्तरे असतात बी.ए. एम.ए डी.एड. वगैरे वगैरे आणी काम काय करतोय तर मात्र उत्तर द्यायला एक तर गफलत होते किंव्हा मग स्पष्ट पणे शेती करतो अस सांगून वेळ मारून नेली जाते.याला कारण सुद्धा असच आहे आयुष्यातले उमेदीचे आणी स्वप्न दाखवणाऱ्या काळात जवळपास पाच- सात वर्ष उच्चशिक्षणात अगदी वेड्यासारखे अभ्यास, पुस्तक, परीक्षा आणी कोणती तरी नोकरी हाती लागेल या मनसुब्याने हा काळ शिक्षणापाई खर्च केला जातो. मात्र कालांतराने जेव्हा हे चक्र जेव्हा संपत आणी वास्तवाकडे वाटचाल होते तेव्हा मात्र मोठी किंमत मोजावी लागते.**

समाज म्हणून डिग्रीला किंमत उरत नाही तिथे बँक बॅलन्स ने व्यक्तिमत्व ठरवले जातात, मात्र या अवजड वाटणाऱ्या सत्याला नेमक जबाबदार आहे तरी कोण ? आपली उघड्या डोळ्यांनी आभाळा एव्हडी स्वप्ने बघणारी वृत्ती की उच्च शिक्षणाच चॉकलेट देऊन बेरोजगारीचे व्रण आपल्या पदरात टाकणारी शासकीय व्यवस्था ? खर तर "सुशिक्षित पण बेरोजगार" ही राज्याचीच न्हवे तर संपूर्ण भारताची एक विचित्र समस्या का आहे भारतातील "सुशिक्षित बेरोजगार" तरुणांची आव्हाढव्य फौज आणी तिची करणे ही भारतातील बेरोजगारीच्या अनेक पैलूंपैकी एक आहे. सामान्यतः शहरी भागात आढळणारी, सुशिक्षित बेरोजगारी ही एक विरोधाभासी परिस्थिती दर्शवते जिथे शिक्षणाचे रोजगारात रूपांतर होत नाही. औपचारिक शिक्षण असलेल्या व्यक्ती, जसे की पदवी किंवा प्रमाणपत्रे, त्यांच्या पात्रतेनुसार योग्य रोजगार शोधण्यात निष्फळ आहेत. ही समस्या शहरी भागात विशिष्ट वयोगटांमध्ये, विशेषतः पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. तरुण आणि सुशिक्षित व्यक्तींचा सर्वात मोठा ज्ञानाचा दुवा असूनही, भारताला विरोधाभासाचा सामना करावा लागतो जेथे औपचारिक शिक्षणाचे रोजगारात रूपांतर होत . इतर विभागात चांगल्या प्रमाणात नोकरीची अथवा रोजगाराची शास्वती असते मात्र ग्रामीण विद्यार्थ्यांचा बाबतीत यात त्रुटी आढळून येतात, मुळात पूर्वापार नसलेल शिक्षित कुटुंब, सभोवतलाच वातावरण, आणी योग्य वेळेत न मिळेलेले मार्गदर्शन यामुळे सहसा एकाधिक क्षेत्रातच उच्च शिक्षण घेण्याचा निर्णय तरुण घेतात ! चिंतनाचा विषय म्हणजे निरक्षर आणी अशिक्षित व्यक्तींपेक्षा सुशिक्षित लोकांमध्ये बेजोरगरीचे प्रमाण अधिक आहे हे सत्य पाहून आपण किती भयानकतेच्या दारात उभे आहोत याची प्रचितो येते.प्रमुख कारणांमध्ये शैक्षणिक पात्रता आणि उद्योगाच्या गरजा वाढत्या वयासोबत येणाऱ्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या यांच्यात जुळत नाही.. कंत्राटी कार्य पद्धतीची ही संकल्पनाच मुळात स्थिर रोजगाराची अथवा नोकरीची हमी देत नाही ! त्यामुळे शिक्षण आणि उपलब्ध रोजगार यांच्यात असलेली ही खूप मोठी विसंगती आहे. प्रत्येक पालकांची तथा विद्यार्थ्यांची मानसीक विचार शैली प्रबळ आहे ती म्हणजे जेथे शिक्षण, सामान्यतः चांगल्या करिअरच्या संभाव्यतेसाठी एक मार्ग मानले जाते मात्र बऱ्याच अंशी ते शिक्षण आवश्यकपणे रोजगाराकडे नेत नाही. या परिस्थितीचा परिणाम बऱ्याचदा बेरोजगारीमध्ये होतो, जिथे व्यक्ती त्यांच्या पात्रतेच्या पातळीपेक्षा कमी असलेल्या नोकऱ्या स्वीकारायला भाग पडतात किंवा बेरोजगारी ! तरुण पिढीला नवनवीन गोष्टी नवनवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी प्रचंड रस आहे मात्र ते त्यांना



फक्त नोकरी आणि भरघोस पगाराचे पॅकेज घेण्यापूर्त मर्यादित राहिलंय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची झपाट्याने वाढ आणि त्यानंतरच्या औद्योगिकीकरणामुळे आपल्या जुन्या नैतिक आणि मूल्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. वय, शिक्षण, जबाबदारी आणी शिक्षणाच्या ओझ्याखाली आ वासून उभी असलेली बेरोजगारी हे केवळ एक ज्वलंत सत्य नसून कित्येक तरुण पिढीचा असंतोष आणि विद्रोह या शिक्षण व्यवस्थेच्या मूल्यांच्या ढासळत्या व्यवस्थेचे फलित आहे.सामान्य वर्गातून विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे; अनेक शिक्षण संस्थेत नोकरी साठी भरमसाठ रकमेची मागणी होत असताना दुसरी कडे हेच विद्यार्थी स्वतःसाठी जीवनाच्या किमान गरजा पुरवू शकत नाहीत.टेबलाखालच्या वाढत्या बक्षिसांमुळे ग्रामीण भागातील उच्च - शिक्षित तरुणांपुढे हे नव्याने उभे राहिलेली आर्थिक संकटे वाढली आहेत.. शैक्षणिक संकुलातील वाढता राजकीय प्रभाव ही देखील एक वाईट गोष्ट आहे आणि उच्च शिक्षणाची कदाचित न मिटणारी समस्या आहे. प्रशासकीय मंडळांना त्यांच्या कारभारात कोणताही राजकीय प्रभाव किंवा हस्तक्षेप नको असतो . मात्र प्रबळ राजकीय नेते, आता विविध विद्यापीठांच्या प्रशासकीय संस्थांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, कारण त्यांच्याकडे बहुतेक संस्था आहेत, शिक्षण ( अनुदानित-विनाअनुदानित ). त्यांनी स्वतःचे युवा सेल स्थापन करून राजकीय आधारावर विद्यार्थी संघटनांना प्रोत्साहन दिले आहे. ते त्यांच्या राजकीय हेतूंसाठी विद्यार्थ्यांच्या आणी सोबतच शिक्षकांच्या ऊर्जेचा देखिल वापर करतात. विद्यार्थी स्वतःची उद्दिष्टे प्राप्त करण्याची, शिक्षक प्राध्यापक त्यांच्या पगारीची आणी राजकीय मंडळी त्यांच्या राजकीय भविष्याची सांगड घालताना दिसतात. यात प्रामुख्याने भरडला जातो तो सर्वसामान्य घरातला उच्च शिक्षित तरुण, आयुष्यातले महत्वाचे दिवस शिक्षणासाठी खर्च करून सुद्धा त्याच्या आयुष्यात शेवटी बेरोजगारीच्या भीषण आयुष्याचा नवा अध्याय सुरु होतो !

# अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७२ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या.**

त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य



सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव



यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७२ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

# कविता लिहीत असताना

आधुनिक केसरी

**मला कविता लिहिण्याचा छंद आहे. जमेल तसं जमेल तितक्या प्रमाणात मांडण्याचा मी प्रयत्न करतो.त्यातल्या कविता लेख अधून मधून विविध दैनिकात, साप्ताहिकात प्रकाशित होत असतात. एकंदरीत याने बरं वाटतं. त्यातून शिकायला मिळते, वाचायला मिळते हा एक उद्देश असतो. कविता लिहीत असताना, लेख लिहीत असताना एकंदरीत साहित्यामध्ये काम करत असताना छोटीशी एक माझी इच्छा असते की, घरी बायकोने देखील मदत करावी, काही सुचवावे. काही चुका शोधाव्या. काही उनिवा भरून काढत मला माझ्या बायकोचं ही मार्गदर्शन मिळावं, तिच्याकडून अशी एक साधारण अपेक्षा असते.**

म्हणून मी कधी कधी बायकोला सांगताना म्हणतो, "मी लिहितो तुम्हीही मला यामध्ये मदत करत जा. सांगत जा. शिकवत जा. काही सुचवत जा"... पण तिचं याकडे साप दुर्लक्ष असते.

जेव्हा लिहित रहा असं म्हणतो तेव्हा ती म्हणते, "ते काय माझ्याच्याने नाही व्हायचं. उगं डोस्क्याला किट किट नका". मी परत म्हणतो, "मी काही जलम घेण्या आधी शिकलो नाही. सुरुवातीला हळूहळू सवय झाली पेपर वाचण्याची अन् वाचण्याच्या नादातून मित्राच्या संगतीनं लिहायला शिकलो. मग त्या कविता वर्तमानपत्रातही प्रकाशित होत राहायच्या. मनाला बरं वाटायचं. आनंद मिळायचा. तोच आनंद अजूनही चालू आहे. तुला माहीतच आहे की"... यावेळी तिचं अर्ध लक्ष माझ्याकडे आणि अर्ध लक्ष दळण निसण्याकडे होतं. परवा परत बायकोला म्हणालो, "मी एवढं लिहितो अन् तू मदत करत नाहीस.. शिकले पाहिजे. लिहिले पाहिजे. रिकाम्या वेळेमध्ये मालिका बघत बसण्यापेक्षा पुस्तक वाचली पाहिजे. तू वाचायला शिकशील, वाचायची गोडी लागेल. त्यातून तुला आपोआप लिहायला सुचेल. मग तू मला मदत करायला आपोआप तयार होशील. आणि मग आपण चांगल्या प्रकारे लिहित राहू... हे ऐकूण पुन्हा म्हणते, तुम्ही करतायना ? तर मग बस झालं.! तरीही मी माझा पिच्छा सोडत नाही. एके दिवशी परत म्हणालो, "तुला माझ्याबद्दल काय वाटते ते तरी एका कोऱ्या



पानावर किंवा तू मोबाईलवर टाईप कर. तुला जमेल तसे जमेल तितके शब्द देताना माझ्यासाठी चुकू दे. चुकलं तरी काही हरकत नाही. पण लिहायला सुरुवात कर".. तोंडापुरतं "हो" म्हणते पुन्हा दुर्लक्ष करते. अशातच एके दिवशी आवाज आला, "अहो! तुम्ही रोज म्हणता ना लिहित जा म्हणुन.. हे घ्या तुमच्यासाठी मी लिहिलंय". असं म्हणून कोरा पेपर काळा होऊन आला माझ्या हातात.. तेवढ्यात एक नजर तिच्याकडे आश्चर्याने टाकलो. तीही गालात हसली. मला वाटलं खरंच आनंदाची गोष्ट आहे ही.. असं म्हणून बसलेलं चटकन उठून "काय लिहिलेस बघू दे" असं म्हणत हातामध्ये पेपर घेतला. त्यात दोन पेपर होते स्टापलर केलेले. वरचा पेपर कोरा आणि खालचा पेपर लिहिलेला. तेवढ्यात सांगत होती, "पान उलटून बघा".. "बरं" म्हणून वरचं पान उचललो. खालच्या पानावर बघतो तर काय कुठल्याही विषयावरचं लिखाण नसून ती केवळ दिवाळीनिमित्त लागणाऱ्या किराणा सामानाची यादी होती. हसावं का रडावं ? हेच सुचत नव्हतं. कोपरापासून हात जोडलो आणि "धन्य आहेस तू" असं म्हणून गप्प गुमान यादी घेऊन किराणा भरायला गेलो. तेव्हा दिवाळीचा फराळ गोड झाला.

गोविंद कवळे
इळेगाव, ता. उमरी,
जि. नांदेड, ७३८७२६७२१९

# मराठवाडा साहित्य संमेलनांची परंपरा



अरविंद भराडे
संपर्क क्र. 81808 93716

आधुनिक केसरी

**मराठवाड्याची भाषा आणि साहित्याने एकूण मराठी साहित्यविश्वाला खूप मोलाचे योगदान दिले आहे. मराठी, ऊर्दू, कन्नड, तेलगु आणि इंग्रजी या पाच भाषांचा प्रभाव असल्यामुळे पंचधारांचा प्रदेश अशी मराठवाड्याची ओळख आहे. मराठवाड्याची भाषा प्रमाणभाषेच्या अगदी जवळची आहे. या प्रदेशातील अनेक संतांनी, लेखक, कवी, कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार, समीक्षकांनी आपल्या लेखनातून मराठवाड्याची मान उंचावण्याचे कार्य केले आहे. मराठी साहित्याला नवीन अनुभवविश्व देणाऱ्या दलित-ग्रामीण या साहित्य प्रवाहाच्या चळवळीची बीजे याच भूमीत रूजली. मराठवाडा ही एकीकडे संतांची भूमी म्हणून ओळखली जात असली तरी दुसरीकडे याच भूमीत जातीयतेच्या मुद्द्यावरून अन्याय-अत्याचाराच्या घटना सातत्याने घडतात.**

विद्यापीठ नामांतर आंदोलनात हे प्रकर्षाने घडले. त्याचबरोबर मराठवाडा विकास आंदोलन असेल किंवा मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या क्रांती मोर्चाची सुरूवातही मराठवाड्याच्या भूमीतून झाली. अशा अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण असलेला हा प्रदेश आहे. साहजिकच या प्रदेशातील साहित्यवरील या वैशिष्ट्यांच्या प्रभामुळे मराठवाड्यातील साहित्य आशय संपन्न बनले आहे. मराठवाडा साहित्य संमेलनाच्या निमित्ताने एकूणच मराठवाड्याचा ऐतिहासिक आढावा समजून घेणे गरजेचे आहे. जेणेकरून या प्रदेशातील साहित्याचे आकलन होण्यास मदत होते.

मराठवाड्याचा इतिहास अभ्यासला तर अनेकार्थांनी खूप संपन्न राहिलेला हा प्रदेश होता, हे लक्षात येते. या भूमीला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्राचा समृद्ध असा वारसा मिळालेला आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील औरंगाबाद, पितळखोरा, अजिंठा, वेरूळ येथील प्राचीन लेण्या, विहारे. या परिसरातील सोळा भिक्खू तथागत गौतम बुद्धांना भेटण्यासाठी गेले होते असाही संदर्भ आहे. जालना येथील तत्कालीन भोगवर्धन व आताच्या भोकरदनशी निगडित बौद्ध संस्कृतीचे संदर्भ आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रसिद्ध तेर येथील लेण्या. लातूर जिल्ह्यातील खरोसा लेणी. नांदेड परिसरातील प्रसिद्ध भिक्खू बावरी, कंधारमध्ये सापडलेला आठव्या शतकातील शिलालेख हे संदर्भ महत्त्वपूर्ण आहेत. बौद्ध साहित्याचे चिंतक स्मृतिशेष राजाभाऊ ढाले यांनी नांदेड जिल्ह्यातील थेरबन नामक गावपरिसराचा बौद्ध धम्माशी अनुबंध पडताळून पहिला. यावरून प्राचीनकाळी मराठवाड्याच्या भूमीला वैभवशाली बौद्ध संस्कृतीचा इतिहास असल्याचे लक्षात येते.

आज ज्या प्रदेशाला मराठवाडा म्हणतात त्याची तशी ओळख इ. स. १८६१ पासून झालेली आहे. हैदराबाद संस्थानाच्या ज्या भागात मराठी भाषेचा वापर होता त्याला प्रारंभी 'मराठवाडा' म्हणून संबोधले जाऊ लागले. म्हणजे 'मराठवाडा' या नामाभिधानाला साधारणतः दीडशे वर्षांचा इतिहास आहे. अर्थात मराठवाड्याचा इतिहास इसवी सन पूर्व ४ थ्या शतकापासून असला तरी त्याही पूर्वीच्या काळात या ठिकाणी मानवी वसती होती, असे अभ्यासक सांगतात. सातवाहनांनी दक्षिण भारतात पहिले साम्राज्य स्थापन केले, मराठवाडा म्हणून नंतर प्रसिद्ध पावलेला हा प्रदेश भारताच्या नकाशावर झळकला. त्याआधी हा प्रदेश अश्मक, कुंतल व मूलक अशा जनपदात विखुरलेला होता. त्यामुळे सातवाहनांना मराठवाडा, महाराष्ट्राचे खरेखुरे पहिले सम्राट म्हणणे यथोचित ठरते. दक्षिण भारतात या साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवणारे सातवाहन हे मराठवाड्याचे होते. त्यांनी इसवी पूर्व २५० ते इ. स. २६० असे सुमारे ४५० वर्षे राज्य केले. सातवाहन सत्तेच्या पतनानंतर काही काळ अस्थिरतेचा आणि अशांततेचा गेला. नंतर वाकाटक घराण्याचे राज्य आले. वाकाटकानंतर या परिसरावर मरुण्ड, त्रैकुटक, कलचुरी व बादामीच्या चालुक्य घराण्यांनी भिन्न भिन्न प्रदेशात वेगवेगळ्या कालखंडात राज्य केले. आठव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रकुटाचे राज्य मराठवाड्यावर आले. कंधार, धारूर, तेर, पैठण ही तत्कालीन महत्त्वाची नागरी केंद्रे होती. याच काळात जगप्रसिद्ध कैलास लेणे कोरले गेले. चालुक्यांचे मंडलिक असलेल्या यादवांनी संधी मिळताच स्वातंत्र्य घोषित केले. यादव काळात या परिसरात पुन्हा सुबत्ता आणि समृद्धी आली.

मात्र अल्लाउद्दिन खिलजीने १२९४ मध्ये यादवांचा पराभव केला. तेव्हापासून मराठवाडा प्रदेश १९४८ पर्यंत इस्लामी राजवटीच्या अधिपत्याखाली होता. यात काही काळ बहामणी, अहमदनगरची निजामशाही, अदिलशाही, बरीदशाही, मोगल, हैदराबादची निजामशाही आदी मुस्लिम राजवटींनी विविध काळात विभिन्न प्रदेशावर राज्य केले. मराठवाड्यात १७२४ ते १९४८ पर्यंत निजामशाही राजवट होती. या काळात दहा राजे सत्तेवर आले. त्यात सात निजाम राजे होते.

भौगोलिकदृष्ट्या विचार केला तर पूर्वीच्या हैदराबाद संस्थानातील आणि नंतर महाराष्ट्र राज्यातील आठ जिल्ह्यांचा प्रदेश असलेला भाग मराठवाडा नावाने ओळखला जातो. अजिंठा पर्वत रांगांनी खानदेश, जालना परिसरातील सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगांनी विदर्भापासून, उस्मानाबाद, बीड परिसरातील बालाघाट पर्वताच्या रांगांनी पश्चिम महाराष्ट्रापासूनचे वेगळेपण या प्रदेशाला लाभले आहे. गोदावरी, दुधना, खेळणा, पैनगंगा, सिंदफणा, शिवना, गिरजा, तेरणा, मांजरा, मन्याड, पैनगंगा नद्यांनी इथला काही भाग सुपीक केला असला तरी बेतातच पाऊस पडत असल्याने सततच्या दुष्काळी परिस्थितीला इथल्या जनतेला तोंड द्यावे लागलेले आहे.

मराठवाड्याची साहित्य परंपरा :

मराठवाडा भूमीत वारकरी संप्रदाय, महानुभाव पंथ, दत्त संप्रदाय, नाथ संप्रदाय उदयाला आले. आपेगावचे संत ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडं, नरसव बामणीचे संत नामदेव, पैठणचे संत एकनाथ, जांबचे समर्थ रामदास, गंगाखेडच्या संत जनाबाई जनाबाई, मुंगी पैठणचे विसोबा खेचर, तेरच्या ढोकी येथील गोरोबा कुंभार अशा अनेक संत मंडळींच्या विचाराने मराठवाडा संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. मराठवाड्याला समृद्ध अशा भाषा आणि साहित्याचा समृद्ध वारसा लाभला आहे. मराठी भाषेचा आग्रहाने पुरस्कार करणारे महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांच्या प्रेरणेने साहित्य निर्माण करणारे अनेक कलावंत मराठी साहित्याला मिळाले. मुकुंदराज यांचा विवेकसिंधू (११८८) हा मराठीतील आद्यग्रंथ मानला जातो. ते अंबाजोगाईचे असून त्यांना मराठीतील आद्य कवीचाही मान दिला जातो. तर आद्य कवयित्री महदंबा उर्फ महादाईसा ही अंबड तालुक्यातील रामसगाव येथील आहे. बोरी येथील भास्कर भट्ट बोरीकर, केसोबास इत्यादी अनेक रचनाकार मराठवाड्याच्या मातीतील आहेत.

प्राचीन मराठी साहित्यात मोलाचे योगदान देणाऱ्या मराठवाड्यात निजाम राजवटीत फारशी लेखननिर्मिती झालेली दिसत नाही. शेकडो वर्षांच्या इस्लामी राजवटीत राहिलेल्या मराठवाड्याची प्रतिभा कुंठीत झाली. सुधारणांचा, शिक्षणाचा, नव्या विचारांचा संपर्क नसल्यामुळे मराठवाड्याचे प्राचीन वैभव लुप्त झाले. अठराव्या-एकोणिसाव्या शतकात हे जीवन आणखी शुष्क झाले. शिवाय साहित्यिक परंपरा खंडीत झाली. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील लोकांना इंग्रजी राजवटीसोबत नव्या सुधारणा, नवे विचार, नवे साहित्य आदींचा संपर्क आला. या भागात सामाजिक-राजकीय वातावरण निर्माण झाले. त्यामानाने मराठवाड्यात उच्चशिक्षणाची सोय नव्हती. हैदराबाद संस्थानामध्ये १९३५ मध्ये स्टेट काँग्रेसची स्थापना झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेड्युल कास्ट फेडरेशनच्या निमित्ताने आंबेडकरी चळवळीमुळे मराठवाड्यात जनजागृतीला प्रारंभ झाला. हैदराबाद संस्थानाच्या विलिनीकरणानंतर शिक्षण, नवे विचार, जागृती,




विविध चळवळी सुरू झाल्या. त्यामुळे नव्याने साहित्य, संस्कृती, अन्य कला या संदर्भातील चळवळी सुरू झाल्या. तारा परांजपे म्हणतात, ''हैदराबाद संस्थान सांस्कृतिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण होते. निजाम राज्यात योगायोगाने तेलुगु, कानडी आणि मराठी भाषक एकत्र आले होते. ..भाषिकदृष्ट्या हा पंचधारांचा प्रदेश. तेलुगु, कानडी, मराठी या लोकांच्या भाषा आणि उर्दू व इंग्रजी या राज्यकर्त्यांच्या भाषा होत्या.''

१९०० ते १९४८ या कालखंडात मराठवाडा हा निजामाच्या जुलमी सत्तेच्या अधिपत्याखाली आणि भाषिक गुलामीत खितपत पडलेला होता. याकाळात सर्वप्रकारच्या नागरी स्वातंत्र्याची गळचेपी झाली. भारताला स्वातंत्र्य मिळूनही मराठवाडा मात्र तब्बल एक वर्ष निजामाच्या तावडीतच होता. या काळात या प्रदेशाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाची मोठी पिछेहाट झाली. मराठी भाषेचा समृद्ध वारसा लाभलेली ही भूमी महाराष्ट्रापासून विभक्त होती. म्हणून याकाळात वाङमयीन मूल्ये रूजण्यास वेळ लागला. मराठी भाषेवरील बंदी आणि प्रकाशनाची अत्यल्प साधने यामुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात लेखन होऊ शकले नाही. निजामविजय, नागरिक, राजहंस, विहंगमाला ही नियतकालिके अल्पकाळ चालली. मराठी भाषाबंदी, प्रसिद्धी माध्यमे व प्रकाशकांचा अभाव यामुळे लेखक वर्ग कमी प्रमाणात लिहिणारा होता. मराठवाडा निजामी जोखडातून मुक्त झाल्यानंतर हळूहळू येथे साहित्यनिर्मिती अधिक जोमदार होऊ लागली.

स्वातंत्र्यानंतर मराठवाड्यात वैविध्यपूर्ण लेखन करणारांची परंपरा राहिली आहे. ना. गो. नांदापूरकर, कहाळेकर महाराज, नरहर कुरुंदकर, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. यू. म. पठाण, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. सुधीर रसाळ, प्रा. बाळकृष्ण कवठेकर, श्रीधर नांदेडकर, केशव सखाराम देशमुख, केशव वसेकर, केशव सखाराम देशमुख ही समीक्षा क्षेत्रातील जुन्या व नव्या पिढीतील महत्त्वाची नावे आहेत.

मराठवाड्यात १९०० ते १९४८ या कालखंडात कथा लिहिणारे दिवाकर कृष्ण आणि बी. रघुनाथ हे महत्तवाचे लेखक आहे. स्वातंत्र्यानंतर कथा आणि कादंबरी लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये रा. रं. बोराडे हे ठळक नाव आहे. त्याचबरोबर योगीराज वाघमारे, बंकट पाटील, सुखराम हिवराळे, सोपान हळमकर, भास्कर चंदनशीव, लक्ष्मीकांत तांबोळी, नागनाथ कोत्तापल्ले, अविनाश डोळस, डॉ. वासुदेव मुलाटे, बा. ह. कल्याणकर, गणेश आवटे, जगदिश कदम, गणेश घांडगे, रविश्चंद्र हडसनकर, श्रीराम गुंदेकर, उत्तम बावस्कर, बाबा भांड, प्रकाश मेदकर, प्रकाश मोगले, भीमराव वाघचौरे, एकनाथ सोनवणे हे महत्त्वाचे कथाकार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात दे. ल. महाजन, डॉ. ना. गो. नांदापूरकर, सो. ग. मनाटकर यांची कविता महत्त्वाची राहिली आहे. त्याचबरोबर वा. रा. कांत हे ज्येष्ठ कवी आहेत. ना. धों. महानोर, फ. मुं. शिंदे, फ. म. शहाजिंदे, भ. मा. परसवाळे, त्र्यंबक सपकाळे, गजमल माळी, चंद्रकांत पाटील, भगवंतराव क्षीरसागर, बापूराव जगताप, विश्वास वसेकर, महावीर जोंधळे, राम दोतोंडे, दासू वैद्य, इंद्रजीत भालेराव, भारतभूषण गायकवाड, श्रीकांत भराडे, राजेंद्र गोणाकर, महेश मोरे आदी कवींनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

स्वातंत्र्यानंतर मराठवाड्यातील स्त्रियांच्या प्रतिभेलाही धुमारे फुटले. सुहासिनी इर्लेकर, उषा हस्तक, तारा परांजपे, लता मोहरीर, अरुणा लोखंडे, शैला लोहिया, अनुराधा पाटील, ललिता गादगे, रेखा बैजल, छाया महाजन, इंदुमती जोंधळे, मथु सावंत, प्रतिमा इंगोले, प्रतिभा अहिरे, संध्या रंगारी, वृषाली किन्हाळकर, उर्मिला चाकूरकर इत्यादी नावे सांगता येतील.

मराठवाडा साहित्य संमेलनांची परंपरा :

या सगळ्या पार्श्वभूमीवर मराठवाडा साहित्य संमेलनांच्या परंपरेचा विचार करावा लागतो. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या व्यापक आणि मोठ्या मंचाचा विचार केला तर प्रादेशिक साहित्यिकांना या संमेलनात पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही. या गरजेतूनच प्रादेशिक साहित्य संमेलनांचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. प्रादेशिक साहित्य परंपरेची रुजवात बहुधा मराठवाडा साहित्य संमेलनाच्या रूपानेच सुरू झाली.

१, २ आणि ३ ऑक्टोबर १९३७ रोजी हैदराबाद येथे बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले मराठवाडा साहित्य संमेलन पार पडले. आजवर द. वा. पोतदार, ग. त्र्यं. माडखोलकर, दिवाकर कृष्ण, ना. गो. नांदापूरकर, वा. रा. कांत, डॉ. यू. म. पठाण, डॉ. गंगाधर पानतावणे, रा. रं. बोराडे, प्र. ई. सोनकांबळे, ना. धों. महानोर, डॉ. सुधीर रसाळ, सुहासिनी इर्लेकर, डॉ. ऋषिकेश कांबळे, बाबा भांड आदी दिग्गज लेखकांनी या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले आहे.

मराठवाडा साहित्य संमेलनाला सुमारे ८४ वर्षांची परंपरा आहे. या साडेआठ दशकात आतापर्यंत ४२ संमेलने झाली. निजामी राजवटीची दडपशाही, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, कोरोना संसर्ग यासारख्या वेगवेगळ्या कारणांनी या साहित्य संमेलनांच्या आयोजनात खंड पडला. ज्येष्ठ कादंबरीकार बाबू बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद येथे ४३ वे मराठवाडा साहित्य संमेलन येत्या २ व ३ डिसेंबर रोजी गंगापूर येथे होत आहे. ज्येष्ठ लेखक डॉ. जगदिश कदम हे या संमेलनाचे अध्यक्ष आहेत.

एकंदरीत मराठवाडा साहित्य संमेलनांसारख्या प्रादेशिक स्तरावर होणाऱ्या संमेलनांचा विचार करता, त्याचा मराठी साहितय विश्वाला निश्चितपणे लाभ होतो. कारण अशाप्रकारच्या संमेलनांतून स्थानिक लेखक, कवी, समीक्षक यांच्या अभिव्यक्तीला वाव मिळतो. त्या प्रदेशातील साहित्यात उमटलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची ओळख रसिकांना यानिमित्ताने होते. मराठवाड्यातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनाचे यथार्थ चित्रण करण्यात मराठवाड्यातील लेखक, कवींनी निश्चित प्रामाणिक प्रयत्न केले आहेत.

शेकडो वर्षांच्या निजामी राजवटीमुळे मराठवाड्यावर सरंजामशाहीचे वर्चस्व राहिले. सरंजामशाही पद्धतीमुळे संपूर्ण मराठवाडाभर सरंजामशाहीचाच प्रभाव पडलेला दिसून येतो. जमिनदारी पद्धती, कुटुंब पद्धती, स्त्री-पुरुष संबंध, विचार स्वातंत्र्य या सर्व गोष्टींवर या पद्धतीचा परिणाम होतो. तो मराठवाड्यावरही झालेला आहे. विशेषतः स्त्रीच्या आचार-विचारावर अधिक बंधने असणे हे सरंजामशाहीचे वैशिष्ट्य असते. एकूणच समाजात मानसिक गुलाममिरीची परिस्थिती असते. कमी-अधिक प्रमाणात आजही ही वैशिष्ट्ये मराठवाड्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात आढळतात. त्याचे प्रतिबिंब साहित्यातही उमटलेले आहे. शोषितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांचे, त्यांच्या व्यथा-वेदनांचे चित्रण बऱ्यापैकी झाले आहे. मराठवाडा सातत्याने दुष्काळी भाग राहिला आहे. त्याचेही विदारक चित्रण ग्रामीण कथा-कादंब-या आणि कवितांमधून आलेले आहे. या सगळ्या बाबींची साधक-बाधक चर्चा संमेलनातून होईल आणि प्रकाशन व्यवसायालाही काही प्रमाणात उभारी मिळेल, अशी अपेक्षा या निमित्ताने करायला हरकत नाही.

# साहित्य, कला, क्रीडा व संस्कृतीचा महासंगम



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात 2018 पासून झाली.त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरमध्ये खासदार महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जातो.त्याचप्रमाणे याही वर्षी दिनांक 24 नोव्हेंबर पासून खासदार महोत्सवाला सुरुवात झाली व विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून देशाच्या संस्कृतीचे दर्शन दिनांक 5 डिसेंबरपर्यत सर्वांनाच पहायला मिळेल. यापध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय मंत्री माननीय नितीनजी गडकरी यांनी नागरिकांसाठी आयोजित केलेले आहेत याकरिता त्यांचें मनापासून स्वागतच.याकार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.**

यात मुख्यत्वे करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या माध्यमातून, गाण्यांच्या माध्यमातून व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जातो.या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्माची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.सध्या सुरू असलेल्या खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आपल्याला महाराष्ट्राचा वारसा दिसून येईल.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे. पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने याहीवर्षीही आपल्याला खासदार महोत्सव पहायला मिळत आहे.सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे.परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते.भाजपा सत्तेत असो वा नसो नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम,कला, साहित्य, क्रिडा,सामाजिक उपक्रमांमध्ये खंबीरपणे भूमिका बजावुन आपले योगदान देत असतात.आज गडकरींच्या पुण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुलांचा बोलबाला दिसून येतो.नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते. हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे.नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे.आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते.संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय.आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील संस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.आजच्या पिढीला मोबाईलमुळे व सोशल मीडियामुळे आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येत आहे.परंतु नवीन पिढीला सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती किंवा देशाची संस्कृतीचे जतन कसे करावे याची माहिती अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मिळते. खासदार महोत्सवाच्या अनुषंगाने आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.1947 नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे.कारण खरोखरच महाराष्ट्राचा व देशाच्या विकास मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा हा काळ असल्याचे दिसून येते.ज्या दिवसापासुन गडकरीजी खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे.त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे ही नागपूरकरांसाठी,महाराष्ट्रासाठी व देशासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते.यासाठी त्यांनी आपली ताकद पुर्णपणाला लावली आहे.भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात.परंतु नागपूरमध्ये कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही. नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी,ताजबाग,गणेश टेकडी,चर्च इत्यादी नामांकित अनेक धार्मिक पुरातन स्थळे आहेत.त्याचे जतन सर्वधर्मीय करतात.गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे. नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभुमि म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते.परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात. ही नागपूरसाठी,नागपूरकरांसाठी व देशासाठी सन्मानाची बाब आहे.

# जीवनमूल्यांच्या लढाईसाठी : 'आम्ही युद्धखोर आहोत'



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेनेच अनेकांच्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला. माणूस माणसाचे, माणुसकीचे जिने जगायला लागला. आंबेडकरी विचार आणि आंबेडकरी चळवळ ही मानवता प्रस्थापित करण्यासाठी धडपडत असते. स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय या लोकशाही मानवी कल्याणांच्या मूल्यासाठी सतत कार्यकर्ता,लेखक,कवी आंबेडकरी विचारांच्या माध्यमातून धडपडत असतो. शोषण,गुलामी,अन्याय,अत्याचाराविरुद्ध प्राणपणाने लढत असतो. त्याला कुठल्याच पुरस्काराची किंवा फुशारकीची अपेक्षा नसते. त्यासाठी तो लिहीतही नसतो. आपल्या आंबेडकरी चळवळीच्या व विचारांच्या माध्यमातून तो माणसाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्राणपणाने कार्य करत असतो. लिहित असतो.**

कुठल्याही फळाची अपेक्षा न करता तो लढत असतो.आजचा सभोवताल हा अन्याय,अत्याचार,गुलामी,शोषण, जातीयवाद, धर्मांधतेने बरबटलेला आहे.तो सभोवताल माणसाच्या जीवनाला इजा पोहोचवत आहे. मानवी जीवन उद्ध्वस्त करू पाहत आहे. त्या विरुद्ध मानवतेची, माणुसकीची ज्योत पेटवून ती परिस्थिती नाहीशी करणे, तिचा नायनाट करणे, तिच्यावर प्रहार करणे, तिचा मुकाबला करणे, त्या परिस्थितीशी दोन हात करून योग्य मार्ग दाखवणे अत्यंत गरजेचे असते. हा मार्ग अनेक वेळा खडतर असतो. जीवघेणा असतो. त्रासाचा असतो. तरीही तो स्वीकारणे, त्याच्यासाठी निष्ठेने लढणे महत्त्वाचे असते. ही लढाई लढण्यासाठी विविध मार्ग आहेत. त्या विविध मार्गांपैकी साहित्य हा एक मार्ग आहे. ही लढाई लढताना अनेक जण हारून आणि गुदमरून जातात. मागे राहतात. कारण ती लढाई लढताना फक्त स्वार्थ पाहतात. वरवरची लढाई लढत असतात. पण या साऱ्या परिस्थितीवर स्वार होऊन आंबेडकरी विचारांने लढाई लढून त्या परिस्थितीला हतबल करणारे काही साहित्यिक,कवी आहेत; पण ते फार कमी बोटावर मोजण्या इतकेच आहेत. त्यामध्ये कवी प्रशांत वंजारे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

' आम्ही युद्धखोर आहोत'हा प्रशांत वंजारे यांचा 'शरसंधान ' या पहिल्या कवितासंग्रहाच्या नंतर दहा वर्षांनी आलेला कवितासंग्रह आहे. बोधीपर्ण प्रकाशनाने' आम्ही युद्धखोर आहोत' हा कवितासंग्रह नुकताच प्रकाशित केला आहे. दोनशे वीस पृष्ठाच्या कवितासंग्रहात एकशे तेहतीस नानाविध आशयाच्या कविता आहेत.सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.यशवंत मनोहर यांची प्रस्तावना या कवितासंग्रहाला योग्य न्याय देणारी आहे. डॉ. यशवंत मनोहर या कवितासंग्रहाची पाठ राखण करताना म्हणतात की,"प्रशांत वंजारे हा एकाच वेळी कार्यकर्ता कवीही आहे आणि विचारकर्ता कवीही आहे. तो साहित्य चळवळ चालवतो. साहित्य चळवळीचे बॅनरही त्याच्या हातात आहे. धम्म चळवळीतही तो सत्यच सांगायचे काम करतो. परिवर्तनाच्या वरील सर्वच संदर्भातील चळवळीशी या कवीचे संबंध आहेत. हे संबंधच त्याचे जीवनभान अद्ययावत करीत राहतात. प्रशांत वंजारे यांची कविता ही दिशा हरवलेल्या युगावर निर्णायक भाष्य करणारीही कविता आहे आणि युगांतराचीही कविता आहे. वर्तमानाच्या सर्वच ठसठसत्या जखमा या कवितेने उराशी कवटाळलेल्या आहेत. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांशीमधील अंधश्रद्धावर कवीने या कवितासंग्रहात निकराचे हल्ले चढवलेले आहेत. ' आम्ही युद्धखोर आहोत'या कवितासंग्रहात अलीकडच्या काळातील एक लक्षणीय काव्याविष्कार आहे."

आज जिकडे तिकडे अनेक कवींचे पीक अलीकडच्या काळात उगवलेले दिसते आहे. जो तो कोणीही कवी होताना दिसतो आहे. ज्याच्या कवितेत कोणतीही जीवनमूल्य, संस्कारमूल्य दिसत नाही तरीही असे कवी नावारुपाला येताना दिसत आहेत. अनेक कवी भूमिकाहीन आहेत. खरे तर साहित्यिकांनी भूमिका घेऊन लिहिणे गरजेचे असते. त्यामुळेच तर समाजात परिवर्तन घडवून येत असते. भूमिका विषयी कवी प्रशांत वंजारे यांनी आपल्या मनोगतात म्हटले आहे की,'भूमिकाविहीन साहित्य हे पायलट नसलेल्या विमानासारखे असते. साहित्यातून भूमिका न घेणे किंवा भूमिका घेता न येणे हा लेखक कलावंताचा वैचारिक मृत्यूच असतो.'अगदी त्याप्रमाणे अनेक कवी, साहित्यिक स्वार्थ, लाचार, पुरस्कार यासाठी स्वतः:चे जीवन आणि साहित्य मातीमोल करताना दिसत आहेत. त्यांच्या विचारात आणि आचरणात फार फरक असतो. ताळमेळ लागत नाही. त्यांच्याजवळचा विचार आणि आचार तात्पुरता असतो.त्यामुळे त्यांच्या विचारांचा, त्यांच्या कलाकृतीचा समाज मनावर,वाचकावर मनावा तेवढा कोणताही परिणाम होताना दिसुन येत नाही. डॉ.यशवंत मनोहर म्हणतात त्याप्रमाणे 'प्रशांत वंजारे यांची कविता ही दिशा हरवलेल्या युगावर निर्णायक भाष्य करणारी कविता आहे. वर्तमानाच्या सर्वच ठसठसत्या जखमा या कवितेने उराशी कवटाळलेल्या आहेत.'खरे तर आज वर्तमान फार खराब आहे. मानवता संपविणारा आहे. मुका करणारा आहे. माणसाचे अस्तित्व संपवून टाकणारा आहे. जातीयता,धर्मांधता वाढवणारा आहे.अशात सारे साहित्यिक गप्प आहेत.कुणी काहीच बोलत नाही. बोललं तर देशद्रोही ठरवलं जात आहे. या परिस्थितीत अनेक माणसं दिशाहीन होत आहेत. संपून जात आहेत.संपवून टाकत आहेत. अशा काळात प्रशांत वंजारे आपल्या कवितेच्या माध्यमातून असाहिष्णु परिस्थितीवर प्रहार करताना दिसतात. दिशाहीन झालेल्यांना शब्दांच्या माध्यमातून रस्ता आणि उजेड दाखवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या विचाराने त्यावर प्रहार करतात. स्वाभिमानाची लढाई लढताना दिसतात. त्या जखमा नष्ट करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्याबरोबर लढाई करताना दिसतात. म्हणूनच कवितासंग्रहाला 'आम्ही युद्धखोर आहोत'असे शीर्षक देतात. तेही अगदी रास्त आहे.




तथागत बुद्धांनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला मानवी मूल्य प्रस्थापित करून देण्यासाठी अनेक लढाया लढल्या,संघर्ष केले, आंदोलने केली.त्यांचे अनुयायी आम्ही आहोत म्हणून आम्ही मानवतेसाठी लढू ही भूमिका घेऊन कवी लिहीत आहे. त्यामुळेच कवितासंग्रहाला दिलेले शीर्षक योग्य आहे.' आम्ही युद्धखोर आहोत' हे शीर्षक प्रेरणा देणारे आहे. थंडाव्यालाही उब देणारे आहे. क्रांतीचा विचार रुजविणारे आहे. अनेकांच्या मनात बळ निर्माण करणारे आहे.'

'आम्ही युद्धखोर आहोत'या कवितेत ते म्हणतात की,

**" आमची आयुष्येच**
**युद्ध असल्याचा**
**आहे देदीप्यमान इतिहास**
**बुद्धापासून**
**आंबेडकरापर्यंत**
**माणुसकी नाकारणारे तह**
**कधीच बसले नाहीत**
**आमच्या युद्धनीतीत**
**माणूस जगण्या जगवण्यासाठी**
**आमचा युद्ध प्रवास**
**आमची अट एकच**
**युद्ध लढलंच जावं**
**फक्त उदात्त मानवी मुल्यासाठी**
**होय**
**आम्ही युद्धाच्या बाजूने आहोत**
**आम्ही युद्धखोर आहोत**

आजच्या हल्लीच्या काळात ही कविता अनेकांना प्रेरणा देणारी आहे. चळवळीला, कार्यकर्त्याला बळ देणारी आहे. कारण आजच्या काळात माणूस काय करतो आहे, कसं जगतो आहे, जीवन मूल्यांना किती सांभाळतो आहे हे काही कळत नाही. आज जिकडे तिकडे माणसे स्वत्व हरवून बसलेले दिसत आहेत. खाजगीकरण, उदारीकरण,महागाई,भ्रष्टाचार,जातीयता,धर्मांधता, अनैतिकता,आरक्षण,कंत्राटी धोरण,नोकऱ्यावरील प्रहार अशा अनेक प्रश्नांमुळे मानवी जीवन, मानवी मूल्य नष्ट होताना दिसत आहेत. तरीही कुणीही काही बोलत नाही. राजकारणात आचारांची, विचारांची कुठलीही नैतिकता राहिलेली दिसत नाही. कुणी कुणाकडेही जात आहे. स्वार्थासाठी, सत्तेसाठी सत्तांतर करत आहेत. त्याचे कुणालाच काही वाटत नाही. जनाची नाही तर मनाचीही त्यांना वाटत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या लोकशाहीवर म्हणजेच स्वातंत्र्य, समता,बंधुता ,न्याय,प्रेम,करुणा, मानवता अशा उदात्त मानवी मूल्यावरही प्रहार होत आहेत. ते मूल्यच अनेकजण उद्ध्वस्त करून पाहत आहेत. तर त्या मूल्यासाठी आम्ही लढू. बुद्धापासून आंबेडकरापासूनचा आमचा लढण्याचा इतिहास आहे. त्यासाठी आम्ही युद्धखोर आहोत. हे मानवतेची प्रेरणा जागवण्याचे कार्य कवी प्रशांत वंजारे आपल्या विविध कवितेतून करताना दिसताहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी'शेड्युल कास्ट फेडरेशन'बरखास्त करून'भारतीय रिपब्लिकन पक्ष'स्थापन करण्याची घोषणा 30 सप्टेंबर 1956 मध्ये केली होती. शेड्युल कास्ट फेडरेशनच्या अपयशाबद्दल त्यांना वाईट वाटत होते. म्हणून अखिल भारतीय स्तरावर कार्य करण्याचा त्यांचा मानस होता. त्यासाठी त्यांना सर्वसामावेशक असा एक पक्ष स्थापन करून ते कार्य पूर्ण करायचे होते. परंतु त्यांचे महापरिनिर्वाण सहा डिसेंबर 1956 झाली झाले. त्यामुळे त्यांचे कार्य अपुरेच राहिले. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर 'रिपब्लिकन पक्षा'ची स्थापना करण्यात आली. पण आज घडीला या रिपब्लिकन पक्षाचे अनेक तुकडे झाले. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारापासून हा पक्ष दूर गेलेला दिसतो. त्यामुळे समाजातील अन्याय अत्याचाराला व विविध प्रकारच्या कार्याला खीळ बसलेली दिसून येते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न आम्ही आजही तडीस नेऊ शकलो नाहीत याची खंत कवीला आहे. म्हणून कवी'रिपब्लिकन' या कवितेत म्हणतो की,

**'याच झोपडीत राहून**
**मी देईल रिपब्लिकन ची ललकारी**
**याल तर तुमच्या सोबत**
**नाहीतर तुमच्या शिवाय**
**याच झोपडीत गाडेल**
**मी माझ्या शरीराचा निळा झेंडा**
**अन होऊन जाईल या देशासाठी**
**आंबेडकरांचा मॅनिफिस्टो'**

26 जानेवारी 1950 पासून भारतीय लोकशाही अस्तित्वात आली आहे. या लोकशाहीने अनेकांचे जीवन बदलले आहे. परंतु आज घडीला लोकशाहीवर विविध मार्गाने हल्ले होताना दिसत आहेत. स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय या मूल्यांची मोडतोड केली जाते आहे. जात, धर्माच्या नावाने भांडणे लावली जात आहेत. जिकडे तिकडे विषमतेने थैमान घातले आहे. न्यायव्यवस्था ही सत्तेची गुलाम झाल्यासारखी दिसते आहे. भारतीय संविधानाने मानवी कल्याण साधता येते.हे मोडून काढण्याचा जोरकसपणे प्रयत्न केला जात आहे. हुकूमशाही, भांडवलशाही व जातशाही चे वर्चस्व आज वाढलेले दिसत आहे. म्हणून सर्वांना सावध करण्याचा इशारा कवी नया भारत कवितेत देतो आहे.

**"फंडामेंटल राइट्स झालेत पुस्तकबंद**
**मार्गदर्शक तत्त्वांनी टाकल्याय माना**
**कल्याणकारी राज्य झालंय स्वप्न**
**घटनेची कलमं झालीय**
**फक्त कायद्याच्या अभ्यासाची विषयवस्तू**
**सावधान..** लोकशाही शेवटच्या घटका मोजत आहे."

आज देशात जिकडे तिकडे सर्व क्षेत्रात जाहिरात व इतर माध्यमातून विकास झाल्याचे चित्र भासवले जाते आहे. पण विकास मात्र कुठेच दिसत नाही. विकासात माणूस गायब होत चालला आहे. खाजगीकरणाने माणसाचे कंबरडे मोडले आहे. जी.एस.टी.आली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. नोक-या संपत चालल्या आहेत. कंत्राटी धोरण अवलंबिले जात आहे. शाळा महाविद्यालय बंद पडण्याची वेळ आली आहे. कंपन्या बंद पडल्या आहेत. अनेकांच्या नोक-या गेल्या आहेत. यासंदर्भात लोकशाहीचा आधारस्तंभ असणारा मीडियाही गप्प आहे. तो सत्यापासून दूर जात आहे. तरीही या समाजात जगणारी माणसे गप्पच आहेत. कुणीही आवाज उठवत नाही किंवा कोणी आवाज देतही नाही. लढत नाहीत. याविषयी कवी 'जागतिकीकरण'या कवितेत म्हणतो की,

**"विकासाचा मानवी चेहरा**
**न्याहाळता न्याहाळता**
**माणसाचा चेहरा झालाय गायब**
**आधुनिकतेच्या नावाखाली**
**आपण वाजवतो आपल्याच मृत्यूची रिंगटोन**
**सेझ झालयं सर्वांसाठी**
**स्पेशल सुसाईड झोन**
**शेतकऱ्यांच्या आत्महत्या**
**हा होत नाही मीडियासाठी बातमीचा विषय**
**माणसांची मुंडकी मोडून**
**जग बदलण्याचा चाललाय अट्टाहास**
**तरीही तुम्ही देत नाही**
**साद प्रतिसाद."**

आशा नानाविध प्रकारच्या विविध विषयावरील कविता अतिशय पोटतिडकेने कवी प्रशांत वंजारे यांनी या कवितासंग्रहात मांडल्या आहेत. कवी प्रशांत वंजारे हे प्रखर आंबेडकरवादी आहेत. सच्चा कार्यकर्ता आहे. बुद्धीप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ आहे. त्यामुळे समाजात बदल होणे अपेक्षित आहे. म्हणूनच इथल्या या दळभद्री व्यवस्थेवर शब्दांच्या माध्यमातून आसूड ओढला आहे. उपरोधिक टोले मारले आहेत. या सगळ्यातून मानवता निर्माण व्हावी ;हाच खऱ्या अर्थाने कवीचा उद्देश आहे. म्हणूनच या कवितासंग्रहातल्या कविता ह्या कुठलाही आड पडदा न ठेवता वाईटावर प्रहार करून अनेकांना जागृत करण्याचा,प्रेरणा आणि बळ देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. बुद्धभूषण साळवे यांचे मुखपृष्ठ व कवितेला चित्ररूप देणारे चित्रकार बळी खैरे यांचे चित्रही लक्ष वेधून घेतात. हा कवितासंग्रह प्रत्येकानेच आवर्जून वाचावा असा प्रेरणादायी आहे. **आम्ही युद्धखोर आहोत (कवितासंग्रह) : प्रशांत वंजारे बोधीपर्ण प्रकाशन,औरंगाबाद पृ.220, मूल्य:300 रू.**

# दिव्यांगांचा सन्मान हीच खरी शुभकामना...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**३ डिसेंबर हा दिवस संपूर्ण विश्वात जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात आणि इतर देशांत दिव्यांगांचा सन्मान करणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी आपण सर्वांनी आपल्या गावात, गल्लीत, शेजारी अथवा आपल्या घरातील सर्व दिव्यांग व्यक्तींचा सन्मान करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करावे. खरेतर दिव्यांगांचा सन्मान करणे, त्यांना सन्मानाने जीवन जगण्यासाठी आवश्यक ती मदत करणे हीच आपली खरी संस्कृती आहे.**

परंतु, दुर्दैवाने आपल्या समाजात, गावात,देशात दिव्यांग व्यक्तींचा तिरस्कार केला जातो. त्यांना त्यांच्या व्यंगावरुन टोमणे मारले जातात आणि दिव्यांगांना टोमणे मारुन हसणारे या जगात खूप लोक आहेत. अशा लोकांना मुद्दाम सांगावे वाटते की दिव्यांग व्यक्ती कोणाला मानायचे? अपघातामुळे पाय किंवा हाथ निकामा झाला असेल तर ही व्यक्ती दिव्यांग असते. अंध व अंशतःअंध, मुके, बहिरे, अस्थिव्यंग असणारे,फारच बुटके लोक यांना आपण दिव्यांग समजतो. यापैकी काहींना ही सुंदर सृष्टी पाहता येत नाही, काहींना चालता येत नाही तर काहींना बोलता येत नाही. मग अशा दिव्यांगांचा तिरस्कार करणे वा त्यांची हेटाळणी करणे आपल्या संस्कृतीत बसत नाही. रेल्वेने दिव्यांगांना सुखकर प्रवास करता यावा म्हणून एक विशेष डबा जोडलेला असतो.परंतु काही बिनडोक व उद्धट प्रवाशी निर्लज्जपणे या डब्यात चढतात. हे फार वाईट कृत्य आहे.पण याकडे मुद्दाम दूर्लक्ष केले जाते. शासन तर दिव्यांगांची नोकरभरती कधीच वेळेवर करत नाही. त्यामुळे शिक्षित दिव्यांगांची फार कुचंबना होते. दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने जगता यावे यासाठी व रोजगार किंवा व्यवसाय सुरु करण्यासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. दिव्यांग व्यक्तींनी शासनाच्या या योजनांचा लाभ घेऊन आपणही इतरांसारखे व्यवसाय करु शकतो हे दाखवून द्यावे. अभिमानाची बाब अशी की अनेक क्षेत्रांत दिव्यांग व्यक्ती उच्च कोटींचे कार्य करुन इतरांना लाजवत आहेत. जि.प. प्रशाला जळकोट या शाळेतील दिव्यांग शिक्षक अनंतराव धुळशेट्टे हे गिर्यारोहक आहेत. त्यांना समाजकार्य करण्याची खूप आवड आहे. माझे बंधू राजेंद्र गुळवे हे दिव्यांग असूनही उच्च विद्याविभूषित आहेत. त्यांनी अर्थशास्त्र, पाली व हिंदी या तीन भाषांमध्ये एम.ए. केले आहे. आज ते अहमदपूर येथील महात्मा गांधी कॉलेजमधील विद्यार्थी प्रिय प्राध्यापक आहेत. आमच्या उमरगा कोर्ट गावातील सर्व गावकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमी मदत करत असतात. म्हणून सांगावे वाटते की दिव्यांग व्यक्तींना कमी समजू नका.त्यांचा सन्मान करणे त्यांना आपल्या सारखेच कणखर समजून त्यांच्या सोबत मानवतावादी संगत व चांगले व्यवहार



करणे उचित ठरेल आणि दिव्यांग व्यक्तींनी स्वतःला कमी समजू नये. जीवनात उच्च ध्येय गाठण्यासाठी सतत कार्यरत राहावे.

# 'मोऱ्या' या मराठी चित्रपटाचा धुळ्यात झाला स्क्रीनिंग शो

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** टार्टूग़ा मोशन पिक्चर्स प्रस्तुत मोऱ्या या मराठी चित्रपटाचा स्क्रीनिंग शो निवडक १०० मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत धुळे शहरातील क्युमाईन क्लबसमोरील सीताराम पानट सभागृहात मंगळवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी पार पडला. चित्रपट स्क्रीनिंग सुरु करण्यापूर्वी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आलं. याप्रसंगी जेष्ठ गीतकार विश्राम बिरारी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद नियमक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, आजाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे, मोऱ्या चित्रपटाचे दिग्दर्शक जितेंद्र पुंडलिक बर्डे. निर्माते तृप्ती कुलकर्णी, राजेश विश्वनाथ अहिवले, अमित सोळंकी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. जितेंद्र बर्डे दिग्दर्शित "मोऱ्या" हा चित्रपट जानेवारी २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट विविध फिल्म फेस्टिवलमध्ये आतापर्यंत प्रदर्शित झाला असून राष्ट्रीयआणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने याला सन्मानित करण्यात आले आहे. चित्रपटाचं चित्रीकरण हे खान्देशातील पिंपळनेर परिसरात झाले आहे. या चित्रपटाने मराठी फिल्म इंडस्ट्रीसह बॉलिवूड व विदेशाचंही लक्ष वेधून घेतलं आहे. सफाई कामगाराच्या जीवनाभोवती फिरणारी मोऱ्या चित्रपटाची कथा थेट प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेते. याकरिता मराठी रसिकांसह खान्देशी कलारसिकांनी व जनतेने खान्देशपुत्र जैतेन्द्र बर्डे यांची अप्रतिम कलाकृती चित्रपट प्रदर्शित झाल्यावर अवश्य पाहावी असं आवाहन अनेक मान्यवरांनी करून जितेंद्र बर्डे यांचं भरभरून कौतुक केलंय. निर्माते तृप्ती कुलकर्णी, राजेश विश्वनाथ अहिवले यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, दिग्दर्शन या जबाबदाऱ्या अत्यंत योग्य पद्धतीने सांभाळून जितेंद्र बर्डे यांनी चित्रपट नायकाची भूमिका अत्यंत प्रभावीरीत्या साकारली आहे. सहनिर्माते मंदार मांडके, राहुल रोकडे, पुनम नागपूरकर, डॉ. सचिन पाटील (स्वामी), प्रेरणा धजेकर, छायांकन आकाश काकडे, संगीत अमोघ इनामदार, गायक अवधूत गुप्ते गीते, केदार भागवत, संकलन रोहन, पाटील रंगभूषा ललित कुलकर्णी वेशभूषा मीनाक्षी नायर डी. आय. कलरिस्ट हितेंद्र परब व्हि एफ् एक्स आणि ग्राफिक्स विहांग चव्हाण, आनंद पुसाळकर ध्वनी आरेखन विक्रांत पवार, कार्यकारी निर्माता राहुल ओमनकर, पी आर ओ राम कोंडीलकर, सहाय्यक दिग्दर्शक श्रेयस गौतम, करण मोरे, मेकिंग यश लांडगे, फेस्टिवल स्ट्रेटेजी मोहन दास यांनी आपल्या जबाबदाऱ्या उत्तमपणे निभावल्या आहेत. मोरया चित्रपट पाहिल्यावर मान्यवरांनी आपलं मनोगत व्यक्त करताना चित्रपटाच्या दर्जेदारपणाची खूप तारीफ केली.



# खरीप हंगामातील पंचनामे झाले, अनुदान कधी ?

## त्वरित अनुदान वितरित करण्याची सेनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यात जून - जुलै महिन्यात ढगफुटीसदृश्य पाऊस पडला होता. यामुळे खरीप हंगामात अनेक पिकांचे प्रचंड नुकसान झाले.सरकारी शिस्त्याप्रमाणे सर्व प्रक्रिया पार पडली गेली, पंचनामे झाले. मात्र चार महिन्यापासून ना शेतकऱ्यांना सरकारी मदत मिळाली, ना पीक विम्याची अग्रमी पंचवीस टक्के रक्कम. ही मदत तात्काळ वितरित करण्याचा इशारा शिवसेने (ठाकरे) च्या वतीने देण्यात आला आहे. सरकार शेतकऱ्यांचे आपणच कसे तारणहार आहोत, त्यांना किती हजार कोटी रुपयांचा निधी वाटप केला याच्या कितीही गप्पा मारत असल्या तरी जमिनीवर मात्र चित्र वेगळे आहे. धर्माबाद तालुक्यात जून - जुलै महिन्यात ढगफुटीसदृश्य अतिवृष्टीमुळे झाली होती.खरीप हंगामातील सोयाबीन,तूर,उडीद, कापूस आदी पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सरकारी सोपस्कार झाले, आमदार - खासदारांचे दौरे कम फोटोशेषन अधिक झाले.परंतु या सर्वातून शेतकऱ्यांना काय मिळाले? अस्मानी संकट येऊन चार महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी अद्यापही शेतकऱ्यांना ना सरकारी मदत मिळाली ना पीक विम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम मिळाली.त्यातच नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीतील रब्बी व खरीप पिकांचे अतोनात झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक अचडणीत सापडला असून त्यांना सावकारी कर्ज काढावे लागत आहे. शेतकऱ्यांना धीर व आधार देण्यासाठी, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसानीचे अनुदान आणि पिक विम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम त्वरीत वाटप करावे, धर्माबाद तालुका दुष्काळ जाहीर करावे. अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. या निवेदनावर उपजिल्हा प्रमुख गणेश गिरी,तालुका प्रमुख रामचंद्र रेड्डी,विधानसभा संघटक शिवराज पा. मोकलीकर,तालुका संघटक मारोती कागेरु,माजी शहरप्रमुख गणपत कात्रे,उपतालुका प्रमुख विठ्ठल हाडपे, उपशहर प्रमुख फेरोज खुरेशी आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आपेगाव येथे सोमवारपासून संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्यास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील श्रीक्षेत्र आपेगाव येथे वारकरी साम्रदायाचे



अराध्य दैवत आसलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७२७ व्या संजीवन समाधी सोहळ्याला सोमवार दि,४ डिसेंबर रोजी सुरवात होत आहे त्यानिमीत्त माऊलीच्या मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताह काळात ब्रह्मलीन कैवल्यमूर्ती विष्णू महाराज कोल्हापूरकर(गुरुजी) यांच्या आशीर्वादाने अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर (दादा) (अध्यक्ष ज्ञानेश्वर मंदिर श्रीक्षेत्रआपेगाव) यांच्या डोळस नेतृत्वाने उत्साहात प्रारंभ होत आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रम पहाटे ४ ते ५ काकडा भजन, ५ ते ६ माऊलींचा महाभिषेक ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते 10 ज्ञानेश्वरी पारायण, अमृतानुभव चांगदेव पासष्टी, १० ते १२ बाळ क्रीडा गाथा भजन, ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ, ८ ते १० हरि कीर्तन, १२ ते 3 हरीजागर असणार आहे. या महोत्सवात ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक ह.भ.प. राम महाराज तांबे तसेच बाळक्रीडा गाथा भजन ह.भ.प. योगेश महाराज सोन्नेसह या सोहळ्यास महान कीर्तनकार याचे किर्तन होणार आहे. प्रभाकर महाराज सुरासे, दिनकर महाराज चिमणे,सुनितताताई मुगदल, शंकर महाराज चिंचकर,भागवत पाटील, भानुदास महाराज कोल्हापूरकर,शिवाजी महाराज खवणे यांचे किर्तन होतील तसेच दि. ११ डिसेंबर सकाळी ९ ते १२ अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर (दादा ) यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. श्री संत ज्ञानराज माऊलींच्या मूर्तीवर किरणोत्सव दिनांक ९,१०,११, डिसेंबर रोजी दुपारी १२:४२ ते १२:५२ वाजेपर्यंत माऊलींच्या मुखाविंदावर सूर्यकिरण (विराजमान) दर्शन होणार आहे. हा किरणोत्सवाचा अनुभव गत वर्षीच्या संजीवन समाधी सोहळ्यामध्ये सर्व भाविकांनी याचि देही याचि डोळा घेतला.सन २०२१ च्या सोहळा दिवशी सकाळपासून सुर्य ढगाआड होते सुर्यदर्शन होत नव्हते पण दुपारी ठीक १२;५० वा सुर्यदेव काळोख,ढगातुन आगमन झाले ते माऊलींच्या मुखाविंदावर किरणोत्सव केला आणि पुन्हा दिवसभर सुर्यदेव ढगाआड गेले.तसाच अनुभव यावर्षी पहावयास मिळणार आहे.ही अध्यात्म आणि विज्ञान यांचा अलौकिक साक्षात्कार याचि देही याचि डोळा बघा. तदनंतर सायंकाळी ४:३० वाजता अध्यात्मविवेकी गुरुवर्य ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर (दादा) यांच्या शुभहस्ते दहीहंडी चा कार्यक्रम संपन्न होईल. सायंकाळी ७ वाजता संत ज्ञानराज माऊली माता रुक्मिणी आई-पिता विठ्ठलपंत यांची पालखी नगर प्रदक्षिणा होऊन कार्यक्रमाची सांगता होईल. या कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्त वारकरी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.भानुइ ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर माऊली जन्मसंस्थान आपेगाव यांनी केले आहे.

यानिमित्ताने वारकऱ्यांना पैठण ते आपेगाव जाणे येण्यासाठी दि.११ डिसेंबर यात्रेनिमित्त दिवसभर जिजाभाऊ मिसाळ, अप्पासाहेब श्रीमंतराव मिसाळ, श्री अनिल श्रीमंतराव मिसाळ रा.आपेगाव या परिवाराच्या वतीने मोफत तीन क्रुझर जीपची व्यवस्था गतवर्षीप्रमाणेच करण्यात आलेली आहे.भाविकांनी या मोफत सेवेचा लाभ घ्यावा.



# लक्ष्मीनगर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी गोकुळ त्र्यंबक बिन्नर यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील लक्ष्मीनगर ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी गोकुळ त्र्यंबक बिन्नर यांची बिनविरोध निवड झाली. माजी पंचायत समिती सभापती सोमनाथ देवजी जोशी यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील सोमज, कृष्ण नगर व लक्ष्मीनगर या ग्रामपंचायत मध्ये उप सरपंचांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपसरपंच पदासाठी गोकुळ बिन्नर यांचा एकमेव अर्ज विहीत वेळत प्राप्त झाल्याने अध्यासी अधिकारी व सरपंच सावित्री सोमनाथ जोशी यांनी गोकुळ बिन्नर यांच्या निवडीची घोषणा केली. यावेळी सरपंच सावित्री सोमनाथ जोशी, ग्रामपंचायत सदस्य सुदाम काळू बंडकोळी, रामदास अशोक डोखे, आशा सुभाष जोशी, रेखा अशोक चीरके, विजय दराणे, सुनिता सूरज दराणे, संगिता मेमाणे, जनाबाई डोखे यांच्यासह माजी सरपंच ज्ञानेश्वर धोंडू करवर, नामदेव दत्तू खोकले, आनंदा जोशी, दशरथ बेंडकोळी, नामदेव सदगिर, निवृत्ती करवर आदी सभागृहात उपस्थित होते.

नवनिर्वाचित सरपंच सावित्री जोशी, उपसरपंच गोकुळ बिन्नर व सदस्य यांनी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची भेट घेतली असता खासदार संजय राऊत यांनी नवनिर्वाचित सरपंच व उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांचा सत्कार केला. या प्रसंगी माजी आमदार निर्मला गावित, जिल्हा उपप्रमुख निवृत्ती जाधव, ज्येष्ठनेते रमेश, कचरू पा. डुकरे, माजी प. स. सभापती सोमनाथ देवजी जोशी, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अर्जुन भोर, साहेबराव धोंगडे, सुभाष जोशी, विठ्ठल बिन्नर, कल्पना जोशी, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष बाळू भांगरे, अशोक चीरके, विश्वनाथ जोशी यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# ओबीसी नेते डॉ. तायवाडे यांच्याविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र आणि ओबीसीमधून आरक्षण देण्याचा आग्रह मनोज जरांगे पाटील यांचा आहे, तर ओबीसीमधून आरक्षण न देता मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी ओबीसी नेत्यांची आहे. या मुद्यांवरून आता जरांगे पाटील आणि ओबीसी नेत्यांमध्ये वैयक्तिक टीका-टिप्पणी सुरू झाली आहे. हिंगोली येथील ‘ओबीसी एल्गार मेळाव्यात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्यासह इतर ओबीसी नेत्यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटलांना लक्ष्य केले. तायवाडे यांनी चिथावणीखोर वक्तव्य केल्याची तक्रार झाल्यानंतर त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिंगोली शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल विकी भगवानराव उरेवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल केला आहे. दुसरीकडे, डॉ. तायवाडे यांना फोनवरुन धमक्या देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. स्वतः तायवाडे यांनी याबाबत माहिती दिली असून आपण कोणत्याही धमक्यांना भीक घालत नसल्याचंही त्यांनी ठणकावून सांगितले आहे. माझे भाषण ऐकून काही जणांनी वेगळाच अर्थ काढला आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

आधुनिक केसरी



लय भारी

# सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424



# चिवडा कटलेट्स

दिवाळी संपली. काही दिवसात बाकी सर्व फराळ सुद्धा संपतो. पण शेवटी मात्र चिवडा शिल्लक राहतो. मग दरवर्षी चिवड्यावर कांदा, टोमॅटो, कोथिंबीर, लिंबू घालून सुक्क्या भेळेचा कार्यक्रम ठरलेला असतो. चिवड्याच्या तळाशी शेवटी मोहरी, जिरे, तीळ आणि मसाला राहिलेला असतो तो खरच खूप खमंग आणि टेस्टी असतो पण मीठ सुद्धा थोडे जास्त रहात असल्यामुळे थोडासा स्ट्रॉंग व खारट असा लागतो त्यामुळे ते खायलाही नको वाटते आणि फेकून द्यायलाही नको वाटते. आधी चिवडा खाऊन कंटाळा आलेला असतो, पुन्हा संपवण्यासाठी भेळ करून खावा लागतो. त्याऐवजी कटलेट्स करून तर पहा.

**साहित्य :** २ वाट्या चिवडा, 2 उकडलेले बटाटे, 1 मोठा कांदा, 1 गाजर , 1 सिमला मिरची, अर्धा चमचा आले लसूण पेस्ट ,अर्धी वाटी कोथिंबीर, अर्धी वाटी बारीक रवा किन्वा ब्रेडक्रम्स, शालोफ्राय करण्यासाठी तेल.

**डिप बनवण्यासाठी साहित्य :**
२ वाट्या गोड दही, 1 चमचा मेयोनीज, 1 चमचा साखर, पाव चमचा चाट मसाला, पाव चमचा मिक्सहर्ब्ज.

**कृती :** प्रथम डिप बनवूनघ्यावे म्हणजे मुरून फ्रीझ मध्ये थंड झाले की टेस्टी बनते .त्यासाठी दह्यात सर्व साहित्य मिक्स करून व्यवस्थित फेटून साखर विरघळली की फ्रीझमध्ये थंड होण्यासाठी ठेवावे.

कटलेट्स बनवण्यासाठी बटाट्याची साले काढून कुस्करून घ्यावा. गाजर खिसून घ्यावे. मग कांदा, सिमलमिरची, कोथिंबीर बारीक कट करून घ्यावी. आता मोठ्या पसरट भांड्यात चिवडा घ्यावा व त्यात सगळ्या भाज्या घालून आले लसूणपेस्ट घालून थोडेसे मीठ घालावे. चिवड्यात तळाशी जास्तीचे मीठ असते हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. मग सर्व व्यवस्थित मिक्स करून घ्यावे. आवश्यक असल्यास थोडासा पाण्याचा शिपका मारुन आवडीनुसार कटलेट्स टिक्की बनवून ठेवाव्यात. नंतर डिशमध्ये रव्यात किंवा ब्रेडक्रम्समध्ये व्यवस्थित घोळवून ठेवून तव्यावर तेलावर क्रिस्पी होईपर्यंत फ्राय करून कटलेट्स बनवावेत.
हे कटलेट्स डिप बरोबर खाण्यास द्यावेत .

**वैशिष्ट्य :** चिवडा मसाल्यामुळे कटलेटसना एक वेगळीच खमंग चव येते आणि करायला सोपा, खायला छान पदार्थ बनवल्याचे समाधानही मिळते. यात कोबी, कांदापात अशा आवडीच्या भाज्या पण घालू शकतो. भाज्यांमुळे टेस्टसुद्धा छान येते आणि पोटही भरते.

# ऊर्जामंत्री ना.देवेंद्र फडणवीसांची अभिनव कल्पना



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतुन या खात्यात वेगवेगळ्या अभिनव कल्पना पुढे येत असताना लोकाभिमुख कारभार व्हावा, लोकप्रतिनिधी आणि विद्युत ग्राहकांचे प्रश्न त्यांच्या दारात जावुन मार्गी लागावेत. जनतेमधुन आलेल्या सुचनेचा स्विकार करताना परिवर्तनाच्या दृष्टीने खात्याला दिशा देण्यासाठी जिल्हानिहाय प्रवास करत आढावा घेताना स्वतंत्र संचालक एमएसईबीचे होल्डींग कंपनीचे श्री विश्र्वास पाठक यांनी संपुर्ण राज्यात प्रवास करताना महावितरण, महापारेषण, महानिर्मिती व महाऊर्जा कंपनीच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या सोबत बैठका लावल्या.**

ज्याला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, मंत्री आणि अधिकाऱ्यांची उपस्थिती जिल्हानिहाय आढावा बैठकीत गळुन पडलेल्या तारा इथपासून ट्रान्सफार्मर मागेल त्याला देण्याची योजना शिवाय नवे सबस्टेशन एवढेच नाही तर उच्च दाब ते लघुत्तम दाब आदीवर सविस्तर चर्चा झाली. प्रत्येक जिल्ह्यातून आलेले प्रश्न भविष्यात त्याचा अभ्यास केला जाईल पण एक गोष्ट खरी आहे की, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवुन जिल्हानिहाय आढावा बैठका झाल्याने विद्युत मंडळाच्या इतिहासात या कल्पनेचे जोरदार स्वागत होत असुन सर्वत्र विश्वास निर्माण झाल्याचे चित्र दिसुन येते.

सरकारचे असे काही खाते आहेत की त्यांचा थेट संबंध सामान्य जनतेशी येतो. नव्हे तर पावलापावलावर क्रिया प्रतिक्रिया जनतेमधुन उमटतात. ऊर्जा खाते अर्थात एमएसईबी असं एक खातं आहे की जगण्यासाठी महत्वाचं साधन म्हणुन ओळखल्या जाते. काही सेकंद जर लाईट गेली तर जीव कासावीस होतो अशा प्रकारची तीव्रता ज्या खात्याची ते म्हणजे ऊर्जा. अलीकडे अनेक प्रश्नाला या खात्याला तोंड द्यावे लागते. एकेकाळी केवळ विद्युत मंडळ या नावाने ओळखले जायचे. आता सुरूवातीला उल्लेख केल्याप्रमाणे वेगवेगळ्या कंपन्या त्या अंतर्गत खाते चालतं. उदा.महावितरण, पारेषण, महाऊर्जा याप्रमाणे. राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर विश्वास पाठक यांच्याकडे तिन्ही कंपन्याचं अर्थात होल्डींग कंपनी संचालक म्हणून पद देण्यात आलं. पाठक हे अर्थतज्ञ म्हणुन ओळखल्या जातात. तसंच तांत्रिक प्रश्नांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर अभ्यास आहे. 2014 ला त्यांनी याच पद्धतीने खात्याचा कारभार पाहिला होता. खरं तर ऊर्जा खातं भ्रष्टाचाराचं कुरण म्हणुन ओळखल्या जायचं. बोगस कामाचा सुळसुळाट या खात्यात मोठ्या प्रमाणावर होता. म्हणून कितीही योजना आल्या तरी सुसुत्रता त्याच्यात नव्हती. पाठकांनी मात्र मंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली काटेकोर कारभार करताना या खात्याला लावलेला ब्रेक हीच खरी पारदर्शकता म्हणावी लागेल. मुळात कुठल्याही खात्याचा कारभार करताना अधिकारी आणि कर्मचारी यांना विश्वासात घेणं, त्यांच्यात समन्वय ठेवुन काम करणं महत्वाचं ठरतं. पुर्वी अधिकाऱ्यांच्या बदल्यात चालणारे गैरप्रकार बंद झाले. टेंडर प्रक्रिया व्यवस्थित नव्हती. त्यात आता पारदर्शकता आली आणि एजन्सीला प्रत्यक्ष कामच करावे लागणार अशा प्रकारचे नियंत्रण या खात्यावर आल्याने सर्वसामान्य जनतेला विश्वास निर्माण झाला. देवेंद्र फडणवीसांचं विशेष लक्ष्य या खात्यावर आहे. म्हणून सुरूवातीलाच ऊर्जा खातं आपल्याकडे ठेवलं. उद्देश हाच असावा की या खात्यातला पारदर्शक कारभार, शिवाय सामान्य जनता, शेतकरी, उद्योजक यांना सुरूळीत विद्युत पुरवठा करणं. अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर वीजेची मागणी वाढली. त्या प्रमाणात वीज तयार होत नाही. नाही म्हटलं तरी 26000 मेगावॅटपेक्षा वीजेची मागणी आहे. मात्र या साऱ्या प्रक्रियेवर देवेंद्र फडणवीसांच्या कल्पनेतुन मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंमलात आणली असुन ज्यात 7000 मेगावॅट वीज उपलब्ध करून देण्याचा खात्याचा प्रयत्न त्या दृष्टीने योजनेला बळ मिळाले असुन शेतकऱ्यांना



दिवसा विद्युत पुरवठा होवु शकतो. खऱ्या अर्थाने बारा तास दिवसा लाईट जर मिळाली तर शेतीचं अर्थकारण मोठ्या प्रमाणावर बदलु शकते असा अंदाज फडणवीसांचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील संपुर्ण देशात विद्युत मंडळाच्या उभारणीत लक्ष्य घालुन ओडीएस अंतर्गत मोठ्या प्रमाणावर जिल्हानिहाय केंद्र सरकारचा स्वतंत्र निधी देवुन विद्युत प्रणाली गतीने उभा करण्याचे काम हाती घेतले. सोलार कृषी योजना ज्याचा एकुण खर्च 30,000 कोटी 17000 युवकांना रोजगार मिळेल आणि 27000 हेक्टर जमिन शेतकऱ्यांची सिंचन होईल. आरडीएस अंतर्गत 42000 कोटी महाराष्ट्रात खर्च होतील. या योजना तळागाळापर्यंत उभा करण्याच्या दृष्टीने ऊर्जा खात्याने गती घेतली. त्याहुन अधिक प्रत्येक जिल्ह्यात जावुन या प्रश्नाची चर्चा केली तर लोकप्रतिनिधीच्या सुचना आणि ग्राहकांचे तक्रार निवारण यावर विशेष भर दिला. कंपनीचे होल्डींग डायरेक्टर विश्वास पाठक यांनी मागच्या पंधरा दिवसात राज्यात एकुण 30 जिल्ह्यात प्रत्यक्ष जावुन बैठका घेतल्या. परभणी, बीड येथील बैठकाला मी स्वतः उपस्थित होतो. जिल्हानिहाय बैठकीसाठी अनेक जिल्ह्यात मंत्री, आमदार, खासदार यांची उपस्थिती होती. काही प्रश्नावर चर्चा होताना शेतकऱ्यांच्या शेतात लोंबकळणाऱ्या तारा, ट्रान्सफार्मर बिगाड, किटकॅट केबल, डीपी ऑईल, अनेक ठिकाणी घरगुती ग्राहकांना मीटर बसवले नाही पण बील येते. निकृष्ट मटेरिअल एजन्सी वापरतात. सबस्टेशनची मागणी, 132केबीची मागणी, अगदीच म्हटलं तर लाईनमेन फिल्डवर जात नाही. अभियंता काम बरोबर करत नाहीत. कोटेशन भरल्याबरोबर कनेक्शन मिळत नाही. एवढेच नाही तर एक एक महिना ट्रान्सफार्मर बदलुन मिळत नाही. लाईट कधी येते, कधी जाते याचा नेम नाही. खालच्या पातळीवर ज्या अडी अडचणी येतात, या सर्व प्रश्नाचा ऊहापोह जिल्हा आढावा बैठकीत पाठकांच्या समोर घेण्यात आला. लोकप्रतिनिधीचे म्हणणे ऐकण्यात आले. कधी नव्हे ते इतिहासात असा प्रयोग झाल्याने ऊर्जाखात्याला चांगले बळ मिळणार हा संदेश गेला. ठिकठिकाणी बैठकीत सर्व कंपनीचे मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता इथपासून सर्व कर्मचारी यांची उपस्थिती होती. अतिशय शिस्तबद्ध नियोजन करून संपन्न झालेल्या जिल्हा बैठका ज्यातुन काही तरी निष्पन्न होईल याची खात्री सर्वांना पटते. ऊर्जा खाते अडचणीत असताना अशा प्रकारे रचनात्मक होवु घातलेले बदल नव्याने ऊर्जा प्राप्त होण्यासाठी महत्वाचे ठरतील हे नक्की. प्रत्येक जिल्हा आढावा बैठकीत काही महत्वाच्या सुचना करताना विश्वास पाठकांनी ठणकावून सांगताना सुचित केले. आपल्या जिल्ह्यातील खासदार, आमदार, मंत्री यांना विश्वासात घेवुन काम करा, त्यांच्या सुचना म्हणजे जनतेचे प्रश्न आणि ते मार्गी लावण्यासाठी हलगर्जीपणा करू नका. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी ही योजना शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांतीकारक ठरेल. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांचं यावर विशेष लक्ष्य असुन शासकिय जमिनी शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनी तात्काळ उपलब्ध करून प्रकल्प उभा करण्याच्या सुचना केल्या. सर्व कर्मचाऱ्यांनी नकारात्मक मानसिकतेमधुन बाहेर पडून आपण काही तरी घडवु शकतो अशा प्रकारे सकारात्मक विचारातुन ग्राहकांना वेळेवर सेवा उपलब्ध करून द्या. सुधारण्याची संधी हाच वर्तमानकाळ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी हाती घेतलेली योजना ज्यावर लाखाच्या करोडोत खर्च अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्ह्यात योजनेतुन होणारी कामं पारदर्शक, दर्जेदार करून घेण्याच्या सुचना त्यांनी केल्या. या दौऱ्यात कंपनीचे संचालक श्री कलंत्री, श्री मारूडकर यांच्याशिवाय अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. एक खरं आहे की, पहिल्यांदाच असा प्रयोग खात्यात होत असल्याने सामान्य जनतेत सकारात्मक संदेश जावुन पोहोचला.

# गुलामगिरी: श्रमिकांच्या शोषणाची एक पद्धत!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**इ.स.च्या १९व्या शतकापासून इंग्रजीत स्लेव्हरी- गुलामगिरी हा शब्द अमेरिकेतील गोऱ्या कातडीच्या माणसांनी काळ्या कातडीच्या माणसांच्या केलेल्या गुलामीबद्दल जास्त करून वापरला गेला आहे. सुरुवातीला गुलामगिरी केवळ अमेरिकेच्या दक्षिणी राज्यांमधेच नव्हती, तर उत्तर क्षेत्रातही होती. व्हरमाँट गुलामगिरीचे उच्चाटन करण्यासाठी प्रथम राज्य म्हणून अस्तित्वात आहे, सन १७७७मध्ये अमेरिकेने ब्रिटनमधून स्वतःला मुक्त केल्यानंतर ती सुरू झाली. तब्बल सात वर्षांनंतर सर्व उत्तर राज्यांनी गुलामगिरीवर बंदी घालण्याची शपथ घेतली.**

परंतु उत्तर प्रदेशात बरीच वर्षे गुलामगिरीचा अभ्यास चालूच होता. याचे उत्तर असे की, उत्तर अमेरिकेने या कायद्याची अंमलबजावणी केली ज्यामुळे गुलामगिरीचे उन्मूलन तात्काळ करता आले नाही.पीबीएसने असे सुचवले की, पेनसिल्वेनियाने सन १७८०मध्ये गुलामगिरी क्रांतीदिनाच्या कायद्याची अंमलबजावणी केली, परंतु हळूहळू एक त्रुटी सांगण्यात आली. सन १८५०मध्ये पेनसिल्वेनियाच्या शेकडो बंदिवानांना बंधनात ठेवणे चालूच राहिले. सन १९६१मध्ये गृहयुद्ध सुरू होण्याआधीच एका दशकाहून अधिक काळापर्यंत उत्तर प्रदेशात दासत्त्व सुरूच राहिले. जगभरातून गुलामगिरी संपवण्यासाठी दरवर्षी २ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन साजरा केला जातो. प्राचीन काळापासून चालत आलेली गुलामगिरी आजही या ना त्या स्वरूपात कायम आहे. संयुक्त राष्ट्र संघाने दरवर्षी हा दिवस आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन साजरा करण्याची घोषणा केली आहे. मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसाय रोखण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने एक ठराव मंजूर केला, ज्यामध्ये २ डिसेंबर रोजी गुलामगिरी निर्मूलन दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. महिलांसाठी हा दिवस खुप खास आहे. सध्याच्या गुलामगिरीचा अंत करणे ही या दिवसाची मुख्य थीम आहे. यामध्ये मानवी तस्करी, लैंगिक शोषण, बालमजुरी,



सक्तीचे विवाह, मुलांवर दबाव आणणे आणि शस्त्रांच्या शर्यतीत भरती करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. हे सर्व प्रकार आधुनिक युगातील गुलामगिरीचे प्रतीक आहेत. पार्श्वभूमी- २ डिसेंबर १९४९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत एक ठराव मंजूर करण्यात आला, ज्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन स्वीकारण्यात आला. मानवी तस्करी थांबवणे आणि वेश्याव्यवसाय थांबवणे हा यातील मुख्य उद्देश होता. ठराव ३१७ ( आयव्ही ) दोन्ही गुलामगिरीचे प्रतीक मानून पारित करण्यात आले. गुलामगिरी म्हणजे वेठबिगार अशी गल्लत करू नका. गुलामगिरी ही श्रमिकांच्या शोषणाची एक पद्धत आहे. ज्या व्यवस्थेत माणसांना कोणाचीतरी मालमत्ता समजले जाते आणि बळाचा किंवा धाकाचा वापर करून काम करायला लावले जाते, तिला सर्वसाधारणपणे गुलामगिरी किंवा गुलामी अशी संज्ञा आहे. गुलामांना त्यांच्या इच्छेविरुद्ध विकत घेण्यात येत असे किंवा ते जन्मापासूनच गुलाम समजले जात असत. काम सोडून जाण्याचा, कामास नकार देण्याचा किंवा कामासाठी मोबदला मागण्याचा अधिकार त्यांना नसे. काहीं जुन्या गुलामगिरीच्या व्यवस्थांमध्ये मालक गुलामांना ठारही मारू शकत आणि ते कायद्यात बसत होते. इतिहासातील अनेक समाजांनी गुलामगिरीची पद्धत उघडपणे मान्य केली होती. आधुनिक काळात जगभरातील बहुतांश ठिकाणी गुलामगिरी जरी बेकायदा असली, तरीही ती काही स्वरूपात चालू आहेच. उदाः धन्याच्या कर्जात अडकलेले नोकर, घरी कायमस्वरूपी ठेवलेले नोकर, दत्तक घेतलेल्या मुलांचा नोकर म्हणून वापर, मुलांचा सैनिक, क्रांतिकारी वा दहशतवादी म्हणून वापर, जबरदस्तीने केलेले लग्न, कामेच्छेसाठी वापरले जाणारे किंवा पुरविले जाणारे गुलाम आदींचा समावेश होतो. गुलामगिरी माणसाच्या लिखित इतिहासाच्याही पूर्वीपासून अनेक संस्कृतींमध्ये चालू होती. आज जगात उपरोक्त प्रकारच्या गुलामांची संख्या १.२ ते २.७ कोटी असावी, असा अंदाज आहे. मात्र एकंदरीत लोकसंख्येच्या मानाने हे प्रमाण ऐतिहासिक प्रमाणांपेक्षा अत्यल्प मानता येईल. यातील सर्वाधिक संख्या दक्षिण आशियातील कर्जबाजारी झालेल्या नोकरांची आहे. अनेकदा ही गुलामी पिढ्यानपिढ्या चालू राहते. बायका आणि मुलांचे लैंगिक शोषण आणि त्यासाठी त्यांची केली जाणारी आयात-निर्यात हा गुलामगिरीचा एक स्वतंत्र भागच आहे. औद्योगीकरणाच्या आधी गुलाम आणि त्यांची श्रमशक्ती यांना आर्थिक दृष्टीने मोठेच महत्त्व होते. यंत्रयुगात मानवी श्रमांचे आर्थिक महत्त्व कमी होत चालले आहे. नोरबेर्त विनर म्हणतात, "यंत्रशक्तीमध्ये मानवी श्रमांचे आर्थिक मूल्य आहे, पण गुलामगिरीत जी क्रूरता असते ती नाही." १९व्या शतकाच्या सुरुवातीस गुलाम व भूदास ह्यांची संख्या लोकसंख्येच्या तीन चथुर्तांश होती. यंत्रयुगात प्रचंड प्रमाणावर मजूर लागत नाहीत त्यामुळे गुलामीचे आर्थिक महत्त्व निघून गेले आहे. गुलामी मात्र आर्थिक कारणांसाठी नाही तर मानवी हक्क म्हणून बेकायदेशीर केली गेली. गुलाम हा मूळ अरबी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ सेवक असा होतो. नंतर तो बहुधा मध्ययुगीन काळात उर्दू व अन्य भारतीय भाषांमध्ये आला असावा, असा अंदाज बांधला जातो. संस्कृत भाषेत मात्र हा शब्द आढळत नाही, हे उल्लेखनीयच!

## लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळया रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**प्लॅनिंग ऑफ हनिमून** : आता ही आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. आत्ताच्या काळात अनेकदा विवाहित जोडपे नोकरी करणाररे असते. त्यामुळे लग्नानंतर लगेचच त्यांना मूल होणं अपेक्षित नसतं. जर असं असेल तर त्यांनी सुनियोजित प्लॅनिंग करणं आवश्यक असतं. अनेक वेळा भावनेच्या भरात ही बाब लक्षात येत नाही आणि इच्छा नसतांना गर्भधारणा होते. त्यामुळे हनिमूनच्या प्लॅनमध्ये या गोष्टीचा प्रामुख्याने विचार असणं खूप महत्त्वाचं आहे. यातलीच दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे सेफ सेक्स, नैसर्गिक अवस्थेत, कोणत्याही साधनांचा वापर न करता सेक्सचा आनंद घेण्याची इच्छा... मात्र यासाठी अनेक गोष्टींची माहिती असणं हे पुरुष आणि स्त्री दोघांसाठीही महत्त्वाचे आहे.

**सेफ पीरेड** : मासिक पाळी आणि गर्भधारणा याचा खूप जवळचा संबंध आहे. दर महिन्याला स्त्रियांच्या शरीरातून अनावश्यक द्रव्य बाहेर टाकण्याची ही क्रिया आहे. या काळात गर्भपिशवीचे तोंड उघडले जाणे आणि बंद होणे ही क्रिया घडत असते. ३० दिवसांच्या या चक्रामध्ये ११वा दिवस ते २०वा दिवस हा काळ पीक पिरियड म्हणून संबांधला जातो. म्हणजेच या काळात स्त्री-पुरुष संबंध झाल्यास गर्भधारणा होण्याची शक्यता जास्त असते. पण शेवटचे १० दिवस आणि मासिक पाळीनंतरचे ५ दिवस हा सेफ पिरेड मानला जातो. जरी असे असले तरी हा एक ठोकताळा आहे. यात अपवादात्मक घटना घडू शकतात.




**हनिमून भाग - २**



**डॉ. विजय दहिफळे**
**युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट**
**9822326248**

**काय काय करावे ?**

१. काही तरी नावीन्य आणि रोमांचक आठवणी राहतील अशा गोष्टी कराव्यात उदा. आठवडाभर निवांत समुद्रकिनारी छान अशा ओल्या वाळूतून चालणे, सायकल किंवा बाईकवरुन जंगलाची सफर करणे इ. एकदा का बाहेर पडलं की आपोआपच तुमच्या मेंदूत वेगवेगळे सेक्स हार्मोन्स इनडॉरफिन तयार होऊन आपोआप मूड क्रिएट होतो म्हणूनच काही नवीन कुतुहल निर्माण होईल अशा गोष्टी कराव्यात.

२. इनर्स सुद्धा वेगवेगळ्या डिझाइन्स आणि कलरफुल असाव्यात. त्यामुळे एक नवीन आकर्षण, सौंदर्य आणि रोमांचक अनुभव येतो. (उघड्या भागापेक्षा झाकलेल्या भागातून दिसणाऱ्या गोष्टींचे कुतुहल आणि आकर्षण जास्त असते.)

३. डान्स-डान्स - एखाद्या चांगल्या अशा रिसॉर्टमधील पॉप म्युझिक किंवा संगीत रजनीच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्या. तिथे जोडीने डान्स करा. ज्यामुळे भावना उद्दीपित होऊन अधिक जवळीक निर्माण होते आणि रात्रीच्या उत्साहामध्ये त्याचा परिणाम अधिक उत्कटतेने जाणवतो. काही कारणामुळे तिथे उपस्थित लोकांमध्ये कम्फर्ट वाटत नसेल तर रुमवर जाऊनही तुम्ही हा डान्स करू शकता.

४. संगीत ऐकणे किंवा वाजवणेः संगीतामुळे एकांतात मूड होण्यास खूप चांगली मदत होते. पुरातन काळात भगवान श्रीकृष्ण ज्याप्रमाणे बासरी वाजवून वातावरणात एक वेगळाच उत्साह तयार करीत असत, तसेच या काळात संगीत, गाणं, वाहता झरा, झुळझुळ पाण्याचा आवाज यामुळे एक वेगळीच वातावरण निर्मिती होते. आपल्या आवडीच्या गाण्यांचा आस्वाद घेत, मग ते प्रेमगीत असोत, गाण्याच्या भेंड्या खेळणे असो किंवा आवडीची गाणी स्वतः म्हणणे असो यामुळे एक वेगळेच संवेदनशील असे वांतावरण तयार होत जाते.

# "ये मेरा प्रेम पत्र पढ कर..."

आधुनिक केसरी

राज कपूरनिर्मित-दिग्दर्शित-अभिनीत आणि बहुचर्चित चित्रपट `संगम'' (१९६४). `गॉन विथ द विंड' या गाजलेल्या इंग्रजी चित्रपटावरून तो प्रेरित झाला होता. त्यात राज कपूर, राजेंद्र कुमार आणि वैजयंतिमाला हे बड्या कलावंतांचे त्रिकूट एकत्र आले होते. प्रारंभी गोपालच्या भूमिकेसाठी दिलीप कुमार यांना विचारण्यात आले होते. त्यांनी दोनपैकी एक भूमिका करण्याचे मान्य केले; पण त्याचवेळी चित्रपटाच्या अंतिम प्रतीवर हात फिरविण्याचा अधिकार देण्याची अट घातली. ती मान्य होणे शक्यच नव्हते. नंतर देव आनंद यांना विचारण्यात आले पण त्यांनीही नकार दिला. मग राजेंद्र कुमार यांची निवड झाली. राधाची भूमिका प्रारंभी नर्गिस यांना देऊ करण्यात आली होती; पण `मदर इंडिया'मधे त्यांनी राजेंद्र कुमार यांच्या आईची भूमिका केलेली असल्याने प्रेयसीची भूमिका करण्यास नकार दिला. मग वैजयंतिमाला यांची निवड झाली. या चित्रपटात इफ्तेखार, राज मेहरा, नाना पळशीकर, ललिता पवार, अचला सचदेव, हरी शिवदासानी, आदी नामवंत सहकलावंतांची तितकीच भक्कम साथ होती. गीते हसरत जयपुरी आणि शैलेंद्र यांनी लिहिली होती तर संगीताची बाजू `आरके'चे हुकुमी संगीतकारद्वय शंकर-जयकिशन यांनी समर्थपणे सांभाळली होती. `संगम' हा राज कपूर यांचा पहिला रंगीत चित्रपट! परदेशात चित्रीकरण करण्यास सुरुवात करण्याचा मानही `संगम'कडेच जातो. या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे सुंदर (राज कपूर), गोपाल (राजेंद्र कुमार) आणि राधा (वैजयंतिमाला) हे तिघे बालपणापासूनचे मित्र. तरुणपणी सुंदरला राधा आवडू लागते; पण तिचे प्रेम गोपालवर असते. तोही तिच्यावर प्रेम करतो. सुंदरला ती सतत झिडकारते. सुंदर भारतीय वायुसेनेत अधिकारी बनतो. काश्मीरवरील हवाई कारवाईत त्याचे विमान पाडले जाते. गोपाल आणि राधा दुःखी होतात; पण आता ते आपले प्रेम उघडपणे व्यक्त करतात. सुंदरचे काय होते ? गोपालने राधाला लिहिलेल्या एका प्रेमपत्रामुळे वादळ निर्माण होते. चित्रपटाचा शेवट काय होतो ?या चित्रपटातील "ये मेरा प्रेम पत्र पढ कर" हे गीतकार हसरत जयपुरी यांनी लिहिलेले आणि मोहम्मद रफी यांनी गायिलेले एक अप्रतिम प्रणयगीत गोपाल (राजेंद्र कुमार) आणि राधा (वैजयंतिमाला) यांच्यावर बाह्यस्थळी एकांतात चित्रित झाले आहे. ते आजही तितकेच लोकप्रिय आहे. गोपाल राधाला खुल्या दिलाने तिच्याबद्दलच्या आपल्या मनातल्या प्रेमभावना व्यक्त करून सांगतोय. तूच माझे जीवन आहेस. तुला मी कशाकशाची उपमा देऊ पाहतो पण ते मला पटत नाही. माझे तुझ्यावर प्रेम आहे, इतकेच मला ठाऊक आहे. मला मृत्यू आला तरी माझा आत्मा तुझ्या प्रतीक्षेत भटकत राहील, हे सांगताना त्याने आपले जणू हृदयच मोकळे करून दाखविले आहे. उर्दूमिश्रित हिंदीत हृदयाला भिडणारी प्रणयगीते लिहिण्यावर गीतकार हसरत जयपुरी यांचे जसे कमालीचे प्रभुत्व होते तसेच त्यात त्यांचे कौशल्यही दिसे; पण या प्रणयगीतात त्यांनी उर्दू शब्द वापरलेले नाहीत, हे विशेष.



शंकर-जयकिशन यांची चाल साधीच पण गुणगुणण्यासारखी नक्कीच आहे. मोहम्मद रफी यांचा मधुर आवाज ऐकताना राजेंद्र कुमार डोळ्यांपुढे उभे राहतात. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :



***ये मेरा प्रेम पत्र पढ कर***
***तुम नाराज न होना***
***तुम मेरी जिंदगी हो***
***तुम मेरी बंदगी हो***
***तुझे मै चांद कहता था***
***मगर उसमे भी दाग है***
***तुझे सूरज मै कहता था***
***मगर उसमें भी आग है***
***तुझे इतना ही कहता हू***
***मुझको तुमसे प्यार है***
***तुझे गंगा मै समझूंगा***
***तुझे जमुना मै समझूंगा***
***तू दिल के पास है इतनी***
***तुझे अपना मै समझूंगा***
***अगर मर जाऊ रूह भटकेगी***
***तेरे इंतजार में***

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# शूरवीर नेताजी पालकर



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642


आधुनिक केसरी

**इतिहास ज्यांना प्रतिशिवाजी म्हणून गौरव करतो असा योद्धा म्हणजे नेताजी पालकर. छत्रपती शिवाजी महाराजांनी बारा मावळात फिरून जे तरुण साथीदार गोळा केले यात नेताजींचा देखील समावेश केला जातो. नेताजी सातारा जिल्ह्यातील खन्डोबा पालीचे होते असं म्हणतात तर काही ठिकाणी ते पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातले होते असं सांगितलं जात.नेताजी प्रचंड पराक्रमी होते. आपल्या तलवारीने त्यांनी कित्येक लढाया गाजवल्या. स्वराज्याची निर्मिती झाली तेव्हा शिवरायांनी शहाजी महाराजांचे सहकारी असणाऱ्या माणकोजी दहातोंडे यांना सरसेनापतिपद दिलं**

शहाजी महाराजांसाठी १५ वर्षे तर शिवाजी महाराजांसाठी २० वर्षे त्यांनी सेवा केली.

माणकोजी दहातोंड्याच्या मृत्यूनंतर महाराजांनी नेताजी पालकर यांना सरनोबतीची जागा दिली. नेताजी पालकर पराक्रमी तर होतेच पण त्यांची लोकप्रियता अफाट होती. ठिकठिकाणच्या शिलेदार लोकांवर त्यांचे बरेच वजन होते. जेव्हा स्वराज्यावर अफजलखानाची स्वारी झाली, खान प्रतापगडावर महाराजांच्या भेटीस आला तेव्हा तो दगाफटका करेल या अंदाजाने नेताजी जावळीच्या जंगलात किल्ल्याच्या पूर्वेला थोड्या अंतरावर झाडींत त्याच्या लोकांसह ठेवले होते. ठरल्याप्रमाणे खुणेचे शिंग होताच नेताजी अफजलखानाच्या लोकांवर तुटून पडले. त्याने त्यांची सरसहा कत्तल केली. सिद्दी जोहारने पन्हाळगडाला वेढा दिला तेव्हा नेताजी पालकरांनी आसमंतातील मुलूख उद्ध्वस्त करून वेढा देणाऱ्या सैन्याची रसद मारण्याचा पराक्रम केला होता. ते गनिमी काव्यात प्रचंड तरबेज होते. विजापुरकरांच्या आदिलशाही फौजेस मैदानांत कधी तोंड देत नसत, परंतु रात्रीच्या वेळीं तिच्यावर हल्ले करून त्यांना पळवून लावण्याचं काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडलं.

इ.स. १६६२ च्या पावसाळ्यानंतर नेताजी पालकरांनी औरंगाबादेपर्यंत मोंगलाचा मुलूख लुटून उध्वस्त केला, व खंडणी गोळा केली. त्यांना अडविण्यास कोणीच पुढे आले नाही. त्याप्रमाणेच शाहिस्तेखानाच्या पुण्याच्या मुक्कामातही त्यांनी वारंवार हल्ले करून सतावून सोडले होते.



पुढील पावसाळ्याच्या सुमारास नेताजींनी अहमदनगर व औरंगाबाद यांच्या आसमंतांतील मुलूख लुटून जाळपोळ करण्यास सुरवात केली होती. परंतु मोंगलांच्या एका तुकडीनें त्यांच्यावर अचानक हल्ला करूनमराठी सेनेला मागे हटवले. यावेळी नेताजी पालकर जखमी झाले होते. नेताजी पालकर मोंगलांच्या मुलुखात यशस्वीपणें लुटालूट करून प्रत्येक पावसाळ्याच्या आरंभी अगदी नियमितपणें परत येत असत. पुढे जेव्हा मिर्झा राजे जयसिंग व दिलेरखान दक्षिणेत आले, तेव्हां ही बातमी  शिवाजी महाराजांना वेळेवर कळली नाही. सरनोबत म्हणून शत्रूच्या हालचालीवर लक्ष्य ठेवणे हा एक नेताजींच्या कामाचा भाग होता. पुढे पन्हाळा मोहिमेवेळी ते वेळेवर पोहोचून महाराजांना कुमक पोहोचवू शकले नाहीत. यात महाराजांचा पराभव झाला आणि सुमारे १००० माणसे मारली गेली. महाराज नेताजींवर चिडले आणि त्यांनी नेताजीला पत्राद्वारे "समयास कैसा पावला नाहीस" असे म्हणून बडतर्फ केले असं सांगितलं जातं.

पुढे नेताजी विजापूरकरांना जाऊन मिळाले. महाराज आग्र्याच्या भेटीस निघून गेल्यानंतर मिर्झाराजांनी नेताजी पालकरांना विजापूरकरांकडून मुघलांकडे वळवले.

या प्रसंगीं जयसिंगानें नेताजी पालकरांना लांच दिली असावी असें ग्रँटडफ म्हणतो. तर काही जण म्हणतात कि स्वतः शिवाजी महाराजांनी मुघलांच्या गोटात आपला माणूस असावा म्हणून पालकरांना मिर्झा राजेंकडे पाठवले असावे.

मिर्झा राजे जयसिंग यांनी नेताजी पालकरांना आणि त्यांचे चुलते कोंडाजी याना बीडजवळ अटक केली आणि मुघल बादशाह औरंगजेबाकडे दिल्लीस पाठवले. तिथे त्यांना कैदेत ठेवण्यात आलं. चार दिवस अत्याचार करून मुस्लिम धर्म स्वीकारायला लावला. तेव्हा बादशाहने त्यांना मुर्शिद हा किताब देऊन व त्यांचे नांव महंमद कुली खान असे ठेवले . तो १६६७ सालचा मार्च महिना होता. नेताजी मोहम्मद कुलीखान झाले पण तरी बादशाहचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. त्याने नेताजींना महाराष्ट्रापासून दूर म्हणून काबुल कंदाहार मोहिमेवर पाठवले. पण नेताजींनी तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न अयशस्वी लाहोर जवळ पुन्हा अटक करण्यात आली. नेताजी अफगाणिस्तानच्या कंदाहार येथे आले. त्यांच्याकडे तिथल्या किल्ल्याची जबाबदारी सोपवण्यात आली. अफगाणिस्तानमध्ये बंड करणाऱ्या पठाणांच्या विरोधात मुघलांच्या बाजूने त्यांनी पराक्रम गाजवला. कंदाहार मध्ये त्यांनी केलेल्या कामगिरीवर औरंगजेब खुश झाला. ते पुन्हा छत्रपती शिवाजी महाराजांना जाऊन मिळणार नाहीत याची त्याला खात्री झाली.इकडे महाराष्ट्रात अनेक मुघल सरदार स्वराजावर विजय मिळवण्यासाठी प्रयत्न करत होते. सह्याद्रीच्या कानाकोपऱ्याशी नाते असलेले नेताजीच महाराष्ट्राची कामगिरी फत्ते करेल असा विश्वास औरंगजेबाला होता. शिवाजीच्या विरुद्ध प्रतिशिवाजी अशी लढत करता येईल असं स्वप्न पाहत त्याने नेताजींना अफगाणिस्तानातून ९ वर्षांनी परत बोलावलं आणि दख्खनच्या मोहिमेवर पाठवलं.

नेताजींनी हि संधी साधली. त्यांनी बेसावध मुघल सेनेला झुगारा देऊन छावणीतून पळ काढला आणि रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांकडे आले. आपण द्याल ती शिक्षा मी स्वीकारेन पण मला पदरात घ्या, अशी विनवणी नेताजींनी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना माफ केलं. नेताजी पालकरांनी प्रायश्चित घेतल. १९जुन १६७६ रोजी महाराजांनी त्याना पुन्हा विधिवंत हिंदु धर्मात घेतले.

# अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची उडाली झोप सरकार मात्र साखरझोपेतच

आधुनिक केसरी न्यूज

सुधाकर जेठे

**फुलंब्री :** अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची उडाली झोप सरकार मात्र झोपेतच आहे, असे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी सांगितले की औरंगाबाद जिल्ह्यात चार दिवसापासून अवकाळी पावसाने थैमान घातले आहे शेतकऱ्याच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे शेतकऱ्याला आजपर्यंत दुष्काळ निधीचे मागील पैसे मिळाले नाही शेतकऱ्याने बियाणे खते औषधे उधारी घेऊन पिक जोपासले होते परंतु आता शेतकऱ्यावर फार मोठा आपत्ती आली आहे यातच कोणतेही राजकीय नेते व अधिकारी लक्ष देत नाही.



छत्रपती संभाजी नगरजिल्ह्याचे पालक मंत्री कोण व आमदार कोण असा प्रश्न फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांना पडला आहे कारण कोणीही राजकीय पुढारी किंवा सरकारी अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर यला तयार नाही.

फुलंब्री तालुक्यात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत आहे, या अवकाळी पावसामुळे सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या शेतातील रब्बी व खरीप हंगामातील पिकांची नुकसान झाली आहे. आगोदरच शेतकरी राजा अडचणीत सापडला आहे, कधी ओला दुष्काळ तरी कधी कोरडा दुष्काळ अशा गर्तेत बळीराजा सापडला आहे. तरी या बाबतीत शासन व प्रशासन गांभीर दिसत नसल्याचे दिसून येत आहे. फुलंब्री तालुक्यातील पिरबावडा, आळंद बोरगाव अर्ज उमरावती धानोरा, टाकळी कोलते, खामगाव, वाघलगाव वाघोला जातेगाव, कान्होरी जानेफळवाडी ममुराबाद, निधोना बाबरा, पिंपळगाव, वानेगाव किनगाव, गणोरी या सह आदी गावात अवकाळी पाऊस झाला आहे. येथील शेतकरी राजा अडचणीत सापडला आहे. याकरिता शासनाने लक्ष देत फुलंब्री तालुक्याच्या आमदारांनी व औरंगाबाद जिल्ह्याचे पालकमंत्र्यांनी फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करावी व प्रशासनाच्या अधिकार्यांना नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी फुलंब्री तालुक्यातील शेतकरी करत आहे. तर यात एका शेतकऱ्याने प्रश्न विचारला की औरंगाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री कोण व जिल्हाधिकारी कोण आहे असा सवाल करत शासन व प्रशासनावर रोष व्यक्त केला. शासनाने याकडे लक्ष द्यावे शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी सांगितले आहे.

# गांजा सेवनप्रकरणी प्रथमच ६९ कारवाया

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यातील तरुणाई दिवसेंदिवस व्यसनांच्या गर्तेत आहे. जिल्ह्यात गांजा सहज उपलब्ध होत असल्याने तरुणाई गांजाच्या नशेत विविध गुन्हे करत आहे.

अलीकडेच महागाव व राळेगाव तालुक्यात गांजा शेतीचाही पर्दाफाश करण्यात आला आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी आता गांजा विक्री करणाऱ्यांसह तो सेवन करणाऱ्यांवरही कारवाईचा फास आवळला आहे.

जिल्हा नशामुक्त करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी हे अभियान हाती घेतले आहे. गेल्या २२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच गेल्या ११ महिन्यांत 'एनडीपीएस' कायद्यअंतर्गत तब्बत ६९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यवतमाळ : जिल्ह्यातील तरुणाई दिवसेंदिवस व्यसनांच्या गर्तेत आहे. जिल्ह्यात गांजा सहज उपलब्ध होत असल्याने तरुणाई गांजाच्या नशेत विविध गुन्हे करत आहे.

अलीकडेच महागाव व राळेगाव तालुक्यात गांजा शेतीचाही पर्दाफाश करण्यात आला आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी आता गांजा विक्री करणाऱ्यांसह तो सेवन करणाऱ्यांवरही कारवाईचा फास आवळला आहे.

# पारोळा तालुक्यात तीन वाहनांच्या अपघातात तीन महिलांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** पारोळा तालुक्यातील विचखेडा फाट्यानजीक वळणरस्त्यावर शुक्रवारी मालवाहू मोटार, मालमोटार आणि जीप यांच्यात अपघात होऊन तीन महिलांचा मृत्यू , तर २० जण जखमी झाले. याप्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

पारोळा तालुक्यातील बोळे येथून चिलाणे (ता. शिंदखेडा, जि. धुळे) येथे नातेवाइकाच्या अंत्यविधीसाठी मालवाहू मोटारीतून काही जण जात होते. विचखेडा फाट्यानजीक वळणरस्त्यावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने मालमोटार ही मालवाहू मोटारीवर आदळली. त्याचवेळी समोरून येणारी भरधाव जीपही आदळली. या विचित्र अपघातात दोन महिलांचा जागीच मृत्यू, तर २१ जण गंभीर जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच, बोळेसह परिसरातील ग्रामस्थांनी, तसेच पारोळा येथील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. जखमींना पारोळा येथील कुटीर रुग्णालयात हलविण्यात आले. गंभीर जखमी एका महिलेचा उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला. तीन जखमींना धुळे येथे, तर इतर जखमींना प्राथमिक उपचार करून खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातात रेखाबाई कोळी (५५), योगिता पाटील (४०, दोन्ही रा. बोळे, ता. पारोळा) यांचा जागीच, तर चंदनबाई गिरासे (६५) यांचा उपचारासाठी नेत असताना वाटेत मृत्यू झाला. जखमींमध्ये भरत गिरासे (६५), रणजित गिरासे (६०), भीमकोर गिरासे (५०), राजेशभाई कोळी (४५), अजतसिंग गिरासे (५०), भुराबाई तात्या गिरासे (४०), भुराबाई मोहनसिंग गिरासे (४०), रेखाबाई गिरासे (५०), नानाभाऊ गिरासे (५५), भटाबाई गिरासे (४५), सुनीता गिरासे (४४), भुराबाई भीमसिंग गिरासे, भीमकोरबाई जगत गिरासे (६०), भगवानसिंग गिरासे (६५), रंजनसिंग गिरासे (५५), हिराबाई गिरासे (४०), राजेबाई कोळी (४५), दयाबाई गिरासे (५५), रूपसिंग गिरासे (६०), सय्यद लियाकत (२१, रा. मालेगाव) यांचा समावेश आहे.



# सुलतानपूर भांडेगाव ग्रुप ग्रामपंचायत इमारतीचे अनिल श्रीखंडे यांच्या हस्ते भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपुर येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारतीच्या बाधकामाला दि.1 डिसेंबर रोजी ग्रामपंचायत सरपंच अमरनाथ श्रीखंडे, उपसरपंच शहेनाजबी शेख, ग्रामसेवक सोनवने, विष्णू चव्हान, काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष अनिल पाटिल श्रीखंडे, प्रकाश चव्हान, वसंतराव चव्हान, इब्राहिम शहा, कर्मचारी तातेराव कोतकर बाबासहेब मालोदे, असेफ भाई शेख व सर्व गावातील प्रतिशत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली.

# अपघाती विमा योजना कुटुंबाला संरक्षण देण्याची गरज : मुख्य प्रबंधक अतुल सावजी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** आजच्या धावपळीच्या जीवनात मनुष्याचे जीवन अनमोल असतांना आपल्या व आपल्या परिवाराच्या सुरक्षासाठी कुटुंबाला संरक्षणसाठी अपघाती विमा ही काळजी गरज आहे. प्रत्येकाने आपला विमा काढून घ्यावा, असे आवाहन स्टेट बँकेचे मुख्य शाखा व्यवस्थापक अतुल सावजी यांनी केले. ते प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेतून वारसाना दोन लाख रुपये विमा मजूर झाल्यानंतर धनादेश वितरण प्रसंगी बोलत होते.



यावेळी मुख्य प्रबंधक अतुल सावजी बोलताना म्हणाले की केंद्र शासनाच्या विमा योजनेत भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक ग्राहकाने स्वत काळाची गरज ओळखून विमा घेणे. पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना व पंतप्रधान सुरक्षा वीमा योजनांमध्ये अतिशय अल्प दरात वीमा काढून आपल्या कुटुंबाला संरक्षण द्यावे. तसेच उतरत्या वयाच्या काळात शासनाची अटल पेन्शन पाच हजार रुपये पर्यंत दरमहा पेन्शन योजनात सहभागी व्हावे असे आवाहन याप्रसंगी श्री अतुल सावजी यांनी केले. परतूर येथील पत्रकार कृष्णा गुणाजी धोंगडे यांचा ऑगस्ट महिन्यात निधन झाले. त्यांचा परतूर व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या पुढाकारातून भारतीय स्टेट बँकचा प्रधानमंत्री सुरक्षा, व प्रधानमंत्री जीवन ज्योति सुरक्षा विमा योजनेत विमा उतरविला होता. अचानक त्यांच्यावर ऑगस्ट महिन्यात उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी यासाठी परतूर व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे अध्यक्ष भारत सवने यांनी पुढाकार घेऊन पाठपुरावा करीत मयत कृष्णा धोंगडे यांच्या कुटुंबीयांना विमा योजनेतून चार लाख रुपये मिळणार आहे.

# दिवाळीत एसटीने कमावले १३ कोटी

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** राज्य परिवहन महामंडळाच्या भंडारा विभागाला यंदाची दिवाळी भरभरून पावली. १ ते ३० नोव्हेंबर या दिवाळीच्या महिनाभरात १२ कोटी ९१ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. यात भंडारा विभागातील भंडारा, तुमसर, साकोली, पवनी, गोंदिया व तिरोडा या ६ आगारांचा समावेश आहे.

भंडारा विभागातील या सहाही आगारात बसेसच्या दैनंदिन १८५० नियमित फेऱ्या आहेत. यात शालेय विद्यार्थ्यांच्या बसेसचाही समावेश आहे. यंदा दिवाळीच्या विद्यार्थ्यांची सुटी लक्षात घेऊन खास दिवाळीसाठी नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार दैनंदिन १७५० फेऱ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. यात कधी १.२८ तर कधी १.३२ लाख कि.मी. अंतर गाठण्यात आले असून सरासरी १.३० लाख कि.मी. चा एस.टी.ने प्रवास केला आहे. मागीलवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या दिवाळी उत्पन्नात ९८ लाखांची भर पडली आहे. मागीलवर्षी दिवाळीच्या काळात ११ कोटी ९३ लाख रुपये उत्पन्न मिळाले तर यावर्षी १२ कोटी ९१ लाख रुपयांचे उत्पन्न दिवाळीच्या १ महिन्यात मिळाले. यात लांब पल्लाही सुखावणारा ठरल्याचे दिसून आले.

# रायगड जिल्हा काँग्रेस सेवा दल कार्याध्यक्षपदी वैभव नथुराम ठाकूर

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्र राज्य काँग्रेस कमिटी अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते काँग्रेसचे कट्टर व एकनिष्ठ, प्रामाणिक कार्यकर्ते वैभव नथुराम ठाकूर यांची रायगड जिल्हा काँग्रेस सेवा दल कार्याध्यक्षपदी निवड झाल्याचे अधिकृत नियुक्ती पत्र वैभव ठाकूर यांना देण्यात आले. सदर कार्यक्रम टिळक भवन दादर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादालच्या उपाध्यक्ष प्रकाश पेवेकर ,रायगड जिल्हा सेवा दल जिल्हाध्यक्ष कमलाकर घरत, उरण तालुका सेवा दल काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोपीनाथ जी मांडेलकर ,रायगड जिल्हा सेवा दल सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील ,भेंडखल गावचे उपसरपंच दिपक ठाकूर, काँग्रेस कमिटी ज्येष्ठ नेते नथुराम ठाकूर, एन. एम. घरत यांच्या उपस्थितीत नियुक्त पत्र देण्यात आले.जसखार गावचे सुपुत्र व काँग्रेसचे एकनिष्ठ व कट्टर कार्यकर्ते वैभव ठाकूर हे सामाजिक कार्यकर्ते असून एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी काँग्रेसचा तळागाळात प्रचार व प्रसार केला आहे.काँग्रेसच्या



माध्यमातून अनेक योजना गोर गरिबांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले आहे. बेरोजगारांना नोकरी मिळवून देणे, जसखार ग्रामस्थांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करणे तसेच उरण तालुक्यातील कबड्डी खेळाडूंसाठी तालुका स्तरीय स्पर्धेचे भव्य आयोजन करणे आदी विविध उपक्रम, कार्यक्रमांचे ते नेहमी आयोजन करीत असतात.त्यामुळे त्यांची निवड रायगड जिल्हा काँग्रेस सेवा दलाच्या कार्याध्यक्ष पदी झाली आहे.उरण काँग्रेस कार्यालयात भिवंडी लोकसभा मतदार संघांचे माजी खासदार सुरेश टावरे,जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, शहराध्यक्ष प्रकाश पाटील आदी काँग्रेसच्या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार देखील करण्यात आला.



# समाधान महाराज शर्मा यांच्या कीर्तनाने उमरी दुमदुमली

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** उमरी येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 99 वा संजिवन समाधी सोहळा संपन्न झाला. गेले तीन वर्ष समाधान महाराज शर्मा बाबा महाराजांच्या मठात कीर्तनास येतात. याही वर्षी महाराज आले खूप काही चांगले प्रवचन सांगून गेले. यांनी जे सांगितले ते माणसाच्या जे मनातले काही अहंकार निर्माण होतो ते काढण्याचा प्रयत्न करतात. बाबा महाराज हे खूप जागरत समाधी आहे खूप मोठ्या सखेने भविक गोळा होतात जत्रा सुद्धा भरते. मठाचे अधीपती. अरविंद महाराज हे खूप छान कार्य करतात. समस्त उमरी वासियांना खूप छान मार्गदर्शन देतात. कीर्तन समाधान महाराज. नामदेव महाराज लबडे यांचे ठेवलेल कीर्तन खूपच छान मार्गदर्शन केले. काही जन फक्त टाइमपास म्हणून येतात काही. मार्गदर्शनासाठी मनातले सर्व द्वेस बाहेर काढण्याचा प्रयत्न करतात महाराज हे सर्व कवळे सरामुळे शक्य झाले. यांनी महाराजांना बोलावलं काहीतरी बोध घ्यावा या कारणांनी आलेले मान्यवर, श्री निवास पाटील. अरविंद महाराज, मारोतराव कवळे सर, ढगे, किशोर पवितवार, पारसशेठ, दर्डा, विठ्ठल मुकावार, उमाजी नारदे, सुभाष पेरेवार, बंटी येरावार.नरशिंग मुकावार, सदानंद खांडरे, शिवाजी हेमके आणी समस्त उमरी वासी उपस्तित होते.

# कमकोच्या चेअरमन पदी गजानन सोनजे तर व्हा.चेअरमनपदी रंगनाथ देवघरे

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** तालुक्यातील सहकार क्षेत्रात अग्रमी असणाऱ्या व तालुक्यातील अर्थवाहिनी समजली जाणाऱ्या कळवण मर्चन्ट बँकेच्या चेअरमनपदी जेष्ठ संचालक गजानन (आण्णा) सोनजे यांची तर व्हा. चेअरमनपदी रंगनाथ देवघरे व जनसंपर्क संचालक म्हणून डॉ. धर्मराज मुर्तडक यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान चेअरमन योगेश महाजन व्हा. चेअरमन दीपक वेढणे व जनसंपर्क संचालक संजय मालपूरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने या जागेसाठी आज दि.२ रोजी बँकेच्या सभागृहात बैठक होऊन निवडणूक घेण्यात आली. यावेळी चेअरमन पदासाठी जेष्ठ संचालक गजानन( आण्णा ) सोनजे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला या अर्जावर सुचक म्हणून प्रवीण संचेती तर अनुमोदक म्हणून नितीन वालखडे यांनी स्वाक्षरी केली तर व्हा. चेअरमनपदी रंगनाथ देवघरे यांच्या अर्जावर योगेश महाजन यांनी सुचक म्हणून तर अनुमोदक म्हणून संजय मालपूरे यांनी स्वाक्षरी केली दोन्ही पदासाठी एक एक अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक उप निबंधक शहा यांनी चेअरमन म्हणून गजानन ( आण्णा ) सोनजे यांची तर व्हा. चेअरमनपदी रंगनाथ देवघरे यांची व जनसंपर्क संचालकपदी डॉ. धर्मराज मुर्तडक यांच्या नावाची घोषणा केली. यात्रसंगी आ. नितीन पवार, नगराध्यक्ष कौतिक पगार, प्रवीण संचेती, नितीन वालखडे, योगेश महाजन, संजय मालपूरे, दीपक वेढणे, सागर शिरोडे, विनोद मालपूरे, धनंजय अमृतकर, पोपट बहिरम, सतीश कोठावदे, लक्ष्मन खैरनार, भारती कोठावदे, शालिनी महाजन, निलेश पाटकर,यतिन सोनजे, सागर कोठावदे,आदीसह सहकार, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन, व्हा. चेअरमन यांचा विविध संस्था व मान्यवरांनी सत्कार करून स्वागत केले.



# पंतप्रधान, उपमुख्यमंत्र्यांच्या योजनांमुळे राज्याच्या वीज क्षेत्राचा कायापालट

## स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आरडीएसएस योजना आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना या दोन योजनांमुळे राज्याच्या वीज क्षेत्रात आमूलाग्र सुधारणा होणार असून या क्षेत्राचा कायापालट होईल, असे प्रतिपादन एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक मा. विश्वास पाठक यांनी शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर येथे केले.

महावितरण, महापारेषण, महानिर्मिती, महाऊर्जा आणि विद्युत निरीक्षक विभाग यांच्या जिल्हा आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी खा. इम्तियाज जलील, आ. हरिभाऊ बागडे, आ. रमेश बोरनारे, आ. उदयसिंग राजपूत, महावितरणचे संचालक संजय ताकसांडे, महानिर्मितीचे संचालक संजय मारुडकर, महापारेषणचे संचालक संदीप कलंत्री, महावितरणचे विभागीय संचालक प्रकाश खपले,




मुख्य अभियंता मुरहरी केळे आणि महापारेषणचे मुख्य अभियंता अविनाश निंबाळकर यावेळी उपस्थित होते. विश्वास पाठक म्हणाले की, वाढत्या मागणीप्रमाणे वीज वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिंब्याने आरडीएसएस ही चार लाख कोटी रुपये खर्चाची योजना देशभर राबविण्यात येत आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३३७४ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. नवीन वीज उपकेंद्र उभारणे, नवे ट्रान्सफॉर्मर बसविणे, वीज जाळे बळकट करणे, स्मार्ट मीटर बसविणे अशी कामे या योजनेत हाती घेण्यात आली आहेत. यामुळे वीज पुरवठ्याचे प्रश्न सुटतील. ही योजना आगामी १८ महिन्यात पूर्ण करायची आहे. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा व्हावा या दृष्टीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला चालना दिली आहे. या योजनेत सौर ऊर्जेचा वापर करून सात हजार मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येणार आहे. त्यापैकी साडेतीन हजार मेगावॅट वीजनिर्मितीची टेंडर प्रसिद्ध झाली आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २२२ मेगावॅट वीजनिर्मितीचा समावेश आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना लाभ होण्यासोबतच संपूर्ण राज्याला फायदा होणार आहे. तीस हजार कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक, १९००० रोजगार निर्मिती, ग्रामपंचायतींना अनुदान आणि क्रॉस सबसिडीचा बोजा कमी झाल्यामुळे भविष्यात उद्योगांच्या वीज दरात सवलत असे या योजनेचे लाभ आहेत. उपस्थित मा. लोकप्रतिनिधींनी यावेळी वीज पुरवठ्याबाबत विविध मुद्दे मांडले. लोकप्रतिनिधींच्या सूचनांची प्राधान्याने अंमलबजावणी करावी, अशी सूचना मा. विश्वास पाठक यांनी अधिकाऱ्यांना केली.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यवाह, खजिनदारपदी डॉ. मारोती तेगमपुरे

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४६ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन दिनांक २५,२६ व २७ नोव्हेंबर २०२३ रोजी वाघीरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे येथे यशस्वी संपन्न झाले. या अधिवेशनाच्या समारोप सत्रानंतर सर्वसाधारण सभा पार पडली. सर्वसाधारण सभेने विविध विद्यापीठातून येणाऱ्या कार्यकारी मंडळावरील सदस्यांची प्रत्यक्ष निवडणुकीच्या माध्यमातून निवड केली. यावेळी परिषदेचे कार्यवाह खजिनदार म्हणून पुढील तीन वर्षासाठी (१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७) डॉ. मारोती तेगमपुरे यांची बिनविरोध निवड केली. यापूर्वीही डॉ. मारोती तेगमपुरे यांनी परिषदेचे कार्यवाह - खजिनदार म्हणून कार्य केले आहे. सलग दुसऱ्यांदा ही बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, प्राचार्य डॉ. संजीवकुमार लाटे, डॉ. लालासाहेब घाडगे यांनी काम पाहिले

डॉ तेगमपुरे हे अंबड येथील गोदावरी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते संशोधन मार्गदर्शन म्हणून काम करत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण चार विद्यार्थ्यांना पीएच. डी. ही सर्वोच्च पदवी प्राप्त झाली आहे. आज रोजी त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण चार संशोधक विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य सुरू आहे. त्यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूण ५५ शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांनी १) आदिवासी विकास आणि वास्तव २) भारतीय शेतीचीअवस्था (अनुवादित) ३) भाषा, विकास आणि राजकारण ४) जागतिकीकरण आणि भारत ५) महात्मा बसवेश्वर काल आणि कर्तृत्व ६) आम्ही लढलो - आम्ही घडलो ७) डीसीपीएस - काळोखाचा जाहीरनामा. ८) नवीन शैक्षणिक धोरणात आम्ही भारताचे लोक कुठे? या पुस्तकांचे लेखन केले आहे. त्याचसोबत त्यांचे विविध वृत्तपत्रातून अर्थशास्त्रीय तथा प्रासंगिक विषयावर विपुल असे लेखन कार्य आहे. त्यांनी अर्थव्यवस्थात्मक व प्रासंगिक विषयावर राज्यभर व्याख्याने दिलेली आहेत. डॉ. मारोती तेगमपुरे यांनी महाराष्ट्र राज्य प्राध्यापक जुनी पेन्शन हक्क समितीचे राज्याध्यक्ष म्हणून अनेक लढयांचे नेतृत्व केले आहे.



# नाशिक ग्रामीण पोलिसांचे गुटखा विरोधी अभियान ५ यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** नाशिक ग्रामीण पोलिसांचे गुटखा विरोधी अभियान ५ यशस्वी झाले असून या अभियानात तब्बल २,१०,३८,९७७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी दिली.

जिल्ह्यातील गुटखा व्यवसाय नेस्तनाबूत करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटखा विरोधी अभियान ५ सुरू केले होते. दि.६ नोव्हें ते दि.३० नोव्हें या कालावधीत नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटखा विरोधी ९३ कारवाया करून ९९ आरोपींना भारतीय दंड संहितेच्या कलम ३२८ खाली अटक केली आहे. सदर कारवायात एकूण ९८ लक्ष ७८ हजार २०४ रुपयांचा गुटखा हस्तगत करण्यात आला आहे. सदर मोहिमेदरम्यान विशेष पथकाने केलेल्या कारवाईत, परराज्यातील एका आयशर ट्रकमध्ये चांदवड शहरातून मुंबई आग्रा महामार्गाने मुंबईच्या दिशेने घेवून जात असलेला ५० लाखांचा अवैध गुटखा पकडण्यात आला होता. या कारवाईत दोन आरोपींना अटक करून सुमारे ७० लाख ८ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. गुटखा व्यवसायाबरोबरच जिल्ह्यातील सर्व प्रकारचे अवैध व्यवसाय बंद व्हावेत या दृष्टीकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी याच कालावधीत वेगवेगळया सदराखाली एकूण ५५६ ठिकाणी छापे मारून सर्वच प्रकारच्या अवैध व्यवसायांवर कारवाई केली आहे. यात गुटखा कारवाईच्या ९३ केसेससह मुंबई दारूबंदी कायद्याखाली ३४३, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याखाली ८७, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाखाली १९, जीवनावश्यक वस्तू कायद्याखाली १०, अंमली पदार्थ विरोधी कायद्याखाली ४ कारवायांचा समावेश असून, यात एकूण ७५४ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून एकूण २ कोटी १० लक्ष रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील अपघात कमी होण्याच्या दृष्टिकोनातून, नाशिक ग्रामीण घटकातील वाहतूक पोलीसांनी अवैध प्रवासी वाहतूक व वाहनांच्या कागदपत्रांच्या तपासणीची मोहीम हाती घेतली होती. दि.१ नोव्हें पासून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या एकूण ४,४४२ वाहन चालकांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून ३१,३३,८५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व अवैध व्यवसाय हद्दपार करण्यासाठी अशा व्यवसायांची माहिती पोलीसांपर्यंत पोहोचावी, या दृष्टिकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी खबर ही हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी ६२६२२५६३६३ या हेल्पलाईनवर संपर्क साधून आपल्या परिसरात चालणा-या अवैध व्यवसायांची माहिती नाशिक ग्रामीण पोलीसांना द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.



# चिंतनशील, क्रियाशील युवा पिढी हीच खरी देशाची संपत्ती : डॉ. राजेश करपे

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग )रेड रिबन क्लब ग्रामीण रुग्णालय घनसावंगी च्या संयुक्त विद्यमाने एच.आय.व्ही एड्स जनजागृती अभियान.

घनसावंगीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संचलित मॉडेल कॉलेज घनसावंगी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग रेड रिबन क्लब आयोजित एच आय व्ही एड्स जनजागृती अभियान कार्यक्रम आज दिनांक एक डिसेंबर रोजी संपन् हे अभियान 1 ते 31डिसेंबर दरम्यान राबविण्यात येत आहे. या एड्स जनजागृती अभियान चे उद्घाटन डॉ राजेश करपे आधीसभा सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ राम चव्हाण हे होते.प्रमुख उपस्थितीमध्ये माजी नगराध्यक्ष श्री नंदकुमार देशमुख,उद्योजक श्री मुळे,समुपदेशक श्री लहू मिसाळ,आयसीटीसी केंद्राचे श्री देवानंद इंगोले,आदींची उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.राजेश करपे म्हणाले की" युवक हाच या देशाची संपत्ती असून या उमेदीच्या काळात युवकांनी सकारात्मक नैतिक आणि स्वतःचा तोल न जाऊ देता गुरूंच्या मार्गदर्शनाखाली ध्येयाकडे वाटचाल केली पाहिजे. चिंतन,मनन आणि अभ्यासाने यश प्राप्ती करता येऊ शकते.हेच वय निश्चित साध्य करण्याचे असून या कार्यकाळात भविष्यासाठी युवकांनी परिश्रम आणि मेहनतीने चिंतन मनन आणि अभ्यास केला पाहिजे तरच देशाचे भविष्य अबाधित आहे राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता ,चरित्र, आत्मबल, संस्कार तसेच परोपकार आणि सेवाभावी वृत्ती निर्माण करण्यात मोलाची भूमिका निभावते. एड्स हा महाभयंकर असा रोग असून युवकांनी एक एक पाऊल मोठ्या जबाबदारीने टाकावे आणि जनजागृतीसाठी आपली मोलाचे योगदान द्यावे समाजाच्या उपेक्षित घटकाला अपमानित न करता आधार द्यावा. मॉडेल कॉलेज घनसावंगी चे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे हे एकक समर्थपणे कार्य करत आहे याचा अभिमान आहे असे ते म्हणाले. तसेच मॉडेल कॉलेज घनसावंगी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वरदान आहे" असे ते म्हणाले.






# तांबोळी परिवाराचे प्रगती व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरच्या महिलांना व्यावसायीक मोफत मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मुकुंदवाडी येथील प्रगती वोकेशनल ट्रेनिंग सेंटर मधील भगिनींना व्यवसायासाठी मार्गदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आलेले होते. मार्गदर्शनाच्या या कार्यक्रमात तांबोळी गृहउद्योग आणि शीतल रांगोळी क्रिएशनच्या सौ. मंगला भास्करराव तांबोळी आणि सौ. शीतल शशांकराव तांबोळी यांनी मोफत मार्गदर्शन केले. मार्गदर्शन प्रसंगी जवळपास 25 महिला उपस्थित होत्या. सगळ्यांसोबत छान संवाद झाला.

मार्गदर्शन प्रसंगी महिलांनी घरगुती व्यवसाय कसा चालू करायचा या बद्दल मंगला तांबोळी यांनी माहिती दिली. त्याच बरोबर तांबोळी गृहउद्योगातील भुरके तसेच याच प्रकारातील दोन पदार्थांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यातील बारकावे आणि पदार्थ रुचकर, चविष्ट कसा बनवता येईल त्याबद्दल महिलांना मार्गदर्शन केले. काही महिलांच्या आग्रहास्तव स्पेशल हैद्राबादी चिंचेचा कोळ टाकून केलेला भात (पोलियोगारे) हा पदार्थ बनवून दाखवला. त्याच बरोबर सौ.शितल तांबोळीयांनी घरगुती व्यवसाय करताना विविध प्रकारच्या कोणती दक्षता घ्यावी या विषयीच्या मोलाच्या टिप्स दिल्या.त्याच बरोबर शितल तांबोळीयांनी विविध प्रकारच्या रांगोळ्या आणि हस्तकलेचे प्रात्यक्षिक करून दाखविले.या कार्यक्रमासाठी प्रगती वोकेशनल ट्रेनिंगसेंटरच्या महिलांनी अधिकारी वर्गानी विशेष परिश्रम घेतले होते. या कार्यक्रमात अनेक मान्यवर महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर